दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाची सुनावणी दुसऱ्या खंडपीठासमोर..



रंगभूमि

पाहिजेत
हॉटेल विश्वगंगा
फॅमिली रेस्टॉरंट, वडनेर
रुम बॉय, हेल्पर, वेटर, किचन सुपरवाईजर, तंदुरी वस्ताद, फ्राय पॅन वस्ताद व वॉचमॅन (अनुभवास प्राधान्य) पगार योग्यते नुसार
वेळ - 11.00 ते 5.00 | मो.नं. - 9860234154
हॉटेल विश्वगंगा फॅमिली रेस्टॉरन्ट, वडनेर ता.नांदुरा जि.बुलढाणा

## न्यूज ब्रीफ

### निपाह व्हायरसचा रुग्ण सापडला

**तिरुअनंतपुरम :** केरळात या वर्षातील निपाह व्हायरसची पहिली केस सापडली आहे. याची माहिती गुरुवारी समोर आली आहे. हा रुग्ण ४३ वर्षांचा असून तो कोझिकोड येथील रहाणारा आहे. राज्य सरकारने या प्रकरणातील रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर संपूर्ण राज्यात हायअलर्ट देण्यात आला आहे. केरळ राज्यात आठ वर्षातील हे सहावे संक्रमण आहे.

### शिरच्छेदाच्या प्रयत्नानंतर आयर्लंड-ब्रिटनमध्ये दंगली



**लंडन :** आयर्लंडमधील बेलफास्टमध्ये एका आयरिश व्यक्तीचा शिरच्छेद करण्याच्या प्रयत्नाच्या विरोधात सुरू झालेले आंदोलन बुधवारी मोठ्या स्थलांतरित-विरोधी दंगलींमध्ये रूपांतरित झाले. आयर्लंड आणि ब्रिटनमध्ये डझनहून अधिक ठिकाणी हिंसाचार, जाळपोळ आणि लुटमारीच्या घटना समोर आल्या. बेलफास्ट आणि त्याच्या आसपासच्या परिसरात मुखवटा घातलेल्या जमावाने घरे, दुकाने, बस आणि गाड्यांना लक्ष्य केले.

### टीएमसीला आणखी एक धक्का!

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसला (टीएमसी) आणखी एक धक्का बसला आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमधील असंतोष वाढला असून पक्षात राजीनामा सत्र सुरुच आहे. अशात गुरुवारी तृणमूल काँग्रेसचे खासदार प्रकाश चिक बाराईक यांनी राज्यसभेचा राजीनामा दिला आहे. यापूर्वी सुखेंदू शेखर रॉय आणि सुष्मिता देव यांनीही राजीनामा दिला होता.




डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी ▶ खार्ग बेटावरील तेल-गॅसवर ताबा मिळवू

# इराणवर सर्वात मोठा हल्ला करू

**वॉशिंग्टन, वृत्तसंस्था : अमेरिका-इराण युद्ध आता आणखी पेटण्याची चिन्हे आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची नवी धमकी दिली आहे. इराणची बरीचशी लष्करी ताकद आधीच कमकुवत झाली असल्याचा दावा करत, ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिका रात्री इराणवर मोठा हल्ला करेल.**

अमेरिकेने इराणवरील हल्ल्यासंदर्भात एक मोठे निवेदन जारी केले आहे. ११ जूनच्या रात्री इराणवर मोठा हल्ला केला जाईल, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी हल्ल्याच्या काही तास आधीच ही धमकी दिली आहे. त्यांनी आपल्या सोशल मीडियात हल्ल्याबाबत पोस्ट केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, इराणचे नौदल, हवाई दल, रडार, एंटी एअरक्राफ्ट आणि संरक्षण यंत्रणेसह त्यांची बहुतेक हल्ला करण्याची क्षमता नष्ट करण्यात आली आहे.

नजीकच्या भविष्यात आम्ही खार्ग बेट आणि इतर तेल-संबंधित पायाभूत सुविधा ताब्यात घेऊ आणि त्यांच्या तेल आणि गॅस बाजारावर पूर्ण नियंत्रण मिळवू असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. जसे आम्ही व्हेनेझुएलासोबत केले त्यामुळे व्हेनेझुएला आणि अमेरिका या दोघांसाठीही खूप फायदेशीर ठरत आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले.

### अमेरिकेच्या हल्ल्यांना इराणचे प्रत्युत्तर

■ पश्चिम आशियामध्ये सातत्याने तणाव वाढत आहे. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणच्या आयआरजीसीने एक निवेदन जारी केले आहे. त्यात कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकेशी संबंधित प्रमुख ठिकाणांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केल्याची घोषणा केली आणि सर्व जहाजांना त्या भागापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. आमच्या प्रत्युत्तरादेखील केलेल्या लष्करी कारवाईत अमेरिकेच्या १८ प्रमुख लष्करी ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले, ज्यात कुवेतमधील अली अल-सलेम आणि अहमद अल-जाबेर हवाई तळ आणि बहरीनमधील शेख ईसा हवाई तळाचा समावेश आहे असे आयआरजीसीने एक निवेदन जारी करून सांगितले आहे. अमेरिकेने इराण मध्ये केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली.

## 'जहाजांवरील हल्ले थांबलेच पाहिजे'

हल्ल्यांचा भारताकडून निषेध ▶ तीन भारतीय खुलाशांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** नाकेबंदीचे उल्लंघन करत असल्याचा दावा करत तीन दिवसात तीन भारतीय जहाजांवर हल्ले झाले. ओमानच्या समुद्रात झालेल्या तीन घटनांपैकी एका घटनेत तीन भारतीय खुलाशांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर भारताने तीव्र शब्दात आपली नाराजी व्यक्त 'जहाजांवरील हल्ले थांबलेच पाहिजेत' असा इशारा दिला आहे. औपचारिक निषेध नोंदवण्यासाठी भारताने नवी दिल्लीतील अमेरिकेच्या 'चार्ज डी'अफेअर्स' अर्थात प्रभारी राजदूतांना समन्स बजावले.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी पश्चिम आशियातील समुद्र प्रदेशात व्यापारी जहाजांवर सततचे हल्ले होत असल्याचा विषय अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगितले. या हल्ल्यांचा थेट संबंध पश्चिम आशियातील युद्धाशी आहे, असेही ते म्हणाले. ओमानच्या समुद्र किनाऱ्याजवळ एका जहाजावर झालेल्या हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. या हल्ल्यात दुर्दैवाने तीन भारतीय नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

### 'सततचे हल्ले अत्यंत चिंताजनक'

■ भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते पुढे म्हणाले, या प्रदेशात व्यापारी जहाजांवर होणारे सततचे हल्ले अत्यंत चिंताजनक असून, या भागात सुरू असलेल्या संघर्षाचाच हा थेट परिणाम आहे. हे हल्ले थांबलेच पाहिजेत आणि पूर्णपणे संपले पाहिजे. संवाद आणि मुत्सद्देगिरीने संघर्षातून मार्ग काढण्याचे आम्ही आवाहन करतो, जेणेकरून या प्रदेशात लवकरात लवकर शांतता आणि स्थिरता परत येऊ शकेल, असे आवाहन भारताने अमेरिका आणि इराणला केले आहे. ओमानजवळ भारतीय खलाशी असलेल्या तीन परदेशी ध्वजवाहक जहाजांवर झालेल्या हल्ल्यांनंतर भारताकडून ही भूमिका मांडण्यात आली आहेत.

# 'कॉकरोच जनता पार्टी'चे पुण्यात आंदोलन

लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू? ▶ आंदोलनात तरुणाचा संताप अनावर

**पुणे, वृत्तसंस्था :**

दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनानंतर 'कॉकरोच जनता पार्टी'ने ११ जून रोजी पुण्यात आंदोलन केले. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन पुकारले आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू? असा संताप तरूणांनी आंदोलनस्थळी व्यक्त केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन करण्यात आले असून परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे. आंदोलनस्थळी सकाळपासून विद्यार्थी, पालक आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेक जण शिक्षण व्यवस्थेतील समस्या आणि आपल्या भावना व्यक्त करताना दिसले. यावेळी आंदोलनासाठी जमलेल्या विद्यार्थ्यांनी विविध अशयांचे पोस्टर्स सोबत आणले होते.



एका पोस्टरवर लिहिले होते, 'देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र आणि पेपर फोडण्यात धर्मेंद्र'. एकूणच विद्यार्थ्यांकडून चांगलाच प्रतिसाद या आंदोलनाला मिळत असल्याचे दिसून आले आहे. यावेळी बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांना या लोकांमुळे आत्महत्या करावी लागली आहे. तरी सुद्धा हे लोक बिनलाजासारखे खुर्चीला चिटकून बसले आहेत. या सिस्टममुळे या विद्यार्थ्यांना जीव द्यावा लागला आहे.

### 'सत्य आणि अहिंसा माझा मार्ग'

सोनम वांगचूक म्हणाले, आपल्या देशात असे म्हटले जाते की 'तमसो मा ज्योतिर्गमय'. देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी शिक्षण आणि पर्यावरण हे दोन माझे मुद्दे आहेत. सत्य आणि अहिंसा माझा मार्ग आहे आणि न्याय हे माझे ध्येय आहे. पुढे ते म्हणाले, जो अन्याय परीक्षांमध्ये होत आहे, मला तर शिक्षणात मोठा अंधकार दिसत आहे. परीक्षेतही घोटाळे व्हायला लागले तर विद्यार्थी कुठे जाणार?

## अजितदादांप्रमाणे कडक निर्णय घेणार : सुनेत्रा पवार



**मुंबई, वृत्तसंस्था :**

२७ वर्षापूर्वी स्वाभिमानातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. अनेक दिग्गज नेत्यांचे कार्यकर्त्यांचे पक्षाच्या जडणघडणीत मोठे योगदान असून पक्षाच्या हिताला प्राधान्य देऊन कार्यकर्त्यांना संधी देणार, असे मत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. पक्षाचा २७ वा वर्धापन दिन साजरा करताना भावनिक वातावरण आहे. आपल्या सर्वांचे नेते अजितदादा आपल्यात नाहीत. त्यांच्याशिवाय साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असल्याचे पवार म्हणाल्या. राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून वेगळ्या परिस्थितीत मी जबाबदारी घेतली आहे. येणाऱ्या सगळ्या गोष्टींची मला जाणीव होती. पदाधिकारी कार्यकर्ता आणि त्यांची निष्ठा माझ्या लक्षात आहे, असे मत सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले.

## एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यांवर

घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय..

**मुंबई, वृत्तसंस्था :**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सुमारे ८६ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रतापराव सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची ऐतिहासिक घोषणा केली. यासोबतच कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

महामंडळाच्या मुख्यालयात गुरूवारी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत आयोजित बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक व प्रशासकीय मागण्यांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली. बैठकीच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे सर्व कर्मचारी संघटनांना सामंजस्याची भूमिका घेऊन महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे, असे आवाहन केले. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तात्काळ प्रभावाने एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

## बीबीए, बीसीए सीईटीचा निकाल जाहीर

राज्यातील पाच विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण..

**मुंबई, वृत्तसंस्था :**

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे गुरुवारी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. एमएचटी सीईटी पीसीबी ग्रुपच्या निकालानंतर आता बहुप्रतिक्षित बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम आणि बीएचएमसीटी या अभ्यासक्रमांचा निकाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या परीक्षेत राज्यातील पाच गुणवंतांनी परिपूर्ण '१०० पर्सेन्टाईल' गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

■ काही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत १०० टक्के गुण मिळवले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये ठाणे येथील अर्जुन ब्रीद, पुणे येथील इभाड वेदांत राजेश, सोलापूर येथील खिल्ती हेमल शाह, रायगड येथील ओजस उदय पवार तसेच महाराष्ट्राबाहेरील जयपूर येथील निकेत खत्री यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण मिळवत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

ही सामायिक प्रवेश परीक्षा २८ आणि २९ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण चार सत्रांमध्ये ऑनलाइन पद्धतीने पार पडली होती. या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राज्यभरातून एकूण ७१ हजार ६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६२ हजार ३०० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात परीक्षा दिली. परीक्षेला विद्यार्थ्यांची उपस्थिती तब्बल ८७.६६ टक्के इतकी लक्षणीय होती. यंदाच्या निकालात पाच विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवून अव्वल येण्याचा बहुमान मिळवला आहे.

## १३५ एनबीएफसी कंपन्यांचे परवाने रद्द; आरबीआयची मोठी कारवाई

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) देशातील नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपन्यांवर (एनबीएफसी) मोठी कारवाई करत तब्बल १३५ कंपन्यांची नोंदणी रद्द केली आहे. या निर्णयामुळे वित्तीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून विशेषत: पश्चिम बंगाल मधील अनेक कंपन्यांना मोठा फटका बसला आहे.

आरबीआयने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात या कारवाईची माहिती दिली. रिझर्व्ह बँक कायदा १९३४ मधील कलम ४५-आयए (६) अंतर्गत ही कारवाई करण्यात



आली आहे. नियमांचे पालन न करणे, आर्थिक निकष पूर्ण न करणे आणि इतर आवश्यक अटींचे उल्लंघन केल्यामुळे या कंपन्यांची नोंदणी रद्द करण्यात आली. ज्या कंपन्यांवर कारवाई झाली आहे त्यामध्ये एक्सप्रेस फिनकॅप हाऊस, अक्षय फिस्कल सर्व्हिसेस, टाइम्स फायनान्स, ज्युपिटर प्रोजेक्ट्स, ज्युपिटर फिनवेस्ट, एसेल फायनान्स बिझनेस लोन्स आणि सिटीवाइड फायनान्शियल सर्व्हिसेस यांसारख्या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्या कर्जवाटप, गुंतवणूक, लीजिंग आणि इतर आर्थिक सेवा पुरवण्याचे काम करत होत्या. आरबीआयच्या माहितीनुसार, नोंदणी रद्द झालेल्या बहुतांश कंपन्यांची मुख्य कार्यालये पश्चिम बंगालमध्ये आहेत. त्यामुळे राज्यातील वित्तीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

**नियमांचे पालन न करणाऱ्या संस्था विरोधात कठोर भूमिका..** याआधी मे महिन्यातही आरबीआयने मोठी कारवाई करत सुमारे १५० एनबीएफसी कंपन्यांची नोंदणी रद्द केली होती. त्यावेळी दिल्ली आणि पश्चिम बंगालमधील सर्वाधिक कंपन्यांवर कारवाई केली होती. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वित्तीय संस्था विरोधात आरबीआयने कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.

### आता ठेवी स्वीकारू शकणार नाहीत

■ आरबीआयने स्पष्ट केले की, ज्या कंपन्यांची नोंदणी रद्द झाली आहे किंवा ज्यांनी परवाने परत केले आहेत, त्या आता जनतेकडून ठेवी स्वीकारू शकणार नाहीत. कर्जवाटप किंवा इतर कोणतीही वित्तीय सेवा देण्यास त्यांना परवानगी नाही.

त्यांच्या कामाची किंमत दरमहा ३० हजार रुपये

# महिलांना गृहिणी नव्हे, राष्ट्रनिर्मात्या म्हणा : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

कुटुंबात गृहिणीचे योगदान केवळ घरापुरते मर्यादित नसून राष्ट्र उभारणीत ती मोलाची भूमिका बजावते. अपघातात गृहिणीचा मृत्यू किंवा ती दिव्यांग झाल्यास मोटार वाहन कायद्यांतर्गत मोटार अपघात दाव्यांमध्ये गृहिणीने दिलेल्या कौटुंबिक काळजीचे नुकसान हा भरपाईचा एक स्वतंत्र आणि महत्त्वाचा भाग मानला जावा, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीच्या या कौटुंबिक सेवांचे मूल्य किमान ३० हजार रुपये प्रति महिना निश्चित केले आहे.

एका मोटार अपघात विमा



दाव्याच्या अपीलावर निकाल देताना न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. के. सिंग यांच्या खंडपीठाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. निकाल सुनावताना न्यायमूर्ती करोल म्हणाले, आमचे असे मत आहे, की गृहिणी ही राष्ट्राच्या प्रगती मध्ये मोठे योगदान देते. गृहिणी राष्ट्र उभारणीचे काम करते. म्हणूनच राष्ट्र निर्मात्या म्हणून गृहिणीच्या कौटुंबिक काळजीच्या नुकसानाचे मूल्य कोणत्याही परिस्थितीत किमान ३० हजार रुपये प्रति महिना असावे, असे आम्ही निश्चित केले आहे.

**सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना महत्त्वाचे निर्देश..** सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांच्या मुख्य न्यायाधीशांना अशा प्रकरणांवर वैयक्तिकरीत्या लक्ष ठेवण्याचे आणि वेळेवर निपटारा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासकीय निर्देश जारी करण्याचे आवाहन केले आहे. न्यायालयाने हे देखील पुनरुच्चारित केले की, नुकसानभरपाई व्यावहारिक असावी. सर्वोच्च न्यायालयाने यावर जोर दिला की, ती कोणासाठीही अचानक आणि फायदेशीर लॉटरी नसावी किंवा इतकी लहानही नसावी की त्यामुळे पीडितेची थट्टा होईल.

### गृहिणीला आता 'राष्ट्रनिर्माता' म्हणून ओळख

■ मोटार अपघात दाव्यांमध्ये भरपाई देताना सर्वोच्च न्यायालयाच्या 'प्रणय सेठी' प्रकरणातील निकालात नमूद केलेल्या निकषांव्यतिरिक्त 'कौटुंबिक काळजीचे नुकसान' हा एक अतिरिक्त आधार मानला जाईल, असे स्पष्ट करत आम्हाला आशा आणि विश्वास आहे की, 'होम मेकर' (गृहिणी) या शब्दाला आता 'राष्ट्रनिर्माता' म्हणून ओळखले जाईल, असेही न्यायमूर्ती करोल यांनी नमूद केले.

## तेजस विमानांच्या पार्ट्समध्ये अफरातफर



**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलाच्या ताफ्यातील महत्त्वाचे आणि स्वदेशी लढाऊ विमान असलेल्या तेजस विमानाचे काही सुटे भाग पुरवताना संबंधित पुरवठादार कंपनीने अफरातफर केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडने हैदराबादस्थित पुरवठादार कंपनी असलेल्या टीईसी एअरोडिव्हाइसेस या कंपनीच्या विरोधात फसवणुकीबद्दल गुन्हा दाखल केला आहे. या कंपनीने लढाऊ विमानांच्या संवेदनशील पार्ट्सच्या पुरवठ्यासाठी १९९ बानवट आणि कपोलकल्पित चाचणी अहवाल सादर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## भाजपच्या तीन जागा बिनविरोध

**भोपाळ, वृत्तसंस्था :**



मध्यप्रदेशातील तिन्ही राज्यसभा जागांवर भाजप उमेदवारांना निवडणूक प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. अशा प्रकारे रजनीश अग्रवाल, तरुण चुग आणि महेश केवट राज्यसभेसाठी बिनविरोध निवडून आले आहेत.

यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशातून राज्यसभा जागेसाठी मीनाक्षी नटराजन यांचे नामांकन रद्द झाल्याच्या विरोधात काँग्रेसच्या याचिकेवरील सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली होती. दुसरीकडे, या प्रकरणावर निवडणूक आयोगानेही कोणताही निर्णय दिला नाही. यापूर्वी गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान काँग्रेसचे वकील अभिषेक मनु सिंघवी म्हणाले, या प्रकरणावर आजच सुनावणी होणे आवश्यक आहे, कारण उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दुपारी ३ वाजेपर्यंतच वेळ आहे. यावर निवडणूक आयोगाने म्हटले, आम्हाला या याचिकेची प्रतच दिली नाही. ती वाचण्यासाठी वेळ हवा आहे. यावर सिंघवी म्हणाले, सुनावणी उद्या झाली तरी चालेल, पण तोपर्यंत निकाल घोषित करू नये. यानंतर न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकरणांमध्ये कायदा आधीच निश्चित आहे. याचिका उद्यासाठी सूचीबद्ध केली जाते. काँग्रेसने ही याचिका बुधवार-गुरुवारच्या मध्यरात्री १ वाजून ४८ मिनिटांनी डिजिटल माध्यमातून दाखल केली होती.

## लाडकी बहीण योजना : रखडलेला हप्ता लवकरच लाभार्थ्यांच्या खात्यात

# ३४४ कोटी रुपयांच्या निधीस शासनाची मंजुरी

**मुंबई / वृत्तसंस्था**

राज्यातील लाखो महिलांसाठी महत्त्वाची मानली जाणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. मे महिन्याच्या हप्त्याच्या वितरणासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले असून सामाजिक न्याय विभागाने तब्बल ३४४ कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे मे महिन्याचा रखडलेला हप्ता लवकरच लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता वाढली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला लाभार्थ्यांच्या हप्त्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून स्वतंत्र निधी दिला जातो. १० जून रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, मे महिन्याचा हप्ता वितरित करण्यासाठी ३४४ कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.या निर्णयामुळे निधीअभावी वितरण प्रक्रियेत येणारा अडथळा दूर झाला असून हप्त्याच्या जमा प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या भाजप आमदार मोनिका राजळे यांनी लाभार्थी महिलांना दिलासादायक माहिती दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मे महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता १२ ते १५ जूनदरम्यान महिलांच्या बँक खात्यात जमा होऊ शकतो. अर्थात, याबाबत अंतिम अधिकृत घोषणा राज्य सरकारकडून होणे बाकी आहे. मात्र निधी मंजूर झाल्यामुळे वितरणाची प्रक्रिया लवकर सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर राज्यभरातून मोठ्या प्रमाणात अर्ज आले होते. सुरुवातीला या योजनेचे लाभार्थी कोट्यवधींच्या संख्येत पोहोचले होते. मात्र, नंतर राज्य सरकारने ई-केवायसी प्रक्रिया सक्तीची केली. त्यानंतर अनेक लाभार्थ्यांची पडताळणी करण्यात आली. यामुळे ई-केवायसी न करणाऱ्या महिलांचे अर्ज बाद झाले. तसेच काही लाभार्थी पात्रतेबाहेर असल्याचे आढळुन आले आहे.



### महिलांचे लक्ष वितरणाकडे

३४४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यानंतर आता राज्यातील लाखो लाभार्थी महिलांचे लक्ष महिला व बालविकास विभागाकडून हप्ता वितरणाची प्रक्रिया कधी सुरू केली जाते याकडे लागले आहे. सरकारकडून अधिकृत वेळापत्रक जाहीर झाल्यास मे महिन्याचा रखडलेला हप्ता काही दिवसांतच लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता आहे.

## बंडखोर उभे करणे ही भाजपची जुनी कार्यपद्धती

### उबाठाचे नेते भास्कर जाधव यांची टीका

**मुंबई / वृत्तसंस्था**

बंडखोर उभे करणे ही भाजपची जुनी कार्यपद्धती आहे. ज्या-ज्या ठिकाणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला उमेदवारी देण्यात आली, तिथे भाजपनेच आपले बंडखोर उमेदवार उभे केले. शिंदे गटाला १७ पैकी १० जागांची अपेक्षा होती, पण त्यांच्या वाट्याला केवळ चार जागा आल्या. आता त्यांचे उमेदवार निवडून आले तर त्याचे श्रेयही भाजप स्वत:कडे घेईल, असा टोला महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना उबाठा नेते भास्कर जाधव यांनी लगावला.

चिपळूण येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जाधव यांनी केंद्रातील मोदी सरकार, भाजप, महायुती आणि राज्यातील सत्तासमीकरणांवर जोरदार टीका केली. देशातील राजकारणात भाजपला प्रभावी आव्हान द्यायचे असेल, तर विरोधी पक्षांनी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महिला पंतप्रधानपदाचा



चेहरा जाहीर करावा, असे वक्तव्य शिवसेना उबाठा पक्षाचे नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी केले. महिला पंतप्रधानपदाचा उमेदवार जाहीर झाला, तर देशाच्या राजकारणात मोठा चमत्कार घडू शकतो, असे सांगत त्यांनी नव्या राजकीय चर्चेला तोंड फोडले. विरोधकांनी एकत्र येऊन पंतप्रधान पदासाठी महिला नेतृत्व पुढे आणावे, अशी भूमिका मांडताना जाधव म्हणाले की, देशातील महिला मतदारांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत एखाद्या सक्षम महिला नेत्याला पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून पुढे केले, तर त्याचा मोठा राजकीय परिणाम होऊ शकतो.

### हुजरेगिरी करतात म्हणून महाजन मंत्री

मतदानाचा हक्क हळूहळू कमकुवत केला जात आहे. अनेक ठिकाणी निवडणुका बिनविरोध होत आहेत. त्यामुळे मतदानाचे महत्व कमी होत चालले आहे. ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे, असे ते म्हणाले. पेट्रोल-डिझेलचे वाढते दर, खतांची टंचाई, बेरोजगारी आणि महागाई यासारख्या प्रश्नांवरून त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. महात्मा गांधी, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या हत्यांबाबत भाजपला कधीही दु:ख वाटले नाही. पंजाबमध्ये जाऊन इंदिरा गांधी यांच्या हत्येचे समर्थन करणाऱ्यांना राष्ट्रप्रेमी म्हणता येणार नाही, असा आरोप त्यांनी केला. तसेच, गिरीश महाजन यांच्यासारखे नेते केवळ कोणाची तरी हुजरेगिरी करतात म्हणून मंत्री झाले आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

## ज्येष्ठ नागरिकाला मारहाण; राज्यात संताप

**ठाणे / वृत्तसंस्था**

ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयाबाहेर घडलेल्या एका धक्कादायक घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. किरकोळ कारणावरून एका परप्रांतीय ओला चालकाने ज्येष्ठ नागरिकाला भररस्त्यात बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, या प्रकरणाने पुन्हा एकदा परप्रांतीयांच्या दादागिरीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणाची राज्यभर चर्चा सुरू असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या घटनेची दखल घेतली. मनसे नेते अविनाश जाधव यांच्या माध्यमातून राज ठाकरे यांनी मारहाण झालेल्या वृद्ध व्यक्तीशी दूरध्वनीवरून संवाद साधला.या संवादादरम्यान त्यांनी वृद्धांच्या प्रकृतीची विचारपूस केली तसेच न्याय मिळवून देण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिल्याची माहिती



समोर आली आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटल परिसरात एका वृद्ध व्यक्तीने रस्त्यावर थुंकण्याबाबत संबंधित चालकाला जाब विचारला होता. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. मात्र, वादानंतर चालकाने आपला संताप गमावत थेट वृद्ध व्यक्तीवर हल्ला चढवला.व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही आणि मोबाईल व्हिडिओमध्ये आरोपी चालक वृद्धाला धक्काबुक्की करताना, आणि जमिनीवर पाडून मारहाण करताना दिसत आहे.

## रेश्मा काळेंनी वाढवली भाजपची डोकेदुखी

### विधान परिषद निवडणूक : मैदानात कायम राहण्याचा निर्धार

**जळगाव / वृत्तसंस्था**

नाशिक विधान परिषद निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) समर्थित अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी अखेर माघार घेत महायुतीचे उमेदवार संजय पवार यांना पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे नाशिकमधील बंडखोरीचा अध्याय संपुष्टात आला असला, तरी जळगावमध्ये मात्र महायुतीसमोरील संकट कायम आहे. शिवसेना शिंदे गटाच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी निवडणूक मैदानात कायम राहण्याचा निर्धार व्यक्त केला असून, त्या कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नसल्याचे संकेत दिले आहेत.

जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार असताना रेश्मा काळे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली होती.



त्यांच्या उमेदवारीमुळे महायुतीच्या मतविभाजनाची शक्यता निर्माण झाली असून, त्यामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची बनली आहेत.नाशिकमध्ये गोकुळ गिते यांनी माघार घेतल्याने जळगावमध्येही तशाच प्रकारची घडामोड होईल, अशी चर्चा सुरू होती. मात्र रेश्मा काळे यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. अनेक दिवसांपासून माझ्या माघारीबाबत चर्चा सुरू आहेत. नाशिकमधील प्रक्रिया पूर्ण होऊ द्या, त्यानंतर पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल. मात्र सध्या मी निवडणूक लढण्याच्या भूमिकेवर ठाम आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे महायुतीची डोकेदुखी आणखी वाढल्याचे मानले जात आहे.

### महायुतीत अंतर्गत नाराजी ?

प्रचारादरम्यान सरिता माळी-कोल्हे यांनी केलेल्या एका वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. अंदर की बात है, भाजप के नगरसेवक हमारे साथ है, असा दावा त्यांनी केला. भाजपमधील काही नगरसेवक आणि स्थानिक लोकप्रतिनिधी रेश्मा काळे यांच्या संपर्कात असल्याचेही त्यांनी सूचित केले. या दाव्यामुळे जळगावमधील महायुतीच्या अंतर्गत नाराजीबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत. मात्र, या दाव्याबाबत भाजपकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

## कुंभार समाजाला मिळणार ७०० ब्रास माती

**मुंबई / वृत्तसंस्था**

राज्यातील कुंभार समाजासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. कुंभार समाज, मूर्तीकार आणि विटा बनविणाऱ्या कारागिरांना वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती आणि आवश्यक वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

कुंभार समाजाची ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आश्वासन दिले होते. मध्य प्रदेशमधील धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही योजना लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पारंपरिक व्यवसाय टिकवण्यासाठी कुंभार समाजाला मोठा दिलासा मिळणार आहे.योजनेअंतर्गत महसूल विभागाकडून राज्यातील कुंभार कुटुंबांची नोंदणी केली जाणार असून, संबंधित कुटुंबांना ओळखपत्र दिले जाईल. या ओळखपत्राच्या आधारे



वर्षभरात गरजेनुसार पाझर तलाव, जलसंधारण तलाव आणि अन्य ठिकाणांवरील उपयुक्त मातीचा पुरवठा केला जाणार आहे. याशिवाय, माती उत्खननासाठी स्वतंत्र क्लस्टर निश्चित करण्याची तरतूदही शासन निर्णयात करण्यात आली आहे. त्यामुळे मूर्तीकार, मडकी बनविणारे कारागीर आणि कुंभार समाजातील हजारो कुटुंबांना थेट फायदा होणार आहे. राज्यातील पारंपरिक मातीच्या उद्योगाला चालना देण्या सोबतच कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा निर्णय महत्वाचा ठरणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.




### राशीभविष्य

- **मेष** : अनुकूलता वाढत जाईल. उपजत कलेतून अर्थार्जन घडेल. ठाम विचारानं रहावं. धरसोडपणा टाळा.
- **वृषभ** : व्यवसायातील आर्थिक अंदाज चुकतील. जागरूक राहून व्यवहार करावे. अनावश्यक खर्च टाळावे.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात विशेष जागरूक रहावं. नव्या जबाबदाऱ्या वाढवू नका. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत जागरूक रहावं. अनावश्यक खर्चांना सामोरं जाल. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात.
- **सिंह** : आर्थिक व्यवहारात जागरूक रहाव. संततीच्या संगतीकडे दुर्लक्ष नको. शिक्षणात अडचणी येतील.
- **कन्या** : नोकरीत कर्तव्यकर्मास प्राधान्य द्यायवं. स्थावर प्रश्न सुटणार नाही. वाहनांपासून जपून असावं.
- **तूळ** : कौटुंबिक जीवनात सामंजस्यानं रहावं. आर्थिक स्थिती सुधारेल. सरकारी कामांना चालना मिळेल.
- **वृश्चिक** : समस्यांमधून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात समाधान लाभेल. अनुकूलता वाढत जाईल.
- **धनु** : घाईने निर्णय घेऊ नका. जीवन साथीदाराच्या प्रकृतीस जपायला हवं. मनाविरूध्द घटना संभवतात.
- **मकर** : नव्या योजना विचारानं राबवाव्यात. अनावश्यक खर्च कसोशीनं टाळावेत. फार दगदग करू नका.
- **कुंभ** : सरकारी कामं चिकाटीनं होतील. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. समस्या राहणार आहे.
- **मीन** : विनाकारण दडपण येईल. सरकारी कामं विचारपूर्वक करावी. अनावश्यक जबाबदारी स्वीकारू नका.

### दिन विशेष

**१२ जून**

**जागतिक बालकामगार निषेध दिन**

२००० : मराठी मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या पु.ल.देशपांडे यांचे निधन.


२००३ : प्रसिद्ध अमेरिकी अभिनेता ग्रेगरी पेक यांचे निधन.

२०१५ : दिल्लीतील महाराष्ट्र सदन उभारणीत भ्रष्टाचारप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तीन अधिकारी निलंबित.

२०१८ : प्रसिद्ध आध्यात्मिक गुरू भय्यू महाराज यांनी राहत्या घरी स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली.

### आरोग्यमंत्र — गुणकारी 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'

'होलिस्टिक डेंटिस्ट्री' हा दातांवरच्या उपचारपद्धतींचा एक प्रकार आहे. या उपचारपद्धतीत दातांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेतली जाते. या पद्धतीविषयी...



✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री' ही नावाप्रमाणे तोंडाच्या संपूर्ण आरोग्याची काळजी घेणारी उपचारपद्धती आहे. सर्वसामान्य उपचारपद्धतीत हिरड्या आणि दात यांच्या आरोग्यावर भर दिलेला असतो. हिरड्यांशी संबंधित विकारांचा संबंध हृदयविकार, मधुमेह आणि गरोदरपणा अशा विकारांशी असल्याचं बऱ्याच संशोधनांमधून समोर आलं आहे. तोंडाचं आरोग्य टिकवून ठेवलं तर व्यक्ती निरोगी राहू शकते, असं दंततज्ज्ञ मानतात. 'होलिस्टिक डेंटिस्ट्री' याची अंमलबजावणी करते. ✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'मुळे तोंडाचं आरोग्य सुधारतं. या उपचारपद्धतीमुळे दातांशी संबंधित छुप्या आजारांची माहिती मिळू शकते. ✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'त 'सेरेक रेस्टोरेशन्स' ही उपचारपद्धती वापरली जाते. ही उपचारपद्धती दातांमधले खड्डे बुजवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पारंपरिक उपचारपद्धतीपेक्षा अधिक उपयुक्त, टिकाऊ आहे. यामुळे दातांची संरचना बळकट होते. ✻ या उपचारपद्धतीत विषारी रसायनं तसंच घटकांचा वापर केला जात नाही. सर्वसाधारण उपचारपद्धतीत विषारी रसायनांचा वापर केला जातो. याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. उदाहरण द्यायचं झालं तर दातांमध्ये भरण्यात येणाऱ्या चांदीत पाऱ्याचं प्रमाण ५० टक्के असतं.

### स्टाईल स्टेटमेंट — चलती ट्रेंडी टॉप्सची

छानसा टॉप तुमचा संपूर्ण लूक बदलून टाकतो. योग्य ॲक्सेसरीज आणि बॉटम कॅरी करून तुम्ही उठून दिसू शकता. सोबर टॉप्सपासून स्टायलिश टॉप्सपर्यंत प्रचंड व्हरायटी तुम्हाला पहायला मिळते.

✻ भरजरी आणि टेक्स्चर्ड पॅटर्नची आवड असेल तर तुम्ही नक्षीकाम केलेले टॉप्स निवडू शकता. बॉटमवर त्याच रंगाचा टॉप घालता येईल किंवा ड्युअल टोनही कॅरी करता येईल. ✻ पिवळ्या रंगाच्या टॉप्सची कायमच चलती असते. या रंगात स्टायलिश पॅटर्न्सची निवड करा. वेगवेगळे कट्स ट्राय करा. ✻ फ्लेअर्ड किंवा घेरवाले टॉप्स हा सुद्धा मस्त ऑप्शन आहे. वेगवेगळे प्रिंट्स, स्ट्राईप्स, चेक्समध्ये खेळा. स्लीव्हजचे वेगळे पॅटर्नही ट्राय करा. ✻ साध्या प्लेन व्हाईट टॉपलाही स्टायलिश बनवता येईल. ट्रेंडी गळे, नव्या जमान्याच्या स्लीव्हज असणारे व्हाईट टॉप्स निवडा. ✻ थोडा बोल्ड लूक आवडत असेल तर ऑफ शोल्डर कट्सवाले टॉप्स घ्या. डेनिम्स, शॉर्टस, स्कर्ट किंवा ट्राउजर्सवर ते घालता येतील.

### सफर देशांची — स्लोव्हाकियाविषयी...

स्लोव्हाकिया हा मध्य युरोपमधला छोटासा देश आहे. एकेकाळी हा झेकोस्लोव्हाकियाचा भाग होता. ७५ वर्षं या भूभागावर सोव्हियत युनियन म्हणजे सध्याच्या रशियाचं राज्य होतं. १९९० मध्ये हा भाग सोव्हियत युनियनपासून वेगळा झाला आणि १९९३ मध्ये तो झेक रिपब्लिकपासून वेगळा होऊन स्वतंत्र झाला. ब्रातिस्लाव्हा ही या देशाची राजधानी आहे. या देशातले लोक स्लोव्हाक भाषा बोलतात. झेक रिपब्लिक, पोलंड, युक्रेन, हंगेरी आणि ऑस्ट्रिया हे या देशाचे शेजारी आहेत. स्लोव्हाकिया चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला आहे. स्लोव्हाकियाचा बराचसा भूभाग डोंगराळ आहे. देशाच्या उत्तरेला कारपाथियन पर्वतरांगा आहेत. टॅट्रा या इथल्या सर्वात उंच पर्वतरांगा आहेत. इथे उन्हाळ्यात खूप गरम होतं तर थंडीत आर्द्रता बरीच जास्त असते. डन्यूब, वाह आणि एचरॉन या इथल्या प्रमुख नद्या आहेत. या देशात अनेक प्रजातींचे पक्षी आहेत. अस्वलं, लांडगे, रानमांजरं, मिंक असे प्राणी इथे आढळतात. या देशात विविध उत्पादनांची निर्मिती होते. मोठ्या प्रमाणात शेतीही केली जाते. धातूचं उत्पादन हा या देशातला प्रमुख उद्योग आहे. या देशात नैसर्गिक साधनसंपत्तीही भरपूर प्रमाणात आहे.

### पंचांग

**शुक्रवार, १२ जून २०२६**

पराभवनाम संवत्सर शके १९४८, अधिक ज्येष्ठ कृ. १२, चंद्रराशी : मेष, नक्षत्र : अश्विनी/भरणी, योग : अतिगंड, सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१४

### फॉरवर्ड्स

**आख़िर तक़ आपके साथ वहीं ठहरेंगे...**

**जिन्हें फ़ायदा नहीं आपकी फ़िकर हैंहैं...!!**

### फॅशन पॅशन

ओव्हरसाइज्ड आउटफिट्स म्हणजे नेहमीपेक्षा थोडे ढगळ कपडे. ८० आणि ९० च्या दशकात हा ट्रेंड खूपच लोकप्रिय होता. आता तो परत आला आहे. या ट्रेंडवर एक नजर टाकू या. खांद्यांवरून खाली येणारे ब्लेझर्स, लूज फिटिंगवाल्या पँट्स ही फॅशनला विचित्र म्हणता येणार नाही. मध्यंतरी महिलांनी अशी ओव्हरसाईज्ड फॅशन कॅरी केली होती. पण आता हा ट्रेंड मुलांच्या फॅशनविश्वात येऊन धडकला आहे. हा ट्रेंड सेट करण्यात आयुषमान खुराना, रणवीर सिंह, कार्तिक आर्यन अशा बॉलिवूड स्टार्सचा महत्त्वाचा वाटा आहे. **(क्रमश:)**

### करिअरवाटा — जपा संपन्न वारसा

आपल्या देशाला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. ऐतिहासिक वास्तू, गड–किल्ले यांच्या माध्यमातून देशाच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष पटते. मात्र या ऐतिहासिक स्थळांचं जतन आणि संवर्धन या बाबीही महत्त्वाच्या ठरतात. विशेषत: नव्या पिढीला हा ऐतिहासिक वारसा पाहता यावा यासाठी प्रयत्न होणं गरजेचं आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित क्षेत्रात संशोधनाला मोठा वाव आहे. आपल्याकडे इतिहासाच्या जाणकारांची संख्या खूप कमी आहे. त्यामुळे इथे मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्याचप्रमाणे पुरातत्व संशोधन आणि पुरातत्वीय अवशेष जतन करून ठेवण्याच्या शास्त्रामध्ये अपरिमित संधी उपलब्ध आहेत. नॅशनल अर्काइव्हज् ऑफ इंडिया या संस्थेतर्फे स्कूल ऑफ अर्काइव्हल स्टडीज् ही शाखा स्थापन करण्यात आली असून तिच्यामार्फत पदविका अभ्यासक्रम सुरू आहे. कोणताही पदव्युत्तर पदवीधर या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. त्याला अर्काइव्ह मॅनेजमेंट, पब्लिक रेकॉर्डस् मॅनेजमेंट, कन्झर्व्हेशन ॲन्ड रिप्रोग्राफी तसंच इन्फर्मेशन ॲन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी या चार विषयांचं ज्ञान दिलं जातं. आवड असेल तर जरुर या क्षेत्राचा विचार करावा.




### खेचाखेची

**पत्ता !**

झम्प्या एका सुंदर मुलीला विचारतो, तुम्ही कुठे राहता?

**मुलगी** : एम. जी. रोड

**झम्प्या** : एवढ्या सुंदर असून तुम्ही रस्त्यावर राहता......?

### वेगळं काही

सध्या ८९ वर्षांच्या असणाऱ्या अर्नेस्टाइन शेफर्ड यांनी वयाच्या ७१ व्या बॉडीबिल्डिंग सुरू केलं. पन्नाशीपर्यंत त्या गृहिणीच होत्या. एके दिवशी कुटुंबासोबत फिरायला गेल्या असताना पतीने त्यांना स्वीमसूट घालायला सांगितला. त्यावेळी त्यांच्या बहिणीनेही स्वीमसूट घातला. त्या दोघी खूपच बेढब दिसत होत्या. मग त्यांनी व्यायाम करण्याचा निर्णय घेतला. मधल्या काळात बहिणीचं निधन झालं. मात्र त्या मागे हटल्या नाहीत. ७१ व्या वर्षी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सात महिने सराव केल्यानंतर पहिल्या बॉडीबिल्डिंग स्पर्धेत सहभागी व्हायला त्या तयार झाल्या. पहिलीच स्पर्धा त्यांनी जिंकली. आता त्या प्रौढ महिलांना बॉडीबिल्डिंगचं प्रशिक्षण देतात.

### सौंदर्यसाधना — फॉर परफेक्ट मेक अप

मेक अप चांगला व्हावा अशी इच्छा असेल तर ब्रशेसचा वापर करायला हवा. मेक अप ब्रशचे प्रकार आणि वापर याविषयीची ही उपयुक्त माहिती.



✻ फाउंडेशन ब्लेंडिंग ब्रश– हा मेक अपचा बेसिक ब्रश आहे. या ब्रशने त्वचेवर हळू हळू फाउंडेशन पसरावं. यामुळे ते योग्य प्रकारे पसरलं जातं. ✻ कन्सिलर ब्रश– चेहऱ्यावरील डाग लपवण्यासाठी कन्सिलरचा वापर केला जातो. ब्रशच्या सहाय्याने कन्सिलर अधिक चांगल्या पद्धतीने लावलं जातं. डार्क सर्कल, सुरकुत्या, बारीक रेषा लपवण्यासाठी या ब्रशच्या निमुळत्या टोकाने कन्सिलर पसरावं. ✻ पावडर ब्रश– कन्सिलरनंतर पावडरचा क्रमांक येतो. त्वचेवर पावडर योग्यप्रकारे सेट होण्यासाठी या ब्रशचा वापर करावा. हा ब्रश ब्लश लावण्याच्या कामीही उपयोगी ठरतो. ✻ ब्लेंडिंग ब्रश– आयशॅडो लावण्यासाठी ब्लेंडिंग ब्रश परफेक्ट आहे. हा ब्रश मुलायम आणि लवचिक असतो. त्यामुळे आयशॅडो अगदी सहजतेने लावणं शक्य होतं. शंकू आकारातील ब्रश डोळ्याच्या वरच्या कोनांपर्यंतही सहजपणे पोहचू शकतो. ✻ हाय लायटर ब्रश– मेक अप खुलवण्यासाठी या ब्रशचा उपयोग होतो.

दैनिक
महाभूमि
dainikmahabhoomi@gmail.com
शुक्रवार, १२ जून २०२६

# बुलढाणा भूमि

**हवामान अंदाज**

सूर्योदय : ५.४२ सकाळी
सूर्यास्त : ७.०६ सायं.
तापमान
कमाल : ३७°
किमान : २६°

**सोने-चांदी**

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) १३६५९०
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) १४९०००
चांदी (प्रति किलो) २३६३००

**दखल...**

### डोळस विचार

अरे डोळस बांधवांनो – –
अंधांच्या समस्यांची
ठेवा थोडी जाणीव
बंद डोळ्याने चालुन पहा
समजेल तुम्हा उणिव...

असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी
म्हणवा नाही खोटा
मरणोत्तर नेत्रदान करून
अंधांना दृष्टी देण्यात
सांगा काय आहे तोटा ?

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

## जिल्ह्यात ३० जूनला वाजणार शाळेची घंटा..

# पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती येणार पाठ्यपुस्तके!

**बुलढाणा / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचे शैक्षणिक सत्राला ३० जूनपासून प्रारंभ होत आहे. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके उपलब्ध होणार आहेत. शिक्षण विभागाने यासाठी आवश्यक नियोजन पूर्ण केले असून तालुका व शाळास्तरावर पुस्तकांचे वितरण करण्यात आले आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांनाही वेळेत पाठ्यपुस्तके मिळावीत यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पहिल्या दिवसापासूनच नियमित अध्ययन सुरू करता येणार आहे. तसेच शिक्षकांनाही अध्यापनाचे नियोजन सुरळीतपणे राबविणे शक्य होणार आहे. यापूर्वी काही ठिकाणी पाठ्यपुस्तके उशिरा मिळाल्याच्या तक्रारी होत होत्या. मात्र यंदा शाळा सुरू होण्यापूर्वीच वितरण प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच आवश्यक पुस्तके उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.



३० जूनपासून नियमित वेळापत्रकानुसार शाळांचे कामकाज सुरू राहील.

यापूर्वी शिक्षण विभागाने १५ जूनला शाळा सुरु होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र या विरोधात न्यायालयात दाद मागण्यात आली होती. दरम्यान न्यायालयात ३० जून रोजी विदर्भातील शाळा सुरु करण्याचे आदेश दिल्याने आता ३० जून रोजी शाळेची घंटा वाजणार आहे

### सीबीएसई पुस्तकात शिवरायांवर २० पानांचा धडा

■ रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि त्यांच्या शौर्याची तसेच त्यांच्या दूरदर्शी दृष्टीकोनाची विद्यार्थ्यांना बालपणीच माहिती व्हावी या हेतूने इयत्ता ८ वीच्या सीबीएसई पुस्तकात शिवाजी महाराजांवर २० पानांचा धडा ठेवण्यात आला आहे. यातून शिवरायांचा इतिहास विद्यार्थ्यांना शिकता येणार आहे.

### शालेय गणवेशाचा गुंता कायम

■ येत्या ३० जून रोजी विदर्भातील शाळा सुरू होणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके पडणार आहेत. मात्र शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटपाचा गुंता अजून सुटला नसल्याने गणवेशा संदर्भातील शिक्षण विभागाचे नियोजन सुरू आहे. महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारच्यावतीने 'समग्र शिक्षा अभियान' अंतर्गत मोफत गणवेश वाटप योजना यावर्षीही सुरू ठेवली आहे. या योजनेतंर्गत गणवेश किंवा पालकांच्या बँक खात्यात ६०० ते ९०० रूपयांपर्यत रक्कम पाठविली जाते. जिल्हयात १,४५० पेक्षा अधिक शाळा असून गणवेशाबाबतचा निर्णय येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

## बचत गटांना अर्थसहाय्य देऊन विकास कार्यक्रमांना गती द्या

### जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग यांचे आवाहन




**बुलढाणा/ प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने बचत गटातील महिलांसाठी आर्थिक सहाय्य नियोजन कार्यशाळा बुधवारी बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी येथे पार पडली. यावेळी बचत गटांना अधिकाधिक अर्थसहाय्य उपलब्ध करून देत त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना द्यावी आणि विकासाच्या कार्यक्रमांमध्ये बँकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग यांनी केले.

कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून मावीमचे विभागीय सल्लागार केशव पवार, पोखरा कार्यक्रमाच्या कृषी विभागाच्या नोडल अधिकारी पाटील तसेच जिल्हा समन्वय अधिकारी राजेश नागपुरे उपस्थित होते. कार्यशाळेत विविध बँकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये एसबीआयचे रविकिरण खेडेकर, युबीआयचे अनिल देशमुख, एमकेजीबीचे बाईनोड, सीबीआईचे तायडे, बॅक ऑफ इंडीयाचे प्रसाद देशमुख व अभिजित पंडित, एचडिएफसीचे महेश बरडे, आयसीआयसीआयचे अमित वडगावे यांच्यासह खादी ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र आणि विविध संस्थांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सीएमआरसी व्यवस्थापकांनीही सहभाग नोंदविला.

### ७५.६२ कोटींच्या कर्ज नियोजनाला मंजूरी

■ कार्यशाळेत मावीमच्या वतीने १ हजार ४०३ बचत गट आणि ५०० वैयक्तिक महिला कर्ज प्रकरणांसाठी एकूण ७५.६२ कोटी रुपयांच्या कर्ज नियोजनाला मंजुरी देण्यात आली.

**न्यूज ब्रीफ**

### घरफोडी; पावणे दोन लाखांचा ऐवज लंपास

**बुलढाणा :** घराचे मालक कुटूंबासह लग्न समारंभासाठी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपींनी घरफोडी करून घरातील ९० हजार रूपये रोख रकमेसह सोने,चांदीचे दागिणे व महागडे इलेक्ट्रॉनिक उपकरणे असा १ लाख ७८ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना शहरातील राजेश्वर नगर भागात घडली. या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी राजतनया राजेश जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार जाधव कुटुंब हे छत्रपती संभाजीनगर येथे एका लग्नाचा कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी सेफ्टी डोअरचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

### डोमरूळ ग्रामपंचायतची आरक्षण सोडत जाहीर

**बुलढाणा :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गट ग्रामपंचायत डोमरूळ, टाकळी ची आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी आयोजित ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा पंचायत समितीचे शाखा अभियंता सतिश इंगळे हे होते. तर, महसूलअधिकारी अमोल सुरडकर, ग्रामविकास अधिकारी ए. टी. शिंदे व पोलीस पाटील संघटनेचे राजेश पाटील यांची उपस्थिती होती. डोमरूळ/ टाकळी गट ग्रामपंचायत मध्ये एकूण तीन प्रभाग असून प्रभाग क्रमांक एक मध्ये अनुसूचित जाती स्त्री.,नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री. व तीनमध्ये सर्व साधारण. असे तीन उमेदवार आहेत. प्रभाग क्रमांक दोन मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग, सर्व साधारण स्त्री व सर्व साधारण स्त्री. असे तीन उमेदवार असून प्रभाग क्रमांक तीन मध्ये सर्व साधारण स्त्री, सर्व साधारण तर तीनमध्ये सर्व साधारण. असे तीन उमेदवार आहेत.

### बिरसा मुंडा यांचा संघर्ष अजरामर ठरला

**लोणार :** १८५७ चा स्वातंत्र्य संग्राम दडपल्यानंतरही देशभरात ब्रिटिश सत्तेविरोधातील लढे सुरूच होते. १८९५ ते १९०० या कालावधीत छोटानागपूर परिसरात बिरसा मुंडा यांनी उभारलेली 'उलगुलान' चळवळ विशेष महत्त्वाची ठरली. आदिवासींच्या हक्कांसाठी ब्रिटीशांच्या अन्यायकारक धोरणांविरोधात बिरसा मुंडा यांनी केलेला संघर्ष अजरामर ठरला असे प्रतिपादन बिरसा क्रांती दलाचे अमरावती विभागीय उपाध्यक्ष भगवानराव कोकाटे यांनी केले.

## वाढीव वीज बिलाच्या कारणावरून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**देऊळगावराजा/ प्रतिनिधी**

वाढीव वीज बिलाच्या कारणावरून देऊळगावमही येथील महावितरण कार्यालयात घुसून वरिष्ठ तंत्रज्ञाला शिवीगाळ व मारहाण करत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध देऊळगावराजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

विष्णू माधवराव जायभाये (महावितरण विभाग देऊळगावमही) हे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून देऊळगावमही येथील कार्यालयात कर्तव्यावर होते. दरम्यान राहुल राजेंद्र साळवे व स्वप्नील राजेंद्र साळवे (दोन्ही रा. देऊळगावमही) हे कार्यालयात आले.आम्हाला मीटरचे बिल ९ हजार रुपये कसे काय आले? असे विचारत त्यांनी जायभाये यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे पर्यवसान शिवीगाळीत झाले. दोन्ही आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. इतक्यावरच न थांबता त्यांनी चापटा-बुक्क्यांनी मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. संतप्त झालेल्या आरोपींनी कार्यालयाच्या खिडकीची काचही फोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. घटनेची माहिती मिळताच फिर्यादी विष्णु जायभाये यांनी पोलिस ठाणे गाठून तोंडी रिपोर्ट दिला.

## समता सैनिक दलाच्या दोन दिवसीय शिबिराचा समारोप

**चिखली/ प्रतिनिधी**

तालुक्यातील वाघापूर अंत्री येथील बुद्ध विहार प्रांगणात भारतीय बौद्ध महासभा प्रणित समता सैनिक दलाच्यावतीने दोन दिवसीय पुरुष व महिला प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप सोमवार ८ जून रोजी करण्यात आला.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष पी.बी. इंगोले यांनी सांगितले की, घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ मार्च १९२७ रोजी समता सैनिक दलाची स्थापना केली. अस्पृश्यावर होणाऱ्या अत्याचाराचा प्रतिकार करणे, चळवळीच्या नेत्यांना व सत्याग्रहांना सुरक्षा पुरविणे, आणि शोषित समाजात शिस्त व आत्मसन्मान निर्माण करणे हा या दलाचा मुख्य हेतू असून समता सैनिक दलाचा सैनिक प्रत्येक घराघरात असावा,असे आवाहन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष पी.बी इंगोले, एसएसडी जिल्हाध्यक्ष एकनाथ बोर्डे, तालुकाध्यक्ष बौद्धाचार्य सदाशिव खिल्लारे, सीनियर डिव्हिजन ऑफिसर विलास जाधव, जिल्हा संघटक देविदास बोर्डे, सरचिटणीस दीपकराव कस्तुरे, कोषाध्यक्ष हिम्मतराव कांबळे, उपाध्यक्ष संस्कार शंकरराव जाधव, उपाध्यक्ष पर्यटन सुधाकर मघाडे, पर्यटन सचिव मधुकर मिसाळ, संरक्षण सचिव शेषराव हिवाळे, संरक्षण सचिव साहेबराव बोरकर, पर्यटन सचिव नारायण खंडारे, कार्यालय सचिव गुलाबराव साळवे यांचेसह पत्रकार संजय निकाळजे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले.

### गोदावरी नदीत बोट उलटली; दोन महिलांचा मृत्यू



**बुलढाणा :** माजलगाव तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथे अधिक मासानिमित्त दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची बोट गोदावरी नदीत उलटली. या दुर्घटनेत बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बीबी येथील प्रमिला शेषराव राठोड व कुंबेफळ येथील कांताबाई ज्ञानोबा आंधळे यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अधिक मासात तीन वर्षानंतर हा योग आल्यामुळे भाविकांची पुरूषोत्तमपुरी गर्दी होती. बोटीमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसविण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचे समजते.

## जिल्ह्यातील ३१ हजार लाडक्या बहिणीच्या लाभाला 'आयटीआर' चा खोडा!

**डोणगाव / प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये शासनाने योजना सुरू झाल्यापासून वेळोवेळी विविध कारणाने लाडक्या बहिणीचा लाभ बंद केला असून नवीन निकषानुसार योजनेती लाभार्थी महिलेच्या कुटूंबातील सदस्य आयटीआय(आयकर विवरणपत्र) भरत असेल त्यांचा लाभ बंद करण्यात आला आहे. यामध्ये जिल्ह्यातील ३१ हजार लाडक्या बहिणींचा समावेश आहे.

महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्या, या हेतूने शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू केली. या योजनेतंर्गत जून २०२४ पासून महिलांच्या बँक खात्यात दरमहा पंधराशे रुपये पाठविण्यास सुरुवात झाली खरी पण, त्यानंतर मात्र, शासनाने वेळोवेळी या योजनेमध्ये वेगवेगळे निकष लावले त्यामुळे अनेक महिलांना योजनेच्या लाभापासून मुकावे लागले. शासनाने ई केवायसीमध्ये महिलेचा पती किंवा वडील यांचा आधार क्रमांक घेतलेला होता. या आधारच्या डाटा प्रमाणे महिलेच्या घरामधील जो व्यक्ती आयटीआर भरत असेल, ती महिला उत्पन्नाच्या निकषांमध्ये बसत नाही. त्या महिलेचे उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त होते. या निकषानुसार जिल्ह्यातील ३१ हजारांहून अधिक महिला ज्यांच्या खात्यामध्ये मागच्या महिन्यांमध्ये जो दोन महिन्याचा लाभ मिळाला तो मिळून आला नाही. संबंधित महिलांनी महिला व बालविकाच्या कार्यालयात जाऊन अपडेट पाहिली असता त्यांना आय टी आर रिलेटिव्ह या कारणाने लाभ मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. लाभ नाकारण्यात आलेल्या अनेक महिलांची आर्थिक परिस्थिती गरीब आहे मात्र पतीने बँकेचे कर्ज काढण्यासाठी बँकेला लागते म्हणून आयटीआर दाखल केल्याचे आढळून आले आहे. त्यांना बँकेचे कर्ज तर मिळाले नाही मात्र आयकर विभागाकडून लाडकी बहीण योजनेसाठी डाटा मिळाला त्यामुळे अनेक महिलांना योजनेपासून वंचित रहावे लागत आहे.

### महावितरणची पावसापूर्वीची तयारी



**बुलढाणा :** पावसाळ्याला सुरूवात होत आहे. वादळ वाऱ्यामध्ये वीजेचे तार तुटून वीज पुरवठा खंडित होऊ नये तसेच कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी खबरदारी म्हणून महावितरण विभागाने बुलढाणा शहरात वीज तारांना अडथळा आणणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडण्याची मोहीम सुरू केली आहे.

## कांदा चाळ वादातून महिलेला शिवीगाळ; गुन्हा दाखल

**देऊळगाव राजा/ प्रतिनिधी**

तालुक्यातील सावखेड भोई येथे शेतीच्या जुन्या वादातून झालेल्या भांडणात एका महिलेला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अरुणा कारभारी डोणे (वय ४०, रा. सावखेड भोई, ता. देऊळगाव राजा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी रुख्मिणी तुकाराम डोणे (वय ३२) व गंगा पवार (वय ४०, मूळ रा. आळंदी, ह.मु. सावखेड भोई) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २९६, ३५१(२) व ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी आणि आरोपी हे परस्पर नातेवाईक असून त्यांच्यात शेतीच्या मालकीसंदर्भात जुना वाद आहे. सदर प्रकरण सध्या दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. १० जून रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास सावखेड भोई शिवारात फिर्यादी आणि त्यांचे पती कांदा चाळीतून विखुरलेले कांदे जमा करीत होते. त्यावेळी आरोपी तेथे आले आणि ''तुम्ही आमचे कांदे का भरता?'' असा जाब विचारत वाद घालण्यास सुरुवात केली.

फिर्यादी समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत असताना आरोपींनी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच अश्लील हातवारे करून पुन्हा येथे दिसल्यास संपूर्ण कुटुंबाला ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या लेखी तक्रारीवरून देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रविकांत आढाव यांच्या तक्रारीनंतर कारवाई

## 'त्या' अनधिकृत शाळेची चौकशी पूर्ण; गुन्हे दाखल होण्याची शक्यता!

**डोणगाव/ प्रतिनिधी**

कोणतीही शासकीय मान्यता नसताना आरेगाव रस्त्यावर बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या एका खाजगी प्राथमिक शाळेची शिक्षण विभागामार्फत चौकशी पूर्ण झाली असून, या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी पुढे आल्या आहेत. या शाळेने शासनाची कोणतीही मान्यता नसताना पालकांकडून लाखो रुपये उकळल्याचे आणि विद्यार्थ्यांचे दाखले व गुणपत्रकांमध्ये घोळ केल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी मेहकर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे अंतिम चौकशी अहवाल सादर करण्यात आला असून, संबंधित दोषींवर लवकरच गुन्हे दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

डोणगाव येथील अरेगाव रस्त्यावर स्व. धर्मवीर दिलीपराव रहाटे आदर्श विद्या मंदिर नावाने एक शाळा सुरू आहे. या शाळेकडे युडायस क्रमांक किंवा शासनाची कोणतीही अधिकृत मान्यता नसताना, केजी-१ ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग बेकायदेशीरपणे भरवले जात होते. गरीब पालकांची फसवणूक करून त्यांच्याकडून लाखो रुपयांची फी वसूल केली जात असल्याची तक्रार रवीकांत रामभाऊ आढाव रा. डोणगाव यांनी शिक्षण विभागाकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत विस्तार अधिकारी (शिक्षण) व केंद्रप्रमुख डोणगाव यांच्या समितीने २१ मे २०२६ रोजी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन चौकशी सुरू केली होती. चौकशीनंतर शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. सदर शाळेकडे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापर्यंत शासनाची कोणतीही मान्यता नव्हती. चौकशी दरम्यान शाळेच्या संचालिका मिना रहाटे यांनी केवळ नर्सरी ते केजी-२ पर्यंतचेच वर्ग असल्याचे सांगितले, परंतु प्रत्यक्षात तिथे इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग बेकायदेशीरपणे चालवले जात होते. मान्यता नसलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांना दुसऱ्याच जिल्हा परिषद किंवा अनुदानित शाळेत हजर दाखवून, तिथले शासकीय दाखले आणि टीसी मॅनेज केले जात असल्याचा संशय आहे.

### विद्यार्थिनीच्या दाखल्यामुळे भांडाफोड

■ प्रांजल किरणआप्पा बुरुंगे या विद्यार्थिनीच्या दाखल्यामुळे हा भांडाफोड झाला. या विद्यार्थिनीने २०२२-२३ मध्ये जि. प. म. उ. प्रा. शाळा नागापूर येथे इयत्ता पहिलीचे शिक्षण घेतले होते. मात्र, आदर्श विद्या मंदिर डोनगाव या शाळेने ती विद्यार्थिनी आपल्याकडेच शिकत असल्याचे बोगस गुणपत्रक तयार केले.संबंधित विद्यार्थिनीच्या नावे आदर्श विद्या मंदिरच्या मुख्याध्यापकांनी नागापूर शाळेतून अत्यंत संशयास्पद रित्या दाखला काढून आणल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

" शाळेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरून सविस्तर चौकशी केली आहे. यामध्ये अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या असून, चौकशी अहवाल पुढील उचित कारवाईसाठी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मेहकर यांच्याकडे २९ मे रोजी सादर करण्यात आला आहे.

**-शरद काळे**
विस्तार अधिकारी (शिक्षण), चौकशी समिती

# सर्वपक्षीय बैठक होणार का?

इंडिया आघाडीच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकरी समस्या, संविधानाचे रक्षण आणि शिक्षण क्षेत्रातील गोंधळ या प्रमुख मुद्द्यांवर एकमत होऊन आगामी रणनीती ठरवण्यात आली. नीट आणि सीबीएसई परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांची गंभीर दखल घेत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या तात्काळ राजीनाम्याची एकमुखाने मागणी करण्यात आली. महागाई आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) नेत्या सुप्रिया सुळे यांनी पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशाच्या आर्थिक परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचे आवाहन केले. सर्वपक्षीय बैठक बोलावण्यासाठी सरकारवरील दबाव आता वाढतच आहे. देशातील लोकांना वाढत्या इंधन दरवाढी आणि एलपीजी अनुदानात कपात यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. देशासमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून अर्थतज्ज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे. भाजपला "पक्ष फोडण्याची सवय" असल्याचा आरोप होत असून, प्रथा लोकशाहीसाठी हानिकारक आहे. देश प्रथम, त्यानंतर राज्य, पक्ष आणि कुटुंब असले पाहिजे. देश सुरक्षित असेल तर बाकी सर्व काही सुरक्षित राहील. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान विरोधी पक्ष सरकारसोबत खंबीरपणे उभा राहिला होता आणि आर्थिक समस्या सोडवण्यासाठीही तसाच पाठिंबा देण्यास तयारी दर्शवू शकतात. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १०८-११० डॉलरपर्यंत पोहोचल्या होत्या, त्यावेळी डॉलरच्या तुलनेत रुपया ६०-६५ वर होता आणि पेट्रोल व डिझेलचे भाव कमी होते. आज कच्च्या तेलाच्या किमती कमी आहेत, पण पेट्रोल आणि डिझेलचे भाव जास्त आहेत. जेव्हा डॉ. मनमोहन सिंग यांनी इंधनाच्या किमती दोन रुपयांनी वाढवल्या, तेव्हा भाजपने मोठा गदारोळ केला होता. आता किमती का वाढवल्या जात आहेत? सत्तेत १२ वर्षे काम केल्यानंतरही भाजपला काँग्रेसबद्दल बोलावे लागत आहे. हे काँग्रेसचे यश म्हणायचे का? कुठल्याही भाषणात भाजपचा अजेंडा केवळ काँग्रेसवर आरोप आणि टीका करणे आहे. परंतु १२ वर्षांपासून सत्ता तर भाजपच्या हातात आहे. त्यामुळे १२ वर्षांपूर्वी काय घडले? यापेक्षा देशाचे भविष्य कसे उज्ज्वल करता येईल यावर बोलणे अधिक योग्य वाटेल! आधी शिवसेनेत फूट पडली, मग राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडण्यात आली. आता तृणमूल काँग्रेससोबतही तेच घडत आहे. त्यामुळे या फूट पाडण्याला हेच राजकारण आहे असे नाव दिले जात आहे. परंतु आमदार, खासदार फोडण्यापेक्षा आज देशासमोरील आर्थिक आव्हानांचा विचार करणे जास्त गरजेचे आहे. महागाईमुळे सर्वसामान्यांचे जीवन जगणे कठीण होऊन बसले आहे. या सर्व प्रश्नांचा धांडोळा घेण्यासाठी राजकारण बाजूला सारून सरकारने सर्वपक्षीय बैठक घेऊन त्यावर तोडगा काढणे अधिक महत्वाचे आहे.

# अमेरिका-चीन जवळकीचा भारताला तोटा

**पैलू**

**- आरीफ शेख**

चीनशी संघर्ष वाढल्यामुळे अमेरिकेने भारताशी सामरिक मैत्री वाढवली. संरक्षण सहकार्य वाढले. 'क्वाड' अधिक मजबूत झाला, सेमीकंडक्टर गुंतवणूक वाढली, तंत्रज्ञान भागीदारी गडद झाली आणि जागतिक पुरवठा साखळीत भारत चीनचा पर्याय बनू लागला. 'चायना प्लस वन' या धोरणाचा भारत मोठा लाभार्थी ठरेल, असे दिसू लागले; मात्र आता हे दोन देश एकत्र आल्यास भारताला मिळणारे अतिरिक्त सामरिक महत्त्व कमी होऊ शकते.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची चीन भेट भविष्यात केवळ अमेरिकन शक्तीप्रदर्शन म्हणून नव्हे, तर बदलत्या जागतिक सत्तासंतुलनातील एक निर्णायक टप्पा म्हणून अधिक लक्षात ठेवली जाईल. कारण या भेटीचे परिणाम थेट भारताच्या सामरिक आणि आर्थिक भवितव्यावर प्रभाव टाकणारे ठरू शकतात. वरकरणी ही भेट व्यापार, पश्चिम आशियातील तणाव आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या प्रयत्नांभोवती फिरताना दिसली असली, तरी तिच्या मागे अधिक मोठा संदेश दडलेला आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील संघर्ष पूर्णपणे संपलेला नाही; पण दोन्ही महासत्ता आता नियंत्रित स्पर्धा आणि मर्यादित सहकार्याच्या नव्या टप्प्यात प्रवेश करताना दिसत आहेत. ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपग यांना होर्मुज सामुद्रधुनी स्थिर ठेवण्यासाठी आणि पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी मदत करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. काही वर्षांपूर्वीपर्यंत चीनला जागतिक अस्थिरतेचा मोठा घटक मानणारा अमेरिका आज त्याच चीनकडून प्रादेशिक स्थैर्यासाठी सहकार्याची अपेक्षा करत आहे, हीच बदलत्या जागतिक वास्तवाची सर्वात मोठी खूण आहे. विशेषतः ऊर्जा सुरक्षेच्या प्रश्नावर अमेरिकेला आता एकट्याने जागतिक नेतृत्व करणे कठीण होत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा ऊर्जा आयातदार देश असून पश्चिम आशियात त्याचा आर्थिक प्रभाव सातत्याने वाढत आहे. त्यामुळे इराण, आखाती क्षेत्र आणि तेलवाहतुकीच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर चीनला पूर्णपणे दूर ठेवून स्थैर्य निर्माण करणे अमेरिकेलाही शक्य नाही, हे अमेरिकेने मान्य केल्याचे या भेटीतून दिसले; मात्र शी जिनपग यांनी नेहमीप्रमाणेच अत्यंत सावध भूमिका घेतली. चीनने स्थैर्यासाठी सर्वसाधारण पाठबा दर्शवला; पण कोणतीही स्पष्ट सुरक्षा जबाबदारी स्वीकारण्याचे टाळले.

जागतिक राजकारणामध्ये चीन सध्या फारच जपून पावले टाकत आहे. ही चीनची जुनी आणि विचारपूर्वक आखलेली रणनीती आहे. चीनला जागतिक महासत्ता म्हणून उदयाला यायचे आहे; पण अमेरिकेसारखे थेट



लष्करी हस्तक्षेप आणि सुरक्षा जबाबदाऱ्या उचलण्याची त्याची अजूनही तयारी नाही. चीन आर्थिक प्रभाव, व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या बळावर जागतिक वर्चस्व मजबूत करू इच्छितो. या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे व्यापार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात दिसलेली नरमाई. अमेरिका आणि चीन यांनी नव्या व्यापार देखरेख मंडळाच्या स्थापनेवर सहमती दर्शवली. वरकरणी हा प्रशासकीय निर्णय वाटत असला, तरी गेल्या काही वर्षांमध्ये सुरू असलेल्या व्यापारयुद्धानंतर संबंध स्थिर करण्याचा हा प्रयत्न आहे. चीनने अमेरिकेला 'रेअर अर्थ मिनरल्स'चा पुरवठा वाढवण्यास दिलेली तयारी अधिक महत्त्वाची ठरते. कारण आजच्या जागतिक तंत्रज्ञान अर्थव्यवस्थेत 'रेअर अर्थ मिनरल्स' केवळ खनिज राहिले नसून सामरिक साधन बनले आहेत. इलेक्ट्रिक वाहने, सेमीकंडक्टर, क्षेपणास्त्र प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता या सर्व क्षेत्रांचे भविष्य त्यांच्यावर अवलंबून आहे. या क्षेत्रात चीनचे वर्चस्व आहे. त्यामुळे अमेरिकेसाठी चीनकडून पुरवठा पुन्हा सुरू होणे हा फक्त व्यापाराचा मुद्दा नाही, तर तंत्रज्ञान सुरक्षेशी संबंधित प्रश्न आहे. याच्या बदल्यात चीनलाही महत्त्वाचे फायदे मिळाले. अमेरिकन सोयाबीन, कृषी उत्पादने, बोईंग विमाने आणि ऊर्जा उत्पादनांची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आश्वासन देऊन चीनने ट्रम्प यांना देशांतर्गत राजकीय लाभ मिळवून दिला.

ट्रंप आणि जिनपग यांच्या ताज्या भेटीदरम्यान अमेरिकन शेतकरी आणि उद्योगक्षेत्राला दिलासा देत चीनने 'करार करणारा नेता' अशी स्वतःची प्रतिमा उभी करण्याची संधी ट्रंप यांना उपलब्ध करून दिली; मात्र या संपूर्ण प्रक्रियेत दीर्घकालीन सामरिक लाभ चीनच्या बाजूने झुकताना दिसतात. कारण अमेरिकेची भाषा या वेळी संघर्षापेक्षा तडजोडीकडे झुकलेली दिसली. विशेषतः तैवानच्या प्रश्नावर अमेरिकेने घेतलेली तुलनेने मवाळ भूमिका आशियातील देशांसाठी महत्त्वाची ठरली आहे. शी जिनपग यांनी स्पष्टपणे सांगितले, की तैवान हा चीनसाठी केंद्रस्थानी असलेला प्रश्न आहे आणि तो चुकीच्या पद्धतीने हाताळला गेला, तर संघर्ष निर्माण होऊ शकतो. ट्रम्प यांनी मात्र त्याचा कोणताही ठोस प्रतिवाद केला नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेकदा मौनही संदेश ठरतो.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# राष्ट्रवादीमध्ये कुटुंब विरुद्ध पक्ष !

**राजकारण**

**- नंदकुमार काळे**

अजित पवारांच्या पश्चात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संपूर्ण सत्ता, आणि आर्थिक नाड्या सुनेत्रा पवार आणि त्यांच्या मुलांच्या हातात आहेत. त्यामुळे पक्षातील लोकशाही संपुष्टात येत आहे. स्वतःच्याच पक्षात अपमान सहन करावा लागत असल्यामुळे अजित पवार गटाचे काही नेते पुन्हा शरद पवार यांच्या घराचे उंबरठे झिजवत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा फुटीच्या उंबरठ्यावर आहे ?

महाराष्ट्राच्या राजकारणाला वैचारिक अधिष्ठान देण्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची झालेली कोंडी पाहिली, की एक गोष्ट स्पष्ट होते, की 'राजकारणात विचारांपेक्षा कुटुंब आणि तत्वांपेक्षा स्वार्थ मोठा होतो, तेव्हा पक्षाचा डोलारा कितीही मोठा असला, तरी पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळायला वेळ लागत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाची स्थिती याच विनाशाच्या मार्गावर वाटचाल करत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. राजकीय पक्षांमध्ये नेतृत्वबदल ही नैसर्गिक प्रक्रिया असते. विशेषतः एखाद्या प्रभावी नेत्याच्या निधनानंतर त्याचे कुटुंब पुढे येणे भारतीय राजकारणासाठी नवीन नाही; पण नेतृत्व स्वीकारणे आणि पक्ष ताब्यात घेणे यात एक सूक्ष्म; पण अत्यंत महत्त्वाचा फरक असतो. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आज हाच फरक ठळकपणे जाणवत आहे.

अजित पवार यांच्या अनुपस्थितीनंतर सुरुवातीला पक्षातील अनेकांना वाटत होते, की अनुभवी नेते मिळून एक सामूहिक नेतृत्व उभे करतील. कारण राष्ट्रवादीचा मोठा चेहरा असलेले अनेक नेते अजूनही




सक्रिय होते. त्यांच्याकडे जनाधार होता, प्रशासनाचा अनुभव होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संघटनेवर पकड होती; पण काही दिवसांमध्येच चित्र बदलले. निर्णयप्रक्रिया काही निवडक व्यक्तींपुरती मर्यादित झाली. पक्षाच्या बैठका, नियुक्त्या, आर्थिक मंजुरी, जिल्हानिहाय बदल हे सगळे एका नव्या गटाभोवती फिरू लागले. राजकारणात पैशाचा प्रवाह जिथे असतो, तिथेच खरी सत्ता असते. त्यामुळे आर्थिक अधिकारांचे केंद्रीकरण हा केवळ प्रशासकीय बदल नसतो, तर तो राजकीय संदेश असतो. तिथूनच पक्षांतर्गत अस्वस्थता वाढू लागली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तो संदेश स्पष्ट गेला. पक्षाचे नियंत्रण आता नव्या नेतृत्वाकडे आहे आणि बाकी सर्वांनी त्या वास्तवाशी जुळवून घ्यायचे आहे. या प्रक्रियेत सर्वाधिक धक्का बसला तो ज्येष्ठ नेत्यांना. अनेकांनी पक्षासाठी दशके घालवली, कठीण काळात संघटना टिकवली, निवडणुका जिंकल्या, सत्ता आणली; पण अचानक त्यांनाच दुय्यम वागणूक मिळू लागली. काहींना महत्त्वाच्या समित्यांमधून वगळण्यात आले. काहींच्या जागी नव्या चेहऱ्यांची नियुक्ती झाली. काहींना तर पक्षाच्या बैठकीतही दुय्यम स्थान दिले जाऊ लागले. विशेष म्हणजे या सगळ्याविरोधात सुरुवातीला कोणी उघडपणे बोलले नाही. कारण राजकारणात विरोध करण्यापेक्षा निरीक्षण करणे अधिक सुरक्षित मानले जाते; पण नाराजी आतून वाढत गेली. त्याचा स्फोट झाला तो पक्षाच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीवरून. ही यादी जाहीर झाल्यानंतर अनेकांना धक्का बसला.

काही अनुभवी नेत्यांची नावे गायब होती. काहींना क्षुल्लक जबाबदाऱ्या देण्यात आल्या होत्या तर काही जिल्ह्यांमध्ये पूर्णपणे नवे चेहरे पुढे आणण्यात आले होते. माध्यमांनी आणि कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर पक्षाकडून तांत्रिक चुका असल्याचे स्पष्टीकरण आले; पण राजकारणात तांत्रिक चुका इतक्या नेमक्या पद्धतीने कधीच होत नाहीत. खरी गंमत पुढे झाली. कारण चुकीची म्हणवलेली तीच यादी तीन आठवड्यांनंतरही बदलली गेली नाही. यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली, की चूक यादीत नव्हती. **(क्रमशः)**

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# शिक्षक: टीकेचे धनी की समाजाचे शिल्पकार?



**॥ प्रासंगिक ॥**

**- प्रणित देशमुख**

**(गो.सी. टोम्पे महाविद्यालय चांदूरबाजार)**

आमदार बंब यांचे शिक्षकांविषयीचे वक्तव्य आणि टीका अनेकदा चर्चेचा विषय ठरतात. शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करणे हे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे कर्तव्यच आहे; मात्र या चर्चेत एक महत्त्वाचा पैलू वारंवार दुर्लक्षित राहतो, तो म्हणजे शिक्षकांवर टाकलेला प्रचंड अशैक्षणिक कामांचा बोजा. या पार्श्वभूमीवर शिक्षकांची बाजू समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

आजचा शिक्षक केवळ वर्गात ज्ञान देणारा व्यक्ती राहिलेला नाही. तो निवडणुकीचे काम, जनगणना, विविध शासकीय सर्वेक्षणे, आरोग्य मोहिमा, लसीकरण अभियान, पोषण अभियान, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध, शालेय पोषण आहाराचे व्यवस्थापन, शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी अशा असंख्य कामांमध्ये गुंतलेला आहे. या सर्व कामांचा थेट शिक्षणाशी संबंध नसला तरी त्यांची जबाबदारी शिक्षकांवरच सोपवली जाते. परिणामी, शिक्षकाचा मोठा वेळ आणि ऊर्जा ही विद्यार्थ्यांच्या अध्यापनाऐवजी या पूरक कामांमध्ये खर्च होते.

यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. एखाद्या शिक्षकाकडून १०० टक्के गुणवत्तेची अपेक्षा करताना त्याला आवश्यक वेळ, साधने आणि वातावरण मिळते का, हा मूलभूत प्रश्न आहे. शिक्षक दिवसभर शासकीय अहवाल तयार करण्यात, डेटा भरण्यात आणि विविध बैठकींमध्ये अडकलेला असेल, तर तो वर्गात किती एकाग्रतेने आणि सर्जनशीलतेने शिकवू शकेल? या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ टीका करणे हे समस्येचे समाधान ठरत नाही.

मात्र, या सगळ्या अडचणी असूनही शिक्षक हार मानत नाहीत—ही बाब विशेषत्वाने अधोरेखित करावी लागेल. आजही महाराष्ट्रातील अनेक जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी विविध स्पर्धा, शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा स्पर्धा आणि शैक्षणिक निकालांमध्ये उल्लेखनीय यश मिळवत आहेत. ग्रामीण भागातील मर्यादित साधनसामग्री, अपुरी पायाभूत सुविधा आणि सामाजिक-आर्थिक अडचणी असूनही हे विद्यार्थी घडतात—यामागे शिक्षकांचा निस्वार्थ परिश्रम आणि समर्पण असते.

अनेक उदाहरणे अशी आहेत की शिक्षक स्वतःच्या खिशातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य आणतात, शाळेनंतर अतिरिक्त तास घेतात, कमजोर विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्ग घेतात आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक समस्यांमध्येही मार्गदर्शकाची भूमिका बजावतात. काही शिक्षक तर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तयार करण्यासाठी स्वतः अभ्यास करून त्यांना मार्गदर्शन करतात. हे केवळ नोकरी नसून एक ध्येय आणि समाजसेवा आहे, हे त्यांच्या कार्यातून स्पष्ट दिसून येते.

जिल्हा परिषद शाळांमधील अनेक विद्यार्थी आज उच्च पदांवर कार्यरत आहेत—डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, उद्योजक म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे. या यशामागे त्यांच्या शाळेतील शिक्षकांचे योगदान अमूल्य आहे. त्यामुळे 'गुणवत्ता नाही' असा एकतर्फी निष्कर्ष काढणे योग्य ठरत नाही. उलट, मर्यादित साधनांमध्येही चांगली गुणवत्ता निर्माण करणारे शिक्षक हेच खरे शिक्षण व्यवस्थेचे बळ आहेत.शिक्षकांवर असलेल्या अतिरिक्त कामांच्या ओझ्यामुळे त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक ताणही वाढतो. अनेक शिक्षकांना शाळेच्या वेळेनंतरही काम करावे लागते. सुट्ट्यांमध्येही विविध शासकीय कामांसाठी हजर राहावे लागते. त्यामुळे त्यांचे वैयक्तिक आयुष्य, कुटुंबासोबतचा वेळ आणि स्वतःच्या अभ्यासासाठीची संधी यावर परिणाम होतो. एक थकलेला आणि तणावग्रस्त शिक्षक विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊ शकत नाही, ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे.

याशिवाय, शिक्षण क्षेत्रात सतत बदलणारे अभ्यासक्रम, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल साधनांची अंमलबजावणी यामुळे शिक्षकांकडून सतत अद्ययावत राहण्याची अपेक्षा केली जाते. ही अपेक्षा योग्य असली तरी त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, वेळ आणि संसाधने पुरवली जातात का, हा प्रश्नही महत्वाचा आहे. शिक्षकांना जर योग्य प्रशिक्षण आणि सहाय्य मिळाले, तर ते नक्कीच अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकतात.

आमदार बंब यांच्यासारख्या लोकप्रतिनिधींनी जर खरोखरच शिक्षणाची गुणवत्ता सुधारायची असेल, तर त्यांनी शिक्षकांच्या अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे, आवश्यक तेथे स्वतंत्र कर्मचारी नेमणे, शाळांमध्ये पुरेशी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि शिक्षकांना प्रेरणादायी वातावरण निर्माण करणे हे उपाय अधिक प्रभावी ठरू शकतात.

फक्त टीका करून किंवा शिक्षकांच्या उणिवा दाखवून शिक्षण व्यवस्था सुधारत नाही. उलट, यामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास कमी होतो आणि त्यांची काम करण्याची प्रेरणा घटते. शिक्षकांना दोष देण्याऐवजी त्यांना सहकार्य करणे, त्यांच्या समस्यांवर उपाय शोधणे आणि त्यांना सक्षम बनवणे हे अधिक गरजेचे आहे.

शिक्षक हा समाजाचा पाया घडवणारा घटक आहे. प्रत्येक डॉक्टर, अभियंता, अधिकारी, राजकारणी यांच्यामागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान राखणे आणि त्यांच्या कामाच्या अटी सुधारणा करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

अखेरीस, जर शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल खरोखरच चिंता असेल, तर सर्वप्रथम शिक्षकांना त्यांच्या मूळ कामावर—अध्यापनावर—लक्ष केंद्रित करण्याची संधी द्यावी लागेल. आणि हे करताना शिक्षकांनी आधीच दिलेल्या योगदानाची दखल घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण, अडचणींच्या डोंगरावर मात करूनही विद्यार्थ्यांना घडवणारा शिक्षक आजही समाजाचा खरा शिल्पकार आहे.

म्हणूनच, आज गरज आहे ती टीकेची नाही, तर समजुतीची आणि सहकार्याची. शिक्षकांच्या व्यथा समजून घेत, त्यांच्या समर्पणाची कदर करत आणि त्यांच्या कामाचा सन्मान राखत पुढे गेलो, तरच शिक्षण व्यवस्थेत खऱ्या अर्थाने सकारात्मक बदल घडू शकतो.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**



# बालपणाला मुक्त श्वास देऊया



**प्रासंगिक**

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

**(समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक)**



१२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. बालमजुरी विरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

दैनिक महाभूमि

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८
पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27

दैनिक महाभूमि

छत्रपती संभाजीनगर भूमि

शुक्रवार, १२ जून २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

कार्यकर्त्यांसह भाजपा तालुकाध्यक्षांची कार्यालयात धडक

# घरकुलांच्या वाळूसाठी गंगापूर तहसीलदार धारेवर

बापू सोमासे



**लासूर स्टेशन** : एकीकडे वाळू माफिया नदीपात्रात हौदोस घालत असून चोरट्या मार्गाने गौणखनीजाची विक्री करीत आहेत. तर दुसरीकडे शासकीय नियम ठरले असताना गोरगरीब नागरिकांची घरकुले वाळूअभावी रखडली आहेत. हा प्रकार शासकीय पातळीवरील भ्रष्ट कर्मचाऱ्यांमुळे उद्भवला असून यात त्वरीत मार्ग काढला नाही तर तीव्र आंदोलन करू असा इशारा भाजपा तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी गंगापूर तहसीलदारांना धारेवर धरत दिला.

बुधवार, १० जून रोजी त्यांनी तहसील कार्यालयात धडक देत प्रशासकीय अधिकाऱ्यांना चांगलाच शाब्दीक चोप दिला. शासनाच्या नियमानुसार घरकुल लाभार्थ्यांना पाचब्रास मोफत वाळू मिळणे अपेक्षित असताना गंगापूर तालुक्यातील हजारो लाभार्थी यापासून वंचित आहेत. या प्रश्नावर भाजपचे तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तहसील कार्यालयात धडक देत संधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. तालुक्यातील जवळपास दोन हजार घरकुल लाभार्थ्यांची यादी पंचायत समितीमार्फत तहसील कार्यालयाकडे पाठवण्यात आली आहे. तरीही वाळू उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने चव्हाण यांनी तीव्र संताप व्यक्त केला. शासनाने गरिबांसाठी योजना राबवली असताना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे घरकुलांचे ंधकाम रखडत असल्याचा आरोप त्यांनी केला. पावसाळा सुरू होण्यापूर्वी घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी वाळूची तातडीने आवश्यकता आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून लवकरच लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देण्याचे आश्वासन संधित अधिकाऱ्यांनी दिले आहे. मात्र त्यापूर्वी चव्हाण यांनी गंगापूर तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी थेट लाचखोरीचा आरोप केला. वाळू माफियांकडून हप्ते घेवून अवैध मार्गाने तीची विक्री करण्यास मार्ग मोकळा करून दिला जात असल्याचेही त्यांनी म्हटले. हा प्रकार द झाला नाही आणि गरी लोकांच्या घरकुलाचे काम वाळू अभावी रखडले तर भाजपा तीव्र आंदोलन करेल असा इशारा त्यांनी दिला.

### तर भाजपा तीव्र आंदोलन करणार

''शासनाने घरकुल लाभार्थ्यांसाठी पाच्ास मोफत वाळू देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र प्रशासनाच्या दिरंगाईमुळे गंगापूर तालुक्यातील हजारो लाभार्थी या हक्काच्या लाभापासून वंचित आहेत. पंचायत समितीने यादी वेळेत पाठवूनही कार्यवाही होत नसल्याबद्दल आम्ही प्रशासनाला जा विचारला आहे. लाभार्थ्यांना तातडीने वाळू न दिल्यास भाजपतर्फे तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल.''

**– रवींद्र चव्हाण,**
भाजप तालुकाध्यक्ष, गंगापूर

# सिल्लोडमध्ये १३ टन खैर लाकडासह पिकअप जप्त

वनविभागाची मोठी कारवाई

सिल्लोड / प्रतिनिधी

शहरातील सारा सिटी परिसरात वनविभागाने धडक कारवाई करत अवैधरित्या खैर जातीची लाकडे साठवून ठेवलेली १३ पिकअप वाहन जप्त केले. ही कारवाई ९ जून रोजी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. पहाटे चार वाजेपर्यंत पंचनामे व इतर प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या.

गुप्त माहितीच्या आधारे वनविभागाच्या पथकाने ९ जून रोजी सारा सिटी परिसरात छापा टाकला. यात रस्त्याच्या कडेला खैर प्रजातीच्या लाकडाचा मोठा साठा अवैधरित्या लपवून ठेवलेला आढळून आला. कारवाई सुरू असतानाच संबंधित लाकूड वाहून नेण्याच्या प्रयत्नात असलेले महिंद्रा बोलेरो पिकअप (एमएच ४३ एडी.१९२२) वाहन घटनास्थळी दिसून आले. पथक पाहताच चालकाने वाहन तेथेच सोडून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. तपासणीत या वाहनात खैर लाकडाचे काही नग तसेच निम प्रजातीच्या लाकडाच्या पाट्या आढळून आल्या. वनविभागाने जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे १३ टन वजनाचे (अंदाजे १५ घनमीटर) खैर प्रजातीचे रचित गंडोरी लाकूड तसेच बोलेरो पिकअप वाहनाचा समावेश आहे. जप्त माल चिंचोली रोपवाटिकेत सुरक्षित्तरीत्या जमा करण्यात आला.

### या पथकाने केली कारवाई

संभाजीनगर (प्रादेशिक) मुख्य वनसंरक्षक प्रमोदचंद लाकरा, उपवनसरंक्षक श्रीमती माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत सिल्लोड सहाय्यक वनसंरक्षक स्वप्नील भामरे, वनपरिक्षेत्र अधिकारी यशपाल दिलपाक, वनपाल रेखा बरबडे, मनोज कांबळे तसेच वनरक्षक साईनाथ पवार, गणेश परदेशी, अजीम शेख, विजय कुंटे, सागर राजपूत, विशाल जाधव, अनिल इंगळे, कल्याण खोकड आणि एच. एस. सिद्दीकी यांनी सहभाग घेतला. यावेळी सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कायंदे व पोलीस नाईक एस.सी. मोबिन यांचे सहकार्य लाभले.

## न्यूज ब्रीफ

### तिहेरी अपघातात तरुण ठार




**शिऊर :** भरधाव आयशर, दोन दुचाकींच्या धडकेत तरुण ठार झाला. वैजापूर तालुक्यातील चिकटगाव-लोणी रस्त्यावर निकमवस्ती परिसरात बुधवार, १० जून दुपारी हा अपघात घडला. अमोल भगवान वाघ (वय २५, रा. रेडाका, ता.येवला, जि. नाशिक) असे अपघातातील मयताचे नाव आहे. अपघातग्रस्त वाहनांमध्ये आयशर (एम २० ईजी ३०३३) आणि एमएच २० सीएफ ६८७८, एमएच ४१ बीयू ५७४५ या दुचाकींचा समावेश आहे.

### २८ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई

**कन्नड** : कन्नड शहर व ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या २८ वाहनचालकांवर कारवाई केली. पिशोर नाक्यावर करण्यात आलेल्या या धडक कारवाईत २८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. वाहनात बसल्यानंतर सीटबेल्ट न लावणे, वाहनाची सर्व प्रकारची कागदपत्रे सोबत न बाळगणे, वाहन चालविण्याच्या परवाना नसणे, ट्रिपल सीट वाहन चालविणे, वाहनावर चित्रविचित्र नंबरप्लेट (फॅन्सी नंबर प्लेट) बसवणे आणि मोटारसायकलचे हॉर्न मोठ्याने वाजविणे आदी कारणांवरून ही कारवाई करण्यात आली.

### वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात गाईचा मृत्यू

**करमाड** : छत्रपती संभाजीनगर तालुक्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात वाढ झाली असून गोलटगांव येथे अशाच प्रकारातून गाईचा मृत्यू झाला. वन्यप्राणी पाळीव जनावरांना टार्गेट करीत असल्याने शेतकऱ्यांनी त्यांची धास्ती घेतली आहे. गोलटगाव शिवारातील गट नंबर ६७५ मध्ये बद्री अंकुश साळुंके यांचे शेत व आखाडा आहे. नेहमीप्रमाणे आखाड्यावर पाळीव जनावरे बांधलेली असताना, ४ जूनच्या मध्यरात्री अचानक वन्य प्राण्यांनी आखाड्यावरील जनावरांवर जीवघेणा हल्ला चढवला. यात ही गाय गंभीररीत्या जखमी झाली, तिच्या पायाचे फरे (हाडे) मोडले गेले.

### 'हरित संभाजीनगर-स्वच्छ संभाजीनगर'चा प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात पर्यावरणपूरक महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशनतर्फे आपलं छत्रपती संभाजीनगर, हरित संभाजीनगर – स्वच्छ संभाजीनगर या उपक्रमाचा प्रारंभ पर्यावरणदिनी मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झाले. यावेळी सभापती अनिल मकरिये, नगरसेवक शिवाजी दांडगे, संस्थेचे सदस्य अभिषेक सांगळे, प्रा. अजाबराव मनवर, स्वामीनंद बनसोडे, शुभम नरवडे यांची उपस्थिती होती.

# घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्याच्या कामांना ऑक्टोबरची मुदत

ओंकारेश्वरच्या धर्तीवर वेरुळ-घृष्णेश्वर कॉरिडॉर प्रकल्प

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

ओंकारेश्वर मदिराच्या धर्तीवर वेरुळ-घृष्णेश्वर कॉरिडॉर प्रकल्प उभारणीसाठी राज्य शासनाने २१० कोटींचा सुधारित विकास आराखडा मंजूर केला आहे. या आराखड्यानुसार मंदिर परिसरात विकासकामे सुरू आहेत. मात्र, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी विनाय गौडा जी.सी. यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या वेरुळच्या घृष्णेश्वर मंदिर विकासासाठी ओंकारेश्वरच्या धर्तीवर कॉरिडॉर विकसित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासाठी २१० कोटींचा विकास आराखडा मंजूर केला आहे.



या विकास आराखड्यातून भक्तनिवास, मंदिरापासून काही अंतरावर विविध वस्तू, बेलफुल विक्रीची दुकाने, भक्तांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दर्शनबारी, डोम्स, उपहारगृहे, संपूर्ण परिसराला वॉल कंपाऊंड करण्याची कामे सुरू आहेत.

जिल्हाधिकारी दर आठवड्याला या कामांचा आढावा घेतात. नुकत्याच झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी विकास कामांना मंदिराच्या आतमध्ये काम करण्यास पुरातत्व विभागीची मंजुरी मिळाली आहे.

### पर्यटन व्यवसायाला गती

स्थानिक प्रशासनाकडून वेरूळ येथील अतिक्रमणे हटविल्याने येथील रस्त्यांचे रूंदीकरण झाले आहे. त्यात आता ओंकारेश्वर मंदिराच्या धर्तीवर वेरुळ-घृष्णेश्वर कॉरिडॉर प्रकल्प उभारणीसाठी राज्य शासनाने २१० कोटींचा सुधारित विकास आराखडा मंजूर केल्याने मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार आहेत. याचा परिणाम पर्यटन वाढीवर होणार असून पर्यटन व्यवसायालाही गती मिळणार आहे.

### ऑनलाइन खत विक्री बंद करा : आ. जाधव

**कन्नड** : कृषी विभागाच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या ऑनलाइन खत विक्री प्रणालीमुळे शेतकरी व कृषी विक्रेत्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही पद्धत रद्द करून पूर्वीप्रमाणे खत वितरण व्यवस्था सुरू ठेवावी, अशी मागणी आमदार संजना जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. ऑनलाइन खत विक्री प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांनी खताचे नाव व बॅच क्रमांक निवडल्यानंतरही नोंदणी पूर्ण होत नसल्याने आवश्यक खत खरेदी करताना अडथळे येत आहेत. तसेच शेतकरी स्तरावर त्वरित प्रतिसाद (क्यूआर कोड) तयार झाल्यानंतरही प्रत्यक्ष कृषी सेवा केंद्रावर जाऊन अंगठ्याच्या ठशाद्वारे पडताळणी करावी लागत आहे. यामुळे महिला व वृद्ध शेतकऱ्यांसाठी हे अधिक अडचणीचे ठरत आहे.

# जलसंपदा कार्यालयांच्या स्थलांतराविरोधात आज मोर्चा

शिवसेना नेते आ. दानवे करणार नेतृत्व



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंत्यांसह इतर कार्यालये स्थलांतरित करण्याच्या निर्णयाविरोधात शुक्रवार, १२ जून रोजी सर्वपक्षीय मोर्चा काढला जाणार आहे. खा.डॉ. कल्याण काळे, आ. अंबादास दानवे हे मोर्चाचे नेतृत्व करणार असल्याची माहिती मराठवाडा बहुजन विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी जि.प. सदस्य रमेश गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जलसंपदाच्या मुख्य अभियंत्यांचे कार्यालय छत्रपती संभाजीनगरहून नांदेड येथे हलविण्यात आले आहे. याशिवाय इतर १९ उपविभागीय कार्यालयांचे स्थलांतर करण्यात आले आहे. कार्यालय स्थलांतरणास पाटंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळासह राज्य सरकारची मान्यता घेण्यात आलेली नसल्याने हा निर्णय बेकायदेशीर असल्याचा आरोप रमेश गायकवाड यांनी केला.

कार्यालय स्थलांतराविरोधात १२ जूनरोजी सकाळी ११ वाजता सेव्हन हिल पासून पाटंधारे महामंडळाचे मुख्यालय असलेल्या सिंचन भवनवर मोर्चा काढला जाणार आहे. मोर्चात सुमारे दहा हजार नागरिक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनाही मोर्चात सहभागी होण्याची विनंती केली जाणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. माजी नगरसेवक रमेश जायभाय, गौतम गणराज, प्रतीक गायकवाड, सुनील अवचरमल, अविनाश घुले, गणेश शेंडे, नारायण हिवाळे, देविदास खरात आदी यावेळी उपस्थित होते. दरम्यान जलसंपदा विभागाचे कार्यालय स्थलांतरित करून ही जागा खासगी संस्था, संपर्क कार्यालयांना दिली जाणार असल्याचा आरोप गायकवाड यांनी केला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडील गोदावरी खोऱ्याचा पदभार तातडीने काढावा, शेतकरी आत्महत्यांना जबाबदार असलेल्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही गायकवाड यांनी केली आहे.

# लासूर स्टेशन बसस्थानकाच्या बांधकामाची तपासणी करा

राष्ट्रवादीचे कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

लासूर स्टेशन / प्रतिनिधी

लासूर स्टेशन येथे सुरू असलेल्या नवीन बस स्थानकाच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी लासूरशहर शाखेच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र सरचिटणीस दिलीप पाटील बनकर यांच्या उपस्थितीत कार्यकारी अभियंता छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनात लासुरस्टेशन येथील बस स्थानकाच्या बांधकामाची तांत्रिक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या बांधकामाची पहाणी केली असता दर्जाहीन साहित्याचा वापर होत असून काही ठिकाणी उभारण्यात आलेल्या कॉलमला भेगा पडलेल्या दिसून येत आहेत. तसेच बांधकामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्याने भविष्यात प्रवासी व नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# समीर सत्तारांसह चौघांचे सहनिबंधकांकडे अपील

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्याच्या निर्णयाविरोधात आ. अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांच्यासह चौघांनी विभागीय सहनिंधक संतोष बिडवई यांच्याकडे बुधवार, १० जून रोजी अपील दाखल केले. अपील दाखल करण्यासाठी आणखी दोन दिवसांची मुदत शिल्लक आहे.

जिल्हा बँकेच्या २० संचालकपदासाठी २१४ अर्ज दाखल केले होते. छाननी प्रक्रियेत ४५ उमेदवारांचे अर्ज बाद ठरविण्यात आले. अब्दुल समीर, आ. संजना जाधव, माजी आमदार आण्णासाहे माने, सुवर्णा जाधव, अर्चना पाटील, इंदुमती डोणगावकर, प्रनिकेत पाटील आदींचा यात समावेश आहे. दरम्यान जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये कायदा, नियम आणि पोटनियम यांना हरताळ फासून सत्ताधाऱ्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून मनमानी कारभार चालविल्याचा आरोप गंगापुर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष कृष्णा पाटील डोणगावकर यांनी केला आहे. ही निवडणूक आता सहकार क्षेत्रातील लोकशाहीची निवडणूक राहिलेली नसून सत्ताधाऱ्यांच्या मर्जीतील उमेदवारांना वाचविण्याचा आणि नको असलेल्या उमेदवारांना बाहेर काढण्याचा कार्यक्रम बनल्याचे दिसून येत आहे. आपल्या मातोश्री इंदुमती डोणगावकर यांचा गंगापूर तालुका कृषी पतपुरवठा मतदारसंघातील अर्ज आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील लेखापरीक्षण वर्गाचा आधार घेत अवैध ठरविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

# दर्गा बाजारात चोरांचा धुमाकूळ; दोघींचे दागिने लंपास

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

शहानूरमियाँ दर्गा येथील सोमवारच्या आठवडी बाजारात चोरांनी धुमाकूळ घातला. तेथे खरेदीसाठी आलेल्या दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या पोती चोरांनी कापून लंपास केल्या. सोन्याच्या पोती सहज कापून नेल्यामुळे त्यात कटरचा वापरः झाल्याचा संशय आहे.

सीमा बालाजीराव कोल्हाळ या (४०, रा. संग्रामनगर) फिर्यादी आहेत. त्या ८ जून रोजी संध्याकाळी ७.३० वाजता दर्गा येथील बाजारात भाजीपाला खरेदीसाठी गेल्या होत्या. तेथून स्कुटीने रात्री ८.३० वाजेच्या सुमारास त्या घरी परतल्या. घराबाहेर स्कुटी उभी करून आत जात असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याचे डोरले असलेल्या पोत कटरने कापली दरम्यान, दुसऱ्या तक्रारदार अनिता अरुण बोर्डे (४८, रा. केशवनगरी) या देखील त्याचवेळी बाजारात भाजीपाला खरेदी करत होत्या. रात्री ८.३० वाजेच्या सुमारास बाजारात भाजी घेत असतानाच, त्यांच्या गळ्यातील पोतीचे मणी खाली पडत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांचे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन डोरले व चार सोन्याचे मणी असलेली पोत कटरच्या सहाय्याने कापून नेली. अधिक तपास उपनिरीक्षक रावसाहेब वाघ करत आहे.

# कामचुकार कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करा

मनपा आयुक्त अमोल येडगे यांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

महापालिकेतील कंत्राटी पद्धतीवर घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाची आता कसून तपासणी केली जाणार आहे. यामध्ये कामचुकारपणा करणाऱ्या किंवा असमाधानकारक कामगिरी असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेतून मुक्त करण्याचे स्पष्ट आदेश मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी दिले आहेत.

सोमवारी,१० जून रोजी पार पडलेल्या विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. बैठकीत सुरुवातीला ई-ऑफीस कार्यप्रणालीचा आढावा घेतला, महापालिकेच्या कामकाजाला वेग देण्यासाठी ही प्रणाली कार्यान्वित केलेली आहे. कर्मचाऱ्यांनी ई-ऑफीसचा जास्तीत जास्त वापर करावा, सर्व फाईल्स ई ऑफिसमार्फतच सादर होतील, याकडे लक्ष द्यावे, ई-ऑफीसमध्ये एकही संचिका प्रलंबित राहता कामा नये, विभागप्रमुखांनी त्यावर लक्ष द्यावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले. कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्त त्यांना नेमलेले काम, याचाही आढावा घेतला. अनेक विभागात कंत्राटी कर्मचारी कामच करत नसल्याच्या तक्रारी आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामावर विभागप्रमुखांनी लक्ष ठेवावे, दोन महिन्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाची तपासणी केली जाईल, कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक आढळून आले नाही तर त्यांना घरी पाठवा. गरज नसलेले कर्मचारी काढून टाका, असे निर्देशही आयुक्त येडगे यांनी विभागप्रमुखांना दिले.

### लाकडी दांड्याने दोघांना मारहाण

छत्रपती संभाजीनगर : जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने दोघांना लाकडी दांड्याने बेदम मारहाण केल्याची घटना कौसर पार्क नारेगाव परिसरात घडली. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख नुमान शेख सलीम, शेख आमेर शेख सलीम, शेख डब्बू शेख सलीम, शेख माजीद मुर्गा, शेख फैजान शेख शफीक, अबू बकर अशी आरोपींची नावे आहेत. शेख इर्शाद शेख इब्राहीम रा. कौसर पार्क गल्ली नं. ४ नारेगाव यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार सोमवार, ८ जून रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास फिर्यादी मित्र जुनेद खान यांच्यासोबत असताना आरोपींनी लाकडी दांडा, लोखंडी रॉड, दगडांनी हल्ला चढवला.

सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा, जीवाची भीती !

# दक्षिण काशीच्या गोदापात्रात भाविकांची अलोट गर्दी

पैठण / प्रतिनिधी



धोंड्याच्या (अधिक) महिन्यातील आज शेवटची एकादशी असल्याने पैठण या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळत आहे. गोदावरी नदीमध्ये पवित्र गंगा स्नानासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक पैठणमध्ये दाखल झाले आहेत. मात्र, या अत्यंत संवेदनशील आणि अलोट गर्दीच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था तैनात नसल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पैठण येथील मुख्य तीर्थक्षेत्र आणि नाथ मंदिराच्या पाठीमागे असलेल्या गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात भाविक स्नानासाठी उतरत आहेत. यामध्ये लहान मुले, महिला आणि वृद्ध भाविकांची संख्या लक्षणीय आहे. नदीपात्रात पाण्याचा अंदाज न आल्यास किंवा अचानक गर्दीचा ताण वाढल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे असतानाही, प्रशासनाकडून किंवा संबंधित यंत्रणेकडून या ठिकाणी कोणतीही सुरक्षा चौकी, जीवरक्षक किंवा बॅरिकेडिंग लावण्यात आलेले नाही. सुरक्षेच्या या गंभीर अभावामुळे भाविकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. ''एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र आलेला असताना प्रशासनाचे आणि संस्थानाचे याकडे दुर्लक्ष का?'' असा सवाल उपस्थित केला जात आहे. कोणतीही जीवितहानी किंवा अनपेक्षित दुर्घटना टाळण्यासाठी नाथ मंदिर संस्थान आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने या ठिकाणी चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी, अशी आग्रही मागणी आता भाविकांच्या वतीने केली जात आहे.

### पुरूषोत्तमपुरीत दोघींचा मृत्यू

अधिक मासानिमित्त पुरूषोत्तमपुरी येथे पुरूषोत्तमाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या दोन महिला भाविकांचा नदीत बुडून मृत्यू झाला. माजलगांव तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथे गोळेगांव – पुरूषोत्तमपुरी अशी नाव व्यवस्था करण्यात आली. मात्र जास्तीचे प्रवाशी नावेवर चढल्याने ही नाव गोदावरी नदीपात्रात मध्यभागी उलटली. यात दोन भाविकांचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतांना पैठण येथील गोदावरील नदीपात्रात भाविकांकडून धोकादायक पध्दतीने अधिक मासानिमित्त नदीत स्थान केले जात आहे.

## न्यूज ब्रीफ

### हॉकी स्टीकने मारहाण

**छत्रपती संभाजीनगर :** दुकान लावण्याच्या कारणावरून एकावर हॉकी स्टीकने प्राणघातक हल्ला केल्याची घटना गंजे शहीदा मशीद जिन्सी परिसरात घडली. याप्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्रम व माजेद अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी युसूफ खान रऊफ खान रा. जुना बायजीपुरा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ६ जून रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास मासे विक्रीचे दुकान लावण्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादी व त्यांचा पुतण्या शाहरूख खान याला हॉकीस्टीकने बेदम मारहाण करीत गंभीर जखमी केले.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**छत्रपती संभाजीनगर :** मोरे चौकातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दुचाकीस्वाराला भरधाव कारने उडविले. ही घटना ५ जून रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभाकर माधवराव काथार रा. अहिल्यानगर होळकर चौक सिडको एन ४ यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार फिर्यादी दुचाकीने मोरे चौकातून पंढरपूरकडे जात असताना कार क्रमांक (एमएच-२०-जीके-४८८६) चालकाने भरधाव वेगात दुचाकीला धडक दिली. या धडकेत फिर्यादी जखमी झाले.

### पर्समधून साडे तीन लाखांचे दागिने लंपास

**छत्रपती संभाजीनगर :** कार खरेदी करण्यासाठी गेलेल्या क्रिकेटपटूच्या आईच्या पर्समधून ३ लाख ६० हजारांचे दागिने लंपास झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सतीश ठेंगे रा. वारेगाव ता. फुलंब्री यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ६ एप्रिल रोजी सकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास फिर्यादींची आई आणि वहिनी बसने हर्सूल टी पॉईंटवर आल्या. तेथून सानिया मोटर्स येथे येत असताना अज्ञात चोरट्याने आईच्या पर्समधील २ लाख ७० हजार रूपये किंमतीची सोन्याची चेन, ८० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे गंठण व वहिनीच्या पर्समधील १० हजार रूपये किंमतीचे चांदीचे पैंजण लंपास केले.

जलस्रोत कोरडे पडल्याने पावसाची प्रतीक्षा

# जालना जिल्ह्यात पाणीबाणी : वस्ती, वाड्यांवर ८० टँकर

**जालना / प्रतिनिधी**

मराठवाड्यातील प्रमुख जिल्हा म्हणून ओळख असलेल्या जालना शहरासह बहुतांश गावात यंदा पाणीबाणीचे संकट उभे टाकले आहे. प्रशासन तुर्तास ५० गावे आणि ४० वाड्यांवर ८० टँकरव्दारे पाणी पुरवठा करीत असले तरी जलस्त्रोत कोरडे पडत असल्याने प्रशासनाला पावसाची प्रतीक्षा लागली आहे.

जून महिना सुरू होऊन दहा दिवस झाले असतांना जालना जिल्ह्यात उष्णतेची तीव्रता कायम आहे. पाणीटंचाईचे संकट अधिकच गडद झाले आहे. पावसाळ्याचे संकेत मिळू लागले असले तरी अद्याप पावसाचे आगमन न झाल्याने अनेक भागांतील विहिरी आणि जलस्रोत कोरडे पडले आहेत. परिणामी नागरिकांची तहान भागविण्यासाठी प्रशासनाला टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र हे टँकर भरायची कुठे असाही प्रश्न प्रशासनासमोर आहे. ज्या खासगी विहिरींचे अधिगृहन केले त्यांतील बहुतांश विहिरी सध्या कोरड्या पडल्या आहेत. तर बोअरवेल आणि अन्य



जस्त्रोतांनी देखील तळ गाठला आहे.

त्यामुळे मिळेल त्या ठिकाणाहून जिल्ह्यातील ५० गावे आणि ४० वाड्यांना सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यात एकूण ८० टँकर कार्यरत असून १४ शासकीय तर ६६ खासगी टँकरांचा समावेश आहे. पाणीटंचाईची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने प्रशासन सतर्क झाले असून प्रशासकीय पातळीवर देखील पावसाची प्रतीक्षा केली जात आहे.

### तापमान होईना कमी

यंदाच्या उन्हाळ्यात मार्चपासूनच तापमानाचा पारा चढू लागला होता. एप्रिल आणि मे महिन्यात अनेक ठिकाणी तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले. हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला असल्याने प्रशासकीय पातळीवर नागरिकांना काळजी घेण्याचे आवहान करण्यात आले. आता जून महिना लागून ११ दिवस झाले असतांना तापमानात घट होतांना दिसत नाही. त्यामुळे अद्यापही नागरिकांच्या आरोग्याला धोका वर्तविण्यात येत आहे.

### बदनापूर तालुक्यात परिस्थिती गंभीर

बदनापूर तालुक्यात परिस्थिती सर्वाधिक गंभीर असून १६ गावांतील २७ वाड्यांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जाफराबाद, भोकरदन, अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील अनेक गावांनाही टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. दरम्यान, रोहिणी नक्षत्रात अपेक्षित पाऊस न झाल्यास टँकरची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### मराठवाड्याला पावसाची प्रतीक्षा

उष्णतेच्या झळा आणि वाढत्या पाणीटंचाईमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला असला तरी दीर्घकालीन दिलासा केवळ मान्सूनच्या आगमनातूनच मिळू शकतो. त्यामुळे शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाचे लक्ष आता पहिल्या दमदार पावसाकडे लागले आहे.

## जालना मनपाचे घंटागाडी चालक संपावर

तीन महिन्याचे वेतन अदा करण्याची मागणी

**जालना / प्रतिनिधी**

जालना शहरात महापालिकेकडून कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडी चालकांचे तीन महिन्याचे वेतन थकल्याने संबंधीत कर्मचारी संपावर गेले आहेत. परिणामी शहरात रोज १२० टन कचरा साचत असून शहरातील विविध भागात दुर्गंधी पसरली आहे.

महापालिकेकडून ५१ घंटागाड्या, १६ ट्रॅक्टरव्दारे रोज १२० टन कचरा उचलला जातो. मात्र मागील तीन महिन्यापासून या गाडीचालकांचे वेतन मनपाकडे थकले आहेत. त्यामुळे घंटागाडी चालकांनी बुधवारपासून संप पुकारला असून शहरातील विविध भागासह मुख्य चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. ये-जा करणाऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत असून प्रशासन, कंत्राटदार यांच्यातील आर्थिक गोंधळामुळे ४ लाख जालनेकरांना दुर्गंधी, अस्वच्छता, आरोग्याचा प्रश्न सतावत आहे.

स्वच्छ शहराचे दावे करणाऱ्या महापौर, उपमहापौर, आयुक्तांचे दावे कचऱ्याच्य ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याचा अरोप आता नागरिकांकडून होत आहे. घंटागाडी चालकांनी संप केल्याने जुना किल्ला परिसरात घंटागाड्या उभ्या आहेत. मनपाकडे पर्यायी व्यवस्था नसल्याने देहेडकरवाडी, नूतन वसाहत, कचेरी रोड, गांधीनगर, मंगळ बाजार, चमडा बाजार, रेल्वेस्टेशन रोड, भोकरदन नाका परिसर, कन्हैयानगर, चंदनझिरा, सुंदरनगर, आयशाकिरण टाऊनशिप, झेडपी क्वार्टर परिसर, टीव्ही सेंटर, राजपूतवाडी, अंबड चौफुली, आनंदनगर आदी प्रभागांत कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. दोन दिवसांपूर्वीच जालना शहरात पाऊस झाला. आता कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. साचलेल्या कचऱ्यातील सांडपाणी, कुजलेला जैविक कचरा रोगराईला निमंत्रण देणारा ठरत आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुन्या, गॅस्ट्रो आदींचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे यांच्याकडून मनपा पर्यायी व्यवस्था करीत असून सध्या १६ ट्रॅक्टरव्दारे कचरा उचलण्याचे काम सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे. काही दिवसावर पावसाळा येऊन ठेपल्याने मनपाने घंटागाड्या चालकांचे वेतन अदा न केल्यास शहरात कचऱ्याची मोठी समस्या निर्माण होण्याची श्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

### लवकरच काम सुरूळीत

कचरा संकलनासाठी एजन्सी नेमण्यात आली असून ती चालकांना वेतन देते. लवकरच या घंटागाड्या चालकांचे वेतन संबंधीत एजन्सी देईल त्यानंतर कचरा संकलन करणाऱ्या गाड्या सुरू होतील.

**- एस.कटारे,**
मनपा घनकचरा विभाग

### मद्यधुंद दुचाकीस्वाराचा वाहतूक पोलिसांवर हल्ला

**वाळूज महानगर/ प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर - पुणे महामार्गावरील तिरंगा (ओअॅसिस) चौकात ड्रंक अॅण्ड ड्राइव्ह मोहिमेदरम्यान मद्यधुंद दुचाकीस्वाराने वाहतूक पोलिस निरीक्षकासह एका कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना सोमवारी रात्री घडली.

याप्रकरणी संबंधित दुचाकीस्वारासह अन्य दोघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा नोंद झाला. वाहतूक शाखेचे पोलिस अंमलदार विकास गुमलाडू आणि पोलिस हवालदार अरुण फोलाने हे तिरंगा (ओअॅसिस) चौक येथे नाकाबंदी करून ड्रंक अॅण्ड ड्राइव्हची कारवाई करीत होते.

त्यावेळी दुचाकी (एमएच २० एचके ४७६९) वरील चालक कृष्णा त्र्यंबकराव गोरे याची तपासणी करण्यात आली. यात गोरे दोषी आढळले. त्याची दुचाकी ताब्यात घेऊन वाहतूक शाखा कार्यालयात नेण्याची प्रक्रिया सुरू असताना गोरे याने आक्षेप घेत आरडाओरडा केला. त्यानंतर त्याच्या ओळखीचे आणखी दोन जण घटनास्थळी आले. त्यांनीही पोलिसांच्या कारवाईला विरोध केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## नमो तेलबिया योजना : शेतकऱ्यांना सोयाबीन बियाणे वाटप



**जाफ्राबाद / प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली ''नमो तेलबिया योजना'' अंतर्गत ऑनलाईन नोंदणी केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन यिाणे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी मोठा आधार मिळणार आहे

जाफ्राबाद येथील बालाजी कृषी सेवा केंद्र येथे गुरूवार, ११ जून रोजी आयोजित कार्यक्रमात आ. संतोष दानवे यांच्या पाठपुराव्यातून या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा तालुका अध्यक्ष नानाभाऊ भागिले आणि महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन सुधीर पाटील, माजी सभापती भाऊसाहे जाधव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजेश चव्हाण, उपसभापती साहेबराव लोखंडे, नगरसेवक सुरेश दिवटे, बेलोरा येथील सरपंच राजेश म्हस्के, माहोरा येथील सरपंच गजानन लहाने तसेच अंबादास जाधव, मंडळ कृषी अधिकारी शेळके, बालाजी कृषी सेवा केंद्राचे संचालक अमोल पडघन, आदींची उपस्थिती होती.

### वैजापुरात हिसकावले वृद्धेचे गंठण

**वैजापूर :** वृद्धेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावत दुचाकीस्वारांनी पोबारा केला. वैजापूर येथील यशवंत कॉलनीत ८ जून रोजी सकाळी ही घटना घडली. मनोरमा काशिनाथ वाणी (६५, रा. यशवंत कॉलनी) असे गंठण चोरी गेलेल्या वृद्धेचे नाव आहे. त्या आठ जून रोजी सकाळी साडेनऊ वाजता आपल्या घराच्या गेटाहेर फुले तोडत असताना पाठीमागून आलेल्या दुचाकीस्वार चोरांनी त्यांचे गंठण लाविले.

## सोयगाव तालुक्यात कापूस पिकाचा विमा मिळणार कधी ?

२९ हजार ७६६ शेतकरी मदतीपासून वंचित

**सोयगाव / प्रतिनिधी**

गेल्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान सोसलेल्या सोयगाव तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याची अद्याप प्रतीक्षाच आहे. चालू वर्षीचा खरीप हंगाम सुरू होण्यास अवघे चार दिवस उरले असताना, तालुक्यातील २९,७६६ शेतकऱ्यांचे लक्ष आता कापूस पिकाचा विमा कधी आणि किती मिळणार, याकडे लागले आहे.

गेल्यावर्षीच्या पावसाळ्यात अतिवृष्टी आणि पुराच्या तडाख्यात कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तालुक्यातील चारही महसूल मंडळातील २९ हजार ७६६ शेतकऱ्यांनी २६ हजार १०१ हेक्ट क्षेत्रावरील कपाशीचा विमा उतरवला होता. सोयाबीन पाठोपाठ कापूस पिकाच विमा मंजूर करण्यात येणार असल्याचे कृष विमा कंपनीकडून सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात अद्याप एकाही कापूस उत्पादकाल नुकसान भरपाई मिळालेली नाही त्यामुळे यंदाच्या पेरण्यांसाठी आर्थिक जुळवाजुळव कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

दरम्यान, सोयगाव तालुक्यातील कपाशी पिकांचे अंतिम पीक कापणी प्रयोग अहवाल शासनाच्या पोर्टलवर आणि पीक विमा कंपनीकडे सादर केले आहेत. पुढील प्रक्रिया कंपनीच्या हातात असून, यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत असल्याची माहिती सोयगावचे कृषी अधिकारी भारत कासार यांनी दिली आहे.

## अंगणवाड्यांचे इमारत भाडे, आहार बिल तात्काळ अदा करा

**कन्नड / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांचे मार्च २०२४ पासूनचे थकीत इमारत भाडे तसेच मार्च २०२५ पासून प्रलंबित असलेले आहार बिल (आरबीएल) तात्काळ अदा करण्यात यावे, या मागणीसाठी अंगणवाडी कर्मचारी संघटना (सिटू) चे राज्य सचिव कॉ. सुधीर सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी भीमाशंकर माळगे यांना निवेदन देण्यात आले. अंगणवाडी इमारत भाडे व आहार लिाची मोठी थकबाकी असल्यामुळे अंगणवाडी सेविका, महिला व बालकल्याण विभाग जिल्हा कार्यक्रम अधिकारी माळगे यांना निवेदन देताना कॉ. सुधीर सोनवणे यांच्यासह अंगणवाडी कर्मचारी, मदतनीस तसेच इमारत मालकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

अनेक ठिकाणी इमारत मालकांकडून भाड्याची (रेंट) वारंवार मागणी होत असून, कर्मचाऱ्यांवर मानसिक व आर्थिक ताण वाढत आहे. शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून संधित थकीत इमारत भाडे व आहार बिल अदा करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## नांदुर-मधमेश्वर कालव्याचे पाणी पिण्यासाठी आरक्षीत केल्याने न्यायालयात याचिका

पुढील महिन्यात होणार सुनावणी

**वैजापूर / प्रतिनिधी**

गंगापूर - वैजापूर या कायम दुष्काळी तालुक्यासाठी असलेल्या नांदूर मधमेश्वर जलद कालव्याच्या हक्काच्या पाण्यावर नाशिक पाटबंधारे विभागाने पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण टाकले आहे. हे अन्यायकारक आरक्षण टाकल्याने याच्या विरोधात वैजापूर मर्चंट बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर पुढील महिन्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे.

वैतरणा धरणातून येणाऱ्या पाण्यापैकी किमान ४.५ टिएमसी पाणी नांदूर मधमेश्वर जलद कालव्या करीता आरक्षित करावे अशी मागणी देखील संचेती यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कायमस्वरूपी टंचाईग्रस्त, दुष्काळग्रस्त असलेल्या गंगापूर व वैजापूर तालुक्यासाठी नाशिक जिल्ह्यात मुकणे, भावली, भाम व वाकी ही चार धरणे बांधण्यात आलेली आहेत. नांदूर मधमेश्वर जलद कालव्यावर ४३८६० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मित झालेले असून लाभार्थी गावांची संख्या १०२ एवढी आहे. कालव्याकरीता नाशिक जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या या ४ धरणांचा उपयुक्त पाणीसाठा ३८६.१० दलघमी एवढा आहे. मंजूर प्रकल्प अहवालानुसार जलद कालवा मुखाशी ३१८ दलघमी (११.२३ टिएमसी) पाणी मंजूर आहे. जलद कालव्याच्या धरणांवर नाशिक विभागाने त्यांच्या भागातील पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या जवळपास १९१ दलघमी ( ६.७४ टीएमसी) पाण्याचे आरक्षण केले आहे. म्हणजेच उपयुक्त पाणीसाठ्याच्या ४९.४१ टक्के पाणी आरक्षीत झाले आहे. सदरील बिगर सिंचन आरक्षणामुळे उपरोक्त नांदूर मधमेश्वर जलद कालव्याकरिता मंजूर असलेल्या सिचन पाण्यात मोठ्या प्रमाणात कपात होत आहे.

## जोडवाडी ते पंढरपूर पायी दिंडीचे आयोजन

**पाचपीरवाडी / प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील जोडवाडी (कचनेर परिसर) ते पंढरपूर अशी पहिली संत मिराबाई पायी दिंडी यात्रा येत्या ९ जुलै रोजी निघणार आहे. या यात्रेचे नियोजन सकल राजपूत परदेशी समाजाच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती डॉ. जीवन राजपूत यांनी दिली आहे.

कचनेर परिसरातील जोडवाडी येथून ९ जुलै रोजी निघणारी पायी दिंडी आषाढी एकादशीला मोठ्या पंढरपुरात पोहोचणार आहे. या दिंडीत शेकडो भाविक आणि वारकरी सहभागी होणार आहेत. संत मिराबाई भक्तगण आणि सकल राजपूत परदेशी समाजाच्या वतीने या पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले



आहे. या दिंडीच्या आयोजनासाठी सकल राजपूत समाजाची बैठक नुकतीच महंत शिवचैतन्य गिरी महाराज यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी डॉ. जीवन राजपूत यांच्यासह सकल राजपूत समाजाचे पदाधिकारी व सदस्य उपसिथत होते. येत्या ९ जुलै रोजी निघणाऱ्या पायी दिंडीत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल राजपूत समाजाच्या वतीने डॉ. जीवन राजपूत, महंत शिवचैतन्य गिरी महाराज यांनी केले आहे.

### अनाहूत आला अन् पाच हजार हिसकावून गेला

**छत्रपती संभाजीनगर :** पत्नीला घेण्यासाठी सिडको एन ४ येथील रस्त्यावर थांबलेल्या एका इसमाला अनोळखीने लुटल्याची घटना ७ जून रोजी रात्री पावणे दहा वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी पुंडलीकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय फुलसिंग शिसोदे रा. न्यायनगर गारखेडा परिसर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार पत्नीला घेण्यासाठी ते सिडको एन ४ येथील मॉलजवळ उभे होते. तिरूपती पार्क येथून औषधी आणण्यासाठी जात असताना एका अनोळखी इसमाने त्यांना दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पैसे देण्यास नकार दिला असता त्याने अचानक पँटच्या खिशात हात घालून ५ हजार ५०० रूपये काढून पळून गेला.

## जिल्हा क्रिकेट संघटनेची २३ जून रोजी निवडणूक

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडू आणि क्रीडाक्षेत्रातील मंडळींचे लक्ष लागून असलेल्या जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्यकारिणीची निवडणूक तब्बल १८ वर्षानंतर जाहीर झाली. सार्वजनिक न्यास नोंदणी तथा धर्मादाय उपआयुक्त कार्यालयाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सोमवार, ८ जून रोजी मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. येत्या २३ जून रोजी निवडणूक व निकाल जाहीर होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनची नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक घेण्यासाठी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने निरीक्षक म्हणून वि.सो. डोंगरदिवे यांची नेमणूक केली आहे. त्यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. मंगळवार, ९ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत या सभासद यादीवर आक्षेप, हरकत घेण्यास मुदत आहे. ९ जून रोजी दपारी ३:३० ते सायंकाळी ४ या वेळेत प्राप्त आक्षेप, हरकत अर्जाची पडताळणी होईल. दुसऱ्या दिवशी बुधवार, १० जून रोजी सायंकाळी ४ ते ५ या वेळेत अंतिम सभासद यादी प्रसिद्ध होणार आहे. गुरुवार, ११ जून रोजी सकाळी ११ ते ३ पर्यंत उमेदवारी अर्ज देणे आणि स्वीकारणे. दुपारी ३ ते ५ या वेळेत उमेदवारी अर्जाची छाननी करण्यात येईल.

## महसूल अधिकाऱ्याला धमक्या; दोघांवर गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

सोसायटीचे रेकॉर्ड हस्तगत करण्यासाठी गेलेल्या मंडळ अधिकाऱ्यांला शिवीगाळ करीत धमकी दिल्याचा प्रकार त्रिमुर्ती चौक गारखेडा परिसरात घडला. याप्रकरणी दोन आरोपींवर जवाहरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माणिक आनंदराव ढाकणे व श्रीकांत माणिक ढाकणे रा. न्यू शांती निकेतन कॉलनी अशी आरोपींची नावे आहेत.

याप्रकरणी महसूल विभागाचे मंडळ अधिकारी शेखर गोविंदराव शिंदे रा. उस्मानपुरा यांनी फिर्याद दिली.

फिर्यादीनुसार ८ जून रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास फिर्यादी वरिष्ठांच्या आदेशाने न्यू शांतीनिकेतन मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित गारखेडा या सोसायटीचे रेकॉर्ड हस्तगत करण्यासाठी गेले होते. आरोपींनी शासकीय कामात अडथळा आणत शिवीगाळ केली. अंगावर धावून येत तूला पाहून घेतो असे म्हणत धमकी दिली. याप्रकरणी आरोपींवर जवाहरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

टेंभुर्णीत सर्वधर्मीय २५ जोडप्यांना धोंडे जेवण

## मैत्रीच्या नात्याला आपुलकीचा ओलावा...

**टेंभूर्णी / प्रतिनिधी**

मैत्रीला कोणतीही जात-पात, धर्म किंवा पंथाचे बंधन नसते. आजच्या सोशल मीडियाच्या युगात, जिथे रक्ताची नाती दुरावत आहेत, तिथे टेंभुर्णी येथील साळवे कुटुंबीयांनी मैत्रीच्या नात्याला आपुलकीचा ओलावा देत टेंभुर्णीत सर्वधर्मीय २५ जोडप्यांना धोंडे जेवण देवून समाजात आदर्श जातीय सलोखा जोपासला आहे.

हिंदू संस्कृतीत अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या अधिकमासाच्या पुण्यकाळात आयोजित धोंडे जेवण कार्यक्रमाच्या निमित्ताने हा अनोखा, कौतुकास्पद उपक्रम राबवण्यात आला. हिंदू संस्कृतीमध्ये अधिकमासात जावयाला किंवा आप्तेष्टांना धोंडे जेवण घालण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच धार्मिक परंपरेचे औचित्य साधून टेंभुर्णी येथील साळवे कुटुंबातील आधारवड प्रल्हादराव साळवे, त्यांच्या पाचही सुपुत्रांनी, नातवंडांनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. साळवे कुटुंबीयांतील रमेश साळवे हे टेंभुर्णीमध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या मानव सेवा मंडळाचे सक्रिय सदस्य आहेत. याच सामाजिक बांधिलकीतून त्यांनी केवळ नातेवाइकांनाच नव्हे. मंडळातील सर्वधर्मीय मित्रांनाही या सोहळ्यात समाविष्ट करून घेण्याचे ठरवले. दरम्यान, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कांताबाई प्रल्हादराव साळवे, छाया रमेश साळवे, शारदा नंदकिशोर साळवे, रेणुका विठ्ठल साळवे, दुर्गा विष्णू साळवे व दीपाली शिवहरी साळवे यांनी पुढाकार घेतला. टेंभुर्णी येथे मानव सेवा मंडळाच्या माध्यमातून विविध जाती-धर्मातील मित्र एकत्र येऊन नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग घेतात. विचारांची देवाणघेवाण करत हे मित्र एकमेकांच्या सुख-दुःखाचे सोबती बनले आहेत. याच मैत्रीच्या नात्याला अधिक घट्ट करण्याचे काम साळवे कुटुंबीयांनी या धार्मिक परंपरेच्या माध्यमातून केले. नात्याच्या पलीकडे जाऊन जपलेल्या या मैत्रीचा आणि आपुलकीचा ओलावा सर्वच उपस्थितांनी अनुभवला. धार्मिक विधी व परंपरेनुसार या सर्व मित्रपरिवाराला धोंडे जेवण देण्यात आले. सर्व २५ जोडप्यांचा विशेष गौरव करण्यात आला. एकाच पंगतीत विविध जाती-धर्मांचे लोक बसल्याने या सोहळ्याला सामाजिक सलोख्याच्या महोत्सवाचे स्वरूप आले.

### एकाच पंगतीत सलोख्याचा महोत्सव

सामाजिक एकोपा वाढीस लावण्यासाठी सर्व मित्र अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने एकत्र येतात. या निमित्ताने महिला मैत्रिणींच्याही भेटीगाठी होतात. विशेषतः यात सर्व जाती-धर्मांचे मित्र-परिवार एकत्र आल्याने सामाजिक एकोपा वाढीस लागतो. त्यामुळे टेंभुर्णी येथे मानव सेवा मंडळाच्या माध्यमातून विविध जाती-धर्मातील मित्र एकत्र येऊन नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग घेतात. विचारांची देवाणघेवाण करत हे मित्र एकमेकांच्या सुख-दुःखाचे सोबती बनले आहेत. याच मैत्रीच्या नात्याला अधिक घट्ट करण्याचे काम आमच्याकडून केले जाते.

**- उषा शैलीप्रकाश वाघमारे,**
गृहिणी

## जि.प.ची सर्वसाधारण सभा ३० जून रोजी

**छत्रपती संभाजीनगर :** विधानपरिषद निवडणुकीची अचारसंहिता २५ जून रोजी संपत असून ३० जून रोजी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आहेत आहे. आ. प्रशांत यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी प्रशासकीय काळातील जिल्हा परिषदेच्या कार्यभारावर शंका उपस्थित केल्याने ही सभा वादळी ठरणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जिल्हा परिषदेची ही दुसरी सर्वसाधारण सभा असून प्रशासकीय मुख्यालयाचे काम अद्याप पूर्ण नसल्याने सभा घ्यायची कुठे असाही प्रश्न सध्या प्रशासनासमोर आहे.

न्यूज ब्रीफ

### फार्मर्स ग्रुप लीग स्पर्धेत ५०३ गटांचा उत्स्फूर्त सहभाग

**यवतमाळ :** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तथा प्रकल्प संचालक आत्मा, यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगाम २०२६ मध्ये शेतकरी गटांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ''फार्मर्स ग्रुप लीग या नाविन्यपूर्ण स्पर्धेला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १० जून ही अंतिम मुदत देण्यात आली होती. अंतिम मुदतीपर्यंत जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील शेतकरी गटांनी सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील एकूण ५०३ शेतकरी गट आणि त्यांचे ५ हजार ९५७ सक्रिय सभासद यांनी नोंदणी केली आहे. सर्वाधिक सहभाग उमरखेड तालुक्यातून नोंदविण्यात आला असून येथील ९१ गावांमधील ९१ शेतकरी गटांच्या १ हजार ५ शेतकऱ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यानंतर कळंब तालुक्यातील ७६ शेतकरी गटांच्या ८७७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

### आता झाडांचेही 'डिजिटल हेल्थ कार्ड'

**नागपूर :** शहरात झाडांचे आरोग्य तपासण्यासाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने 'लायडार' तंत्रज्ञान आणले आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने झाडांचे 'डिजिटल हेल्थ कार्ड' तयार केले जाणार आहे. बुधवारी दीक्षाभूमी परिसरात महापौर नीता ठाकरे यांच्या उपस्थितीत या तंत्रज्ञानाचे लोकार्पण करण्यात आले. नागपूर महानगरपालिकेने 'स्माईल कौन्सिल' उपक्रमांतर्गत 'ट्रीकोटेक एलएलपी' आणि 'थ्रीहील पीटीई' यांच्या तांत्रिक सहकार्याने ही मोहीम हाती घेतली आहे. रस्त्यावरून धावणाऱ्या एका विशेष वाहनावर 'लायडार' स्कॅनर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान बसवण्यात आले आहे. हे वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या प्रत्येक झाडाचे अचूक डिजिटल मॅपिंग करेल.

पेनगंगा साखर कारखान्याची शेतकरी हिताची परंपरा कायम

# विदर्भातील उच्चांकी ३१२१ रुपये ऊसदर; संपूर्ण ऊसबिलाची रक्कम अदा

मासरुळ/प्रतिनिधी



शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पेनगंगा साखर कारखाना प्रा. लि. वरुड ने गाळप हंगाम २०२५-२६ मधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संपूर्ण ऊसबिलाची रक्कम अदा केली आहे. विदर्भातील सर्वाधिक ३१२१ रुपये प्रतिटन ऊसदर देत कारखान्याने शेतकरीहिताची आपली परंपरा कायम राखली आहे. त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कारखान्याचे चेअरमन अनिल गुंजाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, कारखान्याने केंद्र सरकारने निश्चित केलेल्या एफआरपीपेक्षा तब्बल ७३६ रुपये अधिक दर देऊन शेतकऱ्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान केला आहे. गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर सुमारे ५८ कोटी रुपयांची ऊसबिल रक्कम जमा करण्यात आली असून हंगामातील सर्व ऊसाची देयके पूर्णपणे अदा करण्यात आली आहेत.

तोडणी व वाहतूक ठेकेदारांची देयकेही नियमितपणे अदा करण्यात आल्याने कारखान्याविषयीचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. यामुळे परिसरातील शेतकरी ऊस शेतीकडे शाश्वत आणि फायदेशीर उत्पन्नाचे साधन म्हणून पाहत असून ऊस लागवड क्षेत्रात लक्षणीय वाढ होत आहे. यावेळी अनिल गुंजाळ यांनी शेतकऱ्यांना कारखान्याच्या विविध ऊस विकास योजनांचा लाभ घेऊन अधिकाधिक ऊस लागवड करण्याचे तसेच आगामी गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी कारखान्याशी समन्वय राखण्याचे आवाहन केले.

#### आगामी हंगामासाठी ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

■ कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन २५०० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आली असून मागील हंगामात या क्षमतेची यशस्वी चाचणी पूर्ण क्षमतेने घेण्यात आली आहे. आगामी गाळप हंगामासाठी मोठ्या प्रमाणात ऊस नोंदणी झाली असून सुमारे ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कारखान्यातील सर्व विभागांची हंगामपूर्व तयारी सुरू झाली असून यंत्रसामग्री दुरुस्ती, देखभाल, वाहतूक नियोजन आणि प्रशासकीय कामे वेगाने सुरू असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## रिकामे भूखंड स्वच्छतेची जबाबदारी मालकाची

यवतमाळ/प्रतिनिधी



शहरात कुठल्याही परिसरात तुमचा भूखंड असेल आणि तो रिकामा पडुन असेल तर आता त्या मोकळ्या भूखंडाची स्वच्छता तुम्हाला स्वत: करावी लागणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या पालिकेच्या सर्वसाधारण सभेत यासंदर्भात नगरसेवक भारत ब्राम्हणकर यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला असुन आता लवकरच या निर्णयावर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे आता खुल्या भूखंडांच्या स्वच्छतेची जबाबदारी भूखंड मालकावर निश्चीत करण्यात आली आहे.

अनेक मोकळ्या भूखंडामध्ये अशा घाण पाण्याचे डबके साचलेले पहायला मिळतात. इतकेच नव्हे तर अनेक भूखंडांवर झाडे, झुडपे वाढलेली असतात. यामध्ये वराहांचा संचार असतो. एकंदरीतच असे मोकळे भूखंड अस्वच्छता पसरण्यासाठी कारणीभुत ठरत आहे. असे असताना त्या भुखंडावर भूखंड धारकास रहायला जायचे नसल्याने तो देखील त्याच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतो. ही बाब परिसरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे.

खुल्या भुखंडधारकांना नोटीस दिल्यानंतर त्यांनी ठराविक कालावधीमध्ये भूखंडाची स्वच्छता करुन न घेतल्यास त्या भूखंडाची स्वच्छता पालिका प्रशासन करुन घेणार आहे. मात्र त्या कामासाठी येणारा खर्च व्याजासह संबंधीत भूखंड धारकाच्या मालमत्ता करामध्ये जोडुन वसुल करण्यात येणार आहे. त्यामुळे या बाबीकडे लक्ष न देणाऱ्यांना हा अतिरिक्त फटका सहन करावा लागणार आहे.

## स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांच्या अंदाजाचा फटका ; संत्रा बागा संकटात

मानोरा तालुक्यातील संत्रा उत्पादक अडचणीत

मानोरा/प्रतिनिधी

स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या लवकर पावसाच्या अंदाजावर विश्वास ठेवून अनेक संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी मृग बहरासाठी आपल्या बागांना ताण दिला. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने ताणावर सोडलेली संत्रा झाडे सुकण्याच्या मार्गावर असून तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

संत्रा उत्पादनात मृग बहराला विशेष महत्त्व असते. बहर चांगला येण्यासाठी शेतकरी काही काळ झाडांना पाणी देणे बंद करून ताण देतात. त्यानंतर पावसाच्या आगमनानुसार सिंचन व इतर व्यवस्थापनाचे नियोजन केले जाते.



यंदा स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांनी लवकर आणि समाधानकारक पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने अनेक शेतकऱ्यांनी त्यानुसार निर्णय घेतला. मात्र पाऊस लांबल्याने संत्रा बागांपुढे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. वेळेवर पाऊस न पडल्यामुळे झाडांवरील ताण वाढत असून पाने गळणे, फांद्या वाळणे आणि बहरावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक शेतकऱ्यांना आता पुन्हा सिंचनासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत असून वीज, इंधन आणि मजुरीचा खर्चही वाढला आहे. आधीच वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. चुकीच्या अंदाजाचा सर्वाधिक फटका फळबाग उत्पादकांना बसत असल्याने कृषी विभागाने संत्रा उत्पादकांना तातडीने मार्गदर्शन करावे, अशी मागणी होत आहे.

> ''लवकर पावसाच्या अंदाजामुळे अनेक शेतकऱ्यांनी दीड महिन्यापासून संत्रा बागांना ताण दिला. मात्र पाऊस न आल्याने बागा संकटात आल्या असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.''
>
> **- सुधाकर चौधरी,** संत्रा उत्पादक शेतकरी, आमगव्हाण

> ''स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांनी ८ ते २२ मे दरम्यान भरपूर पाऊस होईल, असे भाकीत केले होते. त्या अंदाजावर विश्वास ठेवून अनेक शेतकऱ्यांनी संत्रा बागा ताणावर सोडल्या. मात्र पाऊस न झाल्याने झाडे पिवळी पडत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.''
>
> **- मुंगशिराम उपाध्ये,** संत्रा उत्पादक शेतकरी, बेलोरा

## मान्सूनपूर्व पूर आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

अमरावती/प्रतिनिधी

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उद्भवू शकणाऱ्या पूर परिस्थितीचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिष येरेकर यांच्या आदेशाने मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथक, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने या थरारक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संतोष काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड तलाव येथे जिल्हास्तरीय पूर आपत्ती व्यवस्थापन रंगीत तालीम (मॉकड्रिल) पार पडली. या रंगीत तालीमीदरम्यान पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुरक्षित सुटका करणे, त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवणे आणि पूर परिस्थितीमुळे घरांची पडझड किंवा इतर आपत्ती ओढवल्यास शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून जीवितहानी कशी टाळायची, याचे थेट सादरीकरण करण्यात आले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, चांदूर रेल्वेचे नायब तहसीलदार अनिल चौरे, पोलीस निरीक्षक मिश्रा, पोलीस निरीक्षक यादव, एनडीआरएफ नागपूरचे डॉ.झा, मुंबई मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ अनुराग कचोरी, महसूल अधिकारी प्रमोद शिरसाठ, तलाठी दीपक चव्हाण, आरोग्य यंत्रणेचे डॉ. अविनाश पवार,



प्रीती पवार, सौरव पाठक, मनोज माकोडे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सचिन धरमकर, विशाल लिमकर, आकाश निमकर, कौस्तुभ वैद्य, सुमित बांबल, प्रतिक कडू, नारायण दवंगे, अशोक निंबरते तसेच 'आपला मित्र' संस्थेचे तुषार गोंडाणे व अमोल गोंडाणे यांनी प्रत्यक्ष पाण्यात उतरून शौर्यपूर्ण बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी केले.

## अडगाव बु. आणि शिवाजीनगर ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर

अडगाव बु./प्रतिनिधी

तेल्हारा तालुक्यातील मुदत संपलेल्या ३३ ग्रामपंचायतींच्या प्रभाग निहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम गुरुवारी प्रशासनाच्या वतीने पार पडला. यामध्ये अडगांव बु आणि शिवाजीनगर ग्रामपंचायतीच्या आरक्षणाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या नव्या आरक्षण सोडतीमुळे अनेक प्रभागांत महिलांना मोठी संधी मिळाल्याने निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या दिग्गज पुरुष उमेदवारांचे राजकीय गणित बिघडले असून त्यांना मोठा धक्का बसला आहे.

अडगाव बु. ग्रामपंचायतीच्या एकूण ६ प्रभागांमधील आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. प्रभाग क्र. १- ओबीसी महिला, खुला महिला, सर्वसाधारण, प्रभाग क्र. २- ओबीसी जनरल , खुला महिला, खुला सर्वसाधारण, प्रभाग क्र. ३- एस.टी. महिला, ओबीसी सर्वसाधरण, खुला सर्वसाधरण, प्रभाग क्र. ४- ओबीसी महिला, खुला सर्वसाधरण, प्रभाग क्र. ५ - एस.सी. महिला, खुला महिला, खुला सर्वसाधरण, प्रभाग क्र. ६- एस.सी. सर्वसाधरण, खुला महिला, खुला महिला या प्रकारे सोडत काढण्यात आली. सदर प्रक्रियेसाठी महसूल विभागाचे मंडल अधिकारी सोनवणे, तलाठी प्रवीण देशमुख, ग्रामसेवक अनिल खुमकर यासह प्रशासकीय समिती अध्यक्ष शोभा खंडारे, सदस्य संजय राजनकर, अशोक घाटे, गुलाब डाबेराव, बिट्टू बहाकर व बहुसंख्य नागरीक उपस्थित होते.

#### शिवाजीनगर ग्रामपंचायत

■ शिवाजीनगर येथील ग्रामपंचायतीची ग्रामसभा देखील गावकऱ्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. येथील एकूण ४ प्रभागांची आरक्षण स्थिती पुढीलप्रमाणे आहे. प्रभाग क्र. १- नामाप्र - महिला, सर्व साधारण महिला, सर्वसाधारण, प्रभाग क्र. २- अनुसूचित जाती महिला, सर्वसाधारण महिला , सर्वसाधारण, प्रभाग क्र ३ मध्ये- नामाप्र सर्वसाधरण, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण, प्रभाग क्र. ४ - अनु.जमाती, सर्वसाधारण महिला, अशा प्रकारे आहे. हा कार्यक्रम महसूल प्रशासन अधिकारी, ग्रामपंचायत प्रशासकीय अध्यक्षा गायत्री नितीन चिम, प्रशासकीय सदस्य आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत शांततेत संपन्न झाला.

### बियाणे महोत्सवाला शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**बाळापूर :** खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना घरचे बियाणे रास्त भावात मिळावेत या उद्देशाने बाळापूर येथे तालुकास्तरीय बियाणे महोत्सव घेण्यात आला. या ठिकाणी शेतकऱ्यांनी सहभागी होत बियाणे विक्रीसाठी आणले. शिवाय खरेदीसाठी शेतकरी आले होते. बाळापूर येथे तालुका कृषी अधिकारी, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संयुक्त विद्यमानाने आयोजन करण्यात आले होते. बियाणे महोत्सवास सुरुवात १० जून ते ११ जून या कालावधीत बाळापूर तालुक्यातील वाडेगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती बाळापुर उपबाजार वाडेगाव येथील हॉलमध्ये सोयाबीन बियाणे महोत्सव आयोजीत करण्यात आला होता.

## काँग्रेसमध्येच 'वॉर' : १५ कोटी घेत हर्षजित झाले मॅनेज

अमरावती/प्रतिनिधी



स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर आला आहे. काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख यांच्यावर माजी मंत्री आणि काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी ''१५ ते २० कोटी रुपये घेऊन मॅनेज झाल्याचा'' गंभीर आरोप केल्यानंतर देशमुख यांनीही तितक्याच आक्रमक शब्दांत पलटवार केला आहे.

नागपूरमधील खासगी रुग्णालयातूनच माध्यमांशी संवाद साधताना देशमुख यांनी थेट यशोमती ठाकूर यांच्यावरच भाजपला मदत करत असल्याचा आरोप केला. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसमधील अंतर्गत कलह उघडपणे समोर आला आहे.

हर्षजित देशमुख म्हणाले की, माझी प्रकृती बिघडल्यामुळे मी रुग्णालयात दाखल आहे. मात्र, माझ्या तब्येतीची विचारपूस न करता माझ्यावर बिनबुडाचे आरोप करण्यात येत आहेत. ''मला भेटायला काँग्रेसचे मोजकेच नेते आले. माझी तब्येत कशी आहे, याची माहितीही घेतली नाही आणि थेट आरोप सुरू झाले. मी मॅनेज होणारा व्यक्ती नाही. उलट यशोमती ठाकूरच भाजपला मॅनेज झाल्या असाव्यात. त्यांना काँग्रेसचे नुकसान करून भाजपला फायदा करून द्यायचा आहे,'' असा थेट आरोप त्यांनी केला. गेल्या काही दिवसांपासून देशमुख निवडणुकीतून माघार घेणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यावर त्यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. ''मी निवडणुकीतून माघार घेतलेली नाही आणि घेणारही नाही. मी अजूनही काँग्रेसचा अधिकृत उमेदवार आहे. पक्षाने पुढे काय निर्णय घ्यायचा तो घेईल, पण मी मैदानात कायम आहे,'' असे देशमुख यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, माझा मतदारांशी संपर्क सुरू आहे. सध्या डिजिटल माध्यमातून प्रचार करत आहे. डॉक्टरांनी डिस्चार्ज दिल्यानंतर अमरावतीत जाऊन प्रत्यक्ष प्रचार करणार आहे.

मलकापूर येथे इंडियन एक्सलन्स अवॉर्ड वितरण सोहळा उत्साहात..

# महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांचा गौरव

मलकापूर/प्रतिनिधी

हिंदी मराठी पत्रकार संघ द्वारा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जयंती निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी इंडियन एक्सलन्स अवार्ड २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते. यावेळी ३९० प्रस्तावांपैकी निवड करून ७८ मान्यवरांना इंडियन एक्सलन्स पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

इंडियन एक्सलन्स अवार्ड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशांत भाई वानखेडे, उद्घाटक म्हणून धनश्री काटीकर पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून बाळासाहेब दामोदर, प्रा. वैभव आढाव, वीरसिंह राजपूत, डॉ. प्रदीप गायकी , दिलीप आढाव, नेमीचंद धूत, चंद्रकांत वर्मा यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक, राजकीय, कला, वैद्यकीय, वकील, उद्योजक, अभिनय, अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार इंडियन एक्सलन्स अवार्ड २०२६ देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाला पत्रकार राजेश इंगळे, समाधान सुरवाडे, संदीप सावजी, विजय भगत, मनोज पाटील, स्वप्निल आकोटकर , कृष्णा मेहसरे, अशोक रावणकार, कैलास काळे, विजय वर्मा, उल्हास शेगोकार, अनिल गोटे, श्रीकृष्ण भगत, राजू घाटे, गोविंद रहाट, गणेश सुशीर, निलेश सोनवणे, गणेश नेमाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. प्रकाश थाटे, प्रमोद हिवराळे, विनायक तळेकर , सुधाकर तायडे, रवींद्र गव्हाळे ,नथूजी हिवराळे, मयूर लड्डा ,सय्यद ताहेर ,शेख निसार, देवेंद्र जयस्वाल, आत्माराम मोरे, कळू फुलपगारे, प्रशांत खंडागळे, किशोर सोनवणे यांनी परिश्रम घेतले.का र्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत सुरवाडे सर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.




#### पत्रकारांसाठी छत्र्यांचे वाटप

■ आगामी पावसाळा ऋतू लक्षात घेता हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार बांधवांसाठी खास संरक्षण म्हणून पावसाळी छत्री सप्रेम भेट देऊन पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. हिंदी मराठी पत्रकार संघ सातत्याने नव- नवीन उपक्रम राबवत असल्याबद्दल पत्रकार बांधवांनी समाधान व्यक्त केले.

## 'सारथी'तर्फे गाविलगड, असदगड किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम

अमरावती/प्रतिनिधी

मराठा, कुणबी व कुणबी-मराठा समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत असलेल्या 'सारथी' संस्थेच्या वतीने राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांवर विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नुकताच हा उपक्रम पार पडला. छत्रपती शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन करणे आणि शाहू महाराजांच्या लोककल्याणाचा विचार पुढे नेणे, हा यामागचा मुख्य उद्देश होता.

या मोहिमेत अमरावती विभागांतर्गत चिखलदरा येथील गाविलगड आणि अकोला येथील असदगड किल्ल्यावर 'सारथी'च्या संशोधन अधिछात्रवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गाविलगड येथे उपव्यवस्थापकीय संचालक सचिन शेजाळ यांच्या



मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी शंकर गोरे, रूपेश पडघन, सदाशिव आरसोड, योगेश भोयर, पवन मापारी आणि कर्मचारी किरण चाफाले, देवानंद सोळंके व कुलदीप सूरकर यांनी परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता मोहिमेसोबतच विद्यार्थ्यांनी स्थानिक प्रजातींच्या बिया, माती, शेण व बाविस्टीन पावडरचा वापर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केलेले 'सिडबॉल' चिखलदरा परिसरात टाकले, जेणेकरून पावसाळ्यात उत्तम वृक्षनिर्मिती होईल. तसेच, अकोला येथील असदगड किल्ल्यावर अक्षय बांगर, अनिरुद्ध दळवी, अमोल धोत्रे, अजय काळे, सूरज पारस्कर आणि प्रिया शेटे या संशोधक विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबवले. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीतील गड-किल्ल्यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले असून, नागरिकांनी या वास्तूंचे पावित्र्य राखावे व स्वच्छता ठेवावी, असे आवाहन 'सारथी' संस्थेने केले आहे.

## न्यूज ब्रीफ

### राष्ट्रवादीचा वर्धापनदिन वृक्षारोपणाने साजरा

**अंढेरा :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचा वर्धापनदिन देऊळगाव राजा येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला. तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने १० जून रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमातून पर्यावरण संरक्षण, हरित महाराष्ट्र आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे नवनिर्वाचित सभापती शंकर शिंगणे हे होते. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे, राजू चित्ते, विष्णू रामाने, अॅड. अर्पित मिनासे, भरत दंदाले, रावसाहेब डोके, पंढरी डोके, रमेश नरोडे, बबन डोके, शिवा मेहेत्रे, अॅड. रामेश्वर रामाने, किशोर म्हस्के, बाजार समितीचे कर्मचारी तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### फिफा फुटबॉल विश्वचषक चिअरअप कार्यक्रम

**बुलढाणा :** फिफा फुटबॉल विश्वचषक - २०२६ चिअरअप कार्यक्रमाचे आयोजन १० जून रोजी आयोजित करण्यात आले होते. २३ व्या फुटबॉल पुरुष फिफा विश्वचषकाची सुरवात ११ जूनपासून संयुक्त राज्य अमेरिका, मेक्सिको व कॅनडा या तीन देशांमध्ये झाली. भारतीय वंशाचे चार खेळाडू या फिफा विश्वचषकात सहभागी होत आहे. लहान वयोगटातील खेळाडूंना एक प्लॅटफफॉर्म व सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यामध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, जिल्हातील खेळाडूंना फिफा विश्वचषकाची माहिती प्राप्त व्हावी याकरिता हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, बुलढाणा जिल्हा फुटबॉल असोसिएशन अध्यक्ष एस. एस. ठाकरे, सचिव एन. आर. वानखेडे, तालुका क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, सहकार विद्या मंदिर, क्रीडा विभाग प्रमुख सय्यद आबीद यांची उपस्थिती होती.

## आ.संजय गायकवाड यांची अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक

# कोलवड गावाच्या पाणीटंचाईवर तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश

**बुलढाणा/प्रतिनिधी**

कोलवड येथे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार संजय गायकवाड यांनी गुरुवारी गावाला भेट देत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. गावकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत, नागरिकांना शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.



यावेळी गावातील पाणीपुरवठा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पाण्याचे उपलब्ध स्रोत, जलवाहिन्यांची स्थिती, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता तसेच भविष्यात पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे, अशा स्पष्ट सूचना आमदार गायकवाड यांनी दिल्या.बैठकीदरम्यान ग्रामस्थांनी आपल्या समस्या आणि मागण्या आमदार संजय गायकवाड यांच्यासमोर मंडल्या. यावेळी त्यांनी गावकऱ्यांना आश्वस्त करत, पाणीटंचाईच्या प्रश्नावर प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून तातडीने दिलासा देण्याचे आश्वासन दिले. तसेच दीर्घकालीन उपाययोजनांसाठी आवश्यक निधी व प्रशासकीय मंजुरी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, तालुकाप्रमुख धनंजय बारोटे, पाणीपुरवठा सभापती नयनप्रकाश शर्मा, नगरसेवक बबलू मावतवाल, सुभाष पाटील, रामदास दसरकर, विभागप्रमुख नीलेश पाटील, शाखाप्रमुख शंकर जाधव, ऋतिक दसरकर, मयूर दसरकर, नितीन जाधव, गजानन गायकवाड, सुरेश चाकोते, संतोष पाटील यांच्यासह सरपंच, उपसरपंच, शिवसेना व युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण..

■ गावकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेत प्रत्यक्ष गावात जाऊन परिस्थितीचा आढावा घेणाऱ्या आ. गायकवाड यांच्या या दौऱ्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले झाले. पाणीटंचाईच्या प्रश्नावर लवकरच सकारात्मक तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा

## रक्तदान करण्याचे आवाहन..

**बुलढाणा/प्रतिनिधी**

जिल्हा सामान्य रुग्णालय येथील रक्तपेढीत सध्या रक्ताचा तुटवडा निर्माण झाला असून, या पार्श्वभूमीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. कैलास झिने यांनी नागरिकांना उत्स्फूर्तपणे रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.

यंदाही रक्तसंकलनाचे प्रमाण कमी झाल्याने रक्तपेढीतील रक्तसाठा झपाट्याने घटला आहे. रक्त ही अशी जीवनदायी गोष्ट आहे जी कोणत्याही प्रयोगशाळेत अथवा कारखान्यात तयार करता येत नाही. ती केवळ मानवी रक्तदानातूनच उपलब्ध होते. त्यामुळे गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करावे, असे आवाहन डॉ. कैलास झिने यांनी केले.रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या अनेक रुग्णांना नियमितपणे रक्ताची आवश्यकता भासत असते. थॅलेसेमिया या आजारांनी ग्रस्त रुग्णांना सातत्याने रक्ताची गरज असते. तसेच अपघातग्रस्त रुग्ण, मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झालेली व्यक्ती, तसेच प्रसूतीदरम्यान किंवा शस्त्रक्रियेदरम्यान रक्ताची आवश्यकता भासणाऱ्या महिलांसाठी रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. रुग्णालय प्रशासनाच्या वतीने विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करून रक्तसंकलन केले जात असले तरी सध्याच्या वाढत्या गरजेच्या तुलनेत ते अपुरे पडत असल्याचे डॉ.झिने यांनी सांगितले.

> *"एका गंभीर रुग्णाला रक्ताची गरज असल्याचे समजताच मी तातडीने रक्तदान करण्यासाठी आलो. समाजातील प्रत्येक नागरिकाने रक्तदानाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, असे मला वाटते. रक्तदान केल्याने कोणताही त्रास होत नाही किंवा अशक्तपणा येत नाही. उलट एखाद्याचा जीव वाचविण्याचे समाधान मिळते. सध्या रक्ताचा तुटवडा असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी पुढे येऊन रक्तदान करावे, ही विनंती.*
> — **जावेद खान**, *बुलढाणा*

# सिद्धीच्या जिद्दीला शाहू परिवाराचा सलाम!

## गिर्यारोहक सिद्धी सोनोनेचा राजर्षी शाहू मल्टिस्टेटकडून गौरव



**बुलढाणा/प्रतिनिधी**

राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीपदादा शेळके यांनी चिमुकली गिर्यारोहक सिद्धी सोनोने हिच्या जिद्दीला सलाम करीत तिचा गौरव केला. राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या मुख्यालयी हा सत्कार सोहळा संपन्न झाला.

वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प सर करणारी सिद्धी विठ्ठल सोनोने हिचे यश जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. खेळण्या, बागडण्याच्या वयात सिद्धीने दाखविलेली जिद्द, चिकाटी आणि ध्येयपूर्तीसाठीची मेहनत अत्यंत प्रेरणादायी आहे. तिच्या या अभूतपूर्व यशामुळे बुलढाणा जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. जिल्ह्यातीलच नव्हे तर देशातील अनेक मुला-मुलींसाठी सिद्धी प्रेरणास्थान बनली आहे. यानिमित्ताने तिचा गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा मालतीताई शेळके यांनी सिद्धीचे अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच तिच्या आगामी शैक्षणिक, क्रीडा व गिर्यारोहण क्षेत्रातील वाटचालीसाठी आवश्यक ते सहकार्य व मदत करण्याचे आश्वासन दिले.

ग्रामीण भागातील प्रतिभावान व जिद्दी मुलांना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यशाची नवी शिखरे गाठू शकतात, याचे सिद्धी हे उत्तम उदाहरण आहे, असे मत मालतीताई शेळके यांनी व्यक्त केले.याप्रसंगी सिद्धीचे वडील विठ्ठल सोनुने, तुषार दोडिया, संजयकाका बाहेकर, व्ही. आर. चव्हाण, रघुनाथ जाधव, संतोषराव शेळके यांची उपस्थिती होती.

# १० कर्मचाऱ्यांना 'लालपरी गौरव रत्न' पुरस्कार

**बुलढाणा/प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने यावर्षीपासून प्रथमच सुरू करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'लालपरी गौरव रत्न' पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून ९८ कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये बुलढाणा विभागातील १० कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्ताने कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात तब्बल एक लाखाच्यावर अधिकारी, कर्मचारी काम करतात. त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक व्हावे या उद्देशाने एसटी महामंडळामध्ये नवनवीन उपक्रम राबवले जातात. या उपक्रमांमधून सर्वोत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी व कामगार यांना महामंडळाच्या वर्धापन दिनी गौरवण्यात येते. असाच एक नवीन उपक्रम एसटी महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आला. यावर्षीपासून 'लाल परी गौरव रत्न पुरस्कार' देण्याचे जाहीर करण्यात आले. ज्या कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे, महामंडळाच्या हिताचे काम केले त्यांना गौरवण्यात आले. एसटीच्या अपेक्षित उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न आणणारे चालक, वाहक तसेच प्रवासादरम्यान सापडलेल्या वस्तू, दागिने,पैसे, महत्त्वाची कागदपत्रे प्रवाशांना परत करणारे कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी एसटी महामंडळाची प्रतिमा उंचवण्याची, वाढवण्याची जनमानसात कामे केली अशा कर्मचाऱ्यांना 'लाल परी गौरव रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

मागवलेले शिफारस अर्ज प्रथम विभागातून त्यानंतर प्रादेशिक स्तरावरून निवडून व अंतीम निवड मुंबई येथुन जाहीर झाली. संपूर्ण महाराष्ट्रातून लिपिक प्रवर्गातून एकमेव सचिन लक्ष्मण पिंगळे विभागीय कार्यालय बुलढाणा यांची निवड झाली आहे. त्यामुळे ते महाराष्ट्रातील लिपिक प्रवर्गातील लाल परी गौरव रत्न पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले आहेत. त्यांच्यासह चिखली आगाराचे वाहतूक नियंत्रक संजय लांडे, चालक गणेश देवरे, वाहक राजू चव्हाण, वाहक चालक सुधीर शिंगोटे, सुनील बोर्डे, चालक, वाहक ए. एम. अहमद, आयुब खान यांचा गौरव करण्यात आला.

### वैशाली क्षीरसागर पहिल्या महिला वाहक

■ बुलढाणा विभागातील बुलढाणा आगाराच्या वैशाली क्षीरसागर या पहिल्या महिला कर्मचारी वाहक 'लाल परी गौरव रत्न' पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. या सर्व पुरस्कारार्थींचा प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलंगे, कार्यशाळा अभियंता राहुल मोडक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विभागीय वाहतूक अधिकारी संदीप रायलवार, विभागीय सांख्यिकी अधिकारी नितीन देशमुख , उप.अभियंता विजय वाकोडे, विभागीय अभियंता विनोद गायकवाड यांच्यासह प्रादेशिक, विभागीय कार्यालय येथील अधिकारी व कर्मचारी अमरावती प्रदेश यांची उपस्थिती होती.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 996



**आडवी विधाने:**— 1) पॅरिसमधील जगप्रसिद्ध 985 फूट उंचीचा मनोरा
6) भारताचा पहिला अंतराळवीर
10) प्रतिस्पर्ध्याचे वर अडविण्याकरिता असलेले एक पुरातनकालीन हत्यार
11) नामाचा क्रियापदाशी असणारा संबंध
12) युक्त, जोडलेला
14) सततचे, ठाम, शाश्वत
15) वातकारक
16) नोकरीवरून काढून टाकणे
18) जंगलातील वातावरण सुगंधित करणे
20) एक पुरातन कालीन हत्यार
21) चारित्र्य, सद्‌वर्तन, स्वभाव
22) नेहमी, निरंतर 23) बलाढ्य, पराक्रमी
24) पाऱ्यापासून तयार केलेले आयुर्वेदिक औषध
26) एकवेळ, एकेवेळी
27) न बोलणे, स्तब्धता
28) हिंदीत वय
30) पद्धतशीर वागणे, शिष्टपणाचे वर्तन
32) पायात घालावयाची चापट बूड असलेली चप्पल
34) गहिंवर, उमाळा
35) उपवासाला चालणारा एक कंद प्रकार
36) जड ओझी उचलण्यास बांबू लावून केलेले एक साधन
37) समीक्षक, टीका करणारा
38) वनाची अधिष्ठात्री देवी
40) गरीब, प्रामाणिक
41) ...........गंगा म्हणजे अनुकूल परिस्थिती
42) समुद्रावरून वाहणारे वारे
44) अथांग, मर्यादेच्या बाहेर, भरपूर
46) न्यायालयात दाखल केलेली तक्रार, अधिकार सांगणे
47) थंड, गार
48) स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन केलेली क्रांतिकारी संघटना
50) पती, यजमान
52) नामरहित असलेला, ज्याला नाव नाही असा
53) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी
54) स्वातंत्र्यपूर्व काळात लाहोरच्या सायमन कमिशन विरोधी मोर्चाचे नेते
56) इंग्रजीत जायला सांगणे, गाय
57) यज्ञात आहुती टाकणे
59) गुंतागुंत, तिढा, गाठ
60) धाव (इं)
61) नवरदेवाकडील मंडळीस उतरण्यासाठी दिलेली जागा
63) उसाचा कढविलेला घट्ट रस
64) लोकलज्जा
65) जिथे उपमान व उपमेय यांचा अभेद वर्णिला असतो तेथे हा अलंकार होतो
66) पौराणिकालीन दमयंतीचा प्रियकर
68) बायकोला प्रेमाने मारावयाची हाक
70) हत्तीचे ओरडणे 72) तारका, नक्षत्र
74) दुडणे, गुप्त राहणे
76) साहित्यिक स्व.राम गणेश गडकरींचे टोपण नाव
77) पुन्हा, वापस
78) हिमालयातील एक तीर्थक्षेत्र
79) शिकार
80) हिवाळ्यात मिळणारे एक फळ
82) रामायणात श्रीरामचंद्रांची पत्नी
83) रूची, आवड, गोडी
84) कापड विणण्याचे यंत्र, तपास
85) भारतीय क्रिकेट संघातील एका भूतपूर्व कप्तानाचे आडनाव

**उभी विधाने:**— 1) हिंदू महिन्यातील प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस
2) गोल फिरणे, अंगरख्याचा घोळ
3) खोड, दुर्गुण
4) महाराष्ट्राचे एक भूतपूर्व मुख्यमंत्री
5) एक स्थितीस्थपकत्व पदार्थ
7) मोरोपंतांचे प्रख्यात काव्य
8) अंथरूण, निद्रा
9) .........मदभेद याचा अर्थ मनःसंयमन व इंद्रियविजय यांच्या योगाने कामाचा गर्व नाहीसा करणारा
10) निष्कारण उठाठेव करणारा
13) संकेत नाही
15) माकड
17) कौमार्याचा बहार, ताप चढण्यापूर्वी अंगावर येणारे शहारे
19) एक राशी
23) साहित्यिक व्यंकटेश माडगुळकरांची एक प्रसिद्ध कादंबरी
25) सूचित, संदिग्ध
28) पूर्व दिशा, प्राची
29) मंदमंद वाऱ्याचा झोका
30) ज्या विश्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन समस्त जगाला घडविले ते अमेरिकेतील ठिकाण
31) साठी, करिता
33) काही सुद्धा थांगपत्ता लागू न देणे (वाक्प्रचार)
35) लोकसभेचे एक माजी सभापती
39) प्रदर्शन, सोंग
40) शेणाने लिंपणे
43) एका विशिष्ट जातीच्या किड्याने काढलेले मुलायम तंतू
44) पालन करणारा 45) पर्ण, विडा
46) .........हत्ती झुलणे' म्हणजे वैभवाचा कळस होणे, गर्भश्रीमंत असणे
48) सहकार न करण्याची वृत्ती
49) सप्त पातळांपैकी एक
50) लाक्षणिक अर्थाने कृपादृष्टी, डोळे
51) हजामत 52) लोखंडी भिंग, चष्मा
55) मराठी चित्रपटातील एक जुना विनोदी अभिनेता
58) नूतन, नवा
62) प्रत्यक्ष अनुभव 67) सुंदर स्त्री
68) कान न टोचलेला, मुसलमान, यवन
69) एक पौराणिककालीन आयुध
70) पातळ दगड
71) मौल्यवान मणी, रत्नचा अपभ्रंश
73) येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी, अभ्यास
75) शंभर घोडेस्वारांची टोळी
76) गाईपासून उत्पन्न झालेले
79) अंत, पलिकडचे तीर
81) शिवाचा एक अवतार

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



uday munde - 8446302691

### फासे पारधी समाजावर हल्ला ; कारवाईची मागणी

**पिंपळगाव सराई/प्रतिनिधी**

रायपूर पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या साकेगाव येथे ९ जून रोजी रात्री फासे पारधी समाजातील महिला पुरुष व लहान मुलांवर गावातील गावगुंड तरूणांनी पिण्याच्या पाण्याच्या वादातून अमानुष हल्ला चढविला. हल्लेखोरांनी महिलांना लाठीकाठ्यांनी मारहाण केली. जखमी महिलांना सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून या संदर्भात रायपूर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपी फरार आहेत. हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी पारधी विकास परिषद बुलढाणाचे अध्यक्ष युवराज पवार, महासचिव रत्ना पवार, उपाध्यक्ष राजेंद्र पवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद आहे की, साकेगाव येथील फासे पारधी समाजातील २१ महिला पुरुष लहान मुलांवर गावातील ४५ ते ५० गावगुंडानी पिण्याच्या पाण्याच्या वादातून हल्ला चढविला. या हल्यात अर्चना भोसले, बिनोज पवार, नितुसिन्हा पवार, शर्मिला पवार, निलम बागुल, रिता पवार, संध्या पवार, दर्या पवार, विजय युवराज पवार हे जखमी झाले.उपचार घेऊन परतर्णाया महिलांना शारिरिक इजा करण्याची धमकी व शिवीगाळ करण्यात आली. या प्रकरणी रायपूर पोस्टेला १९ जणांविरूद्ध अॅट्रासिटी अॅक्ट प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी अन्यथा सर्व फासे पारधी समाज संघटना आंदोलन छेडतील अशा इशारा देण्यात आला आहे. यावेळी इंद्रराज पवार, विक्की भोसले, वदंना पवार, संजय भोसले, अक्षय पवार, रेश्मा भोसले, राजा पवार, नरेश भोसले, अबेदान पवार विरोद भाई पवार उपस्थित होते.

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

शुक्रवार । १२ जून २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com



## तेल्हारा नगर परिषदेत नागरिकांची कामे रखडली

### प्रहारचा आंदोलनाचा इशारा

गोकुळ हिंगणकर

**तेल्हारा :** नगर परिषदेत नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे शहरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत, नाल्यांची स्वच्छता होत नाही, तर पाणीपुरवठ्याबाबतही नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय बांधकाम परवाने, दुकानांच्या एनओसी, मालमत्ता नोंदणी, विविध दाखले आणि इतर प्रशासकीय कामे महिनोनमहिने प्रलंबित असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.महाराष्ट्र शासनाच्या सेवा हमी कायद्यानुसार नागरिकांची कामे निश्चित कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात अनेक नागरिकांना वारंवार नगर परिषद कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. त्यामुळे ''सेवा हमी कायदा आहे तरी कुणासाठी?'' असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रहार संघटना महाराष्ट्र अकोला जिल्हा महासचिव राजेश पाटील खारोडे यांनी नगर परिषद प्रशासनावर जोरदार टीका करताना म्हटले की, ''तेल्हारा शहरातील नागरिकांची कामे वेळेत होत नसतील तर याला जबाबदार कोण? सामान्य नागरिकांना आपल्या रोजंदारीची, शेतीची किंवा व्यवसायाची कामे सोडून नगर परिषदेत वारंवार चकरा माराव्या लागतात, ही अत्यंत खेदजनक आणि लोकशाहीला काळिमा फासणारी बाब आहे.''खारोडे पुढे म्हणाले की, ''शहरात अशी चर्चा आहे की काही विशिष्ट दलालांच्या माध्यमातून अथवा शिफारशीने कामे केली तर ती झटपट मार्गी लागतात. मात्र सामान्य माणूस नियमाप्रमाणे अर्ज करून कार्यालयात गेला तर त्याला दिवसेंदिवस हेलपाटे मारावे लागतात. जर ही परिस्थिती खरी असेल तर ती अत्यंत गंभीर असून प्रशासनाने याची चौकशी करून पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी.'' ते म्हणाले की, नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. मात्र अनेकदा नागरिकांना योग्य प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने विकासकामे आणि प्रशासकीय प्रक्रिया प्रभावित होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. नगर परिषद प्रशासनाकडून सर्वसामान्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची अपेक्षा असतानाही त्याकडे दूर्लक्ष होत आहे.

## न्यूज ब्रीफ

### ज्वारी खरेदीसाठी नोंदणी संपुष्टात !

**अकोला:** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत जिल्ह्यात ज्वारी बरेदीसाठी नोंदणी करण्याची मुदत बुधवार, १० जून रोजी संपुष्टात आली. जिल्हा पणन अधिकारी कार्यालयामार्फत जिल्ह्यातील १४ केंद्रांवर किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत रब्बी हंगामातील ज्वारीची खरेदी करण्यात येत आहे. खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी करण्याकरिता १० जूनपर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आली.

### क्वीन्स क्लबला चार पुरस्कार

**अकोला:** नाशिक येथे आयोजित इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३०३ च्या ३६ व्या असेंब्लीमध्ये इनरव्हील क्लब ऑफ अकोला क्वीन्सने चार प्रतिष्ठित पुरस्कारांवर आपले नाव कोरले. क्लबला मानाची नागपूर क्लब ट्रॉफी प्रदान करण्यात आली. याशिवाय क्लबच्या दीपिका शाह यांना मोस्ट इनोव्हेटिव्ह ट्रेझरर अवॉर्ड, स्वीटी राठी यांना स्टार सेक्रेटरी अवॉर्ड आणि अंकिता सोनी यांना बेस्ट एडिटर अवॉर्ड सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

### जूनमध्येही उष्णतेचा तडाखा कायम

**अकोला :** जून महिन्याचा दुसरा आठवडा सुरू झाला असला तरी शहरातील उष्णतेचा तडाखा कायम आहे. बुधवारी अकोल्यात ४२.०६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. गुरुवारी तापमानात काहीशी वाढ झाल्याचे दिसून आले. जिल्ह्याचे तापमान ४४.४ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. पावसाळ्याचे दिवस जवळ आले असतानाही तापमानात अपेक्षित घट झालेली नसल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. उष्णतेमुळे थंड पेये, फळांचा रस आणि सरबतांना मागणी कायम असून, नागरिकांनी पुरेसे पाणी पिण्याबरोबरच उन्हात जाणे टाळावे, असा सल्ला आरोग्य तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

### मोठ्या घटनांनंतरही उत्तरांचा अभाव; शहराच्या सुरक्षेची जबाबदारी कुणाची?

# महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

अकोला / प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांत शहरात घडलेल्या दोन मोठ्या आगींच्या घटनांनंतर अकोला महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या कार्यपद्धती, आपत्कालीन प्रतिसाद क्षमता आणि प्रशासकीय व्यवस्थेबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांकडून विभागाच्या नेतृत्व, उत्तरदायित्व आणि कार्यातील पारदर्शकतेबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची मागणी होत आहे.

गत २४ मे २०२६ रोजी शिवणी परिसरातील एका ट्रॅक्टर शोरूमला भीषण आग लागली होती. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन विभागाला सुमारे पाच तास प्रयत्न करावे लागले. या घटनेदरम्यान घटनास्थळी काही कर्मचारी निर्धारित गणवेशात नसल्याचा दावा नागरिकांनी केला असून आपत्कालीन परिस्थितीत निर्णय घेणारा अधिकारी कोण, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. अग्निशमन विभागाचे कार्य केवळ आग विझविण्यापुरते मर्यादित नसून विविध संस्थांच्या अग्निसुरक्षा तपासण्या, सुरक्षा मानकांचे पालन आणि अनापत्ती प्रमाणपत्र प्रक्रिया यांच्याशीही संबंधित आहे. त्यामुळे विभागाच्या कार्यपद्धतीबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांवर प्रशासनाने स्पष्ट व पारदर्शक भूमिका मांडावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. पूर्वीच्या दुर्घटनांच्या चौकशी अहवालांवर कोणती कारवाई झाली आहे आणि भविष्यातील आपत्कालीन परिस्थितीत अंतिम जबाबदारी कोणाची असेल, याबाबत प्रशासनाने स्पष्टता आणावी, अशी मागणी पुढे येत आहे.



#### नेतृत्व आणि अधिकारांबाबत चर्चा

■ अग्निशमन विभागाच्या दैनंदिन कामकाजाचे संचालन, अग्निसुरक्षा प्रस्तावांची तपासणी तसेच अनापत्ती प्रमाणपत्र (एनओसी) प्रक्रियेबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. विभागाचे कामकाज नेमके कोणत्या अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली सुरू आहे, यासंदर्भात स्पष्ट माहिती सार्वजनिक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच या संदर्भातील अधिकृत आदेश उपलब्ध आहेत का, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

#### बाजारपेठेतील आगीच्या चौकशीची प्रतीक्षा

■ यापूर्वी १४ मार्च रोजी पहाटे सिटी कोतवाली पोलीस ठाण्याजवळील मुख्य बाजारपेठेत लागलेल्या आगीत अनेक दुकाने जळून खाक झाली होती. त्यावेळी व्यापारी आणि स्थानिक नागरिकांनी अग्निशमन विभागाच्या प्रतिसाद वेळेबाबत नाराजी व्यक्त केली होती. या घटनेनंतर चौकशीचे आदेश देण्यात आले होते. मात्र संबंधित चौकशी अहवाल अद्याप सार्वजनिक झालेला नसल्याने त्याच्या निष्कर्षाबाबत उत्सुकता कायम आहे.

> शहरातील सिटी कोतवाली जवळील दुकाने व शिवनी येथील ट्रॅक्टर शो रुमला आगी अग्निशामक दलाच्या जवानांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करुन विझविली. या दोनही आगीची माहिती आयुक्तांनी दिली आहे.
>
> – **मनिष कथले** , प्रभारी अधिकारी अग्निशामक मनपा

## निष्क्रिय वीजतारा हटविण्याची मागणी

अकोट / प्रतिनिधी

शहरातील गजानन नगर, हनुमान प्रभाग क्रमांक ७ मधील रहिवाशांनी त्यांच्या घरांवरून गेलेल्या बंद व निष्क्रिय वीजतारा तातडीने काढून टाकाव्यात, अशी मागणी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही रहिवाशांनी दिला आहे.

रहिवाशांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परिसरातील अनेक घरांवरून महावितरणच्या वीज वाहक तारा गेल्या आहेत. मात्र या तारा सध्या पूर्णपणे बंद असून त्याद्वारे कोणताही विद्युत पुरवठा होत नाही. तरीही या निष्क्रिय तारा घरांवरून लोंबकळत असल्याने भविष्यात अपघात किंवा अन्य दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.तसेच घरांच्या बांधकाम, दुरुस्ती व विस्तारकामांमध्ये या तारांमुळे अडथळा निर्माण होत असल्याचे रहिवाशांनी नमूद केले आहे. सदर तारा पूर्णपणे निरुपयोगी झाल्याने त्या त्वरित हटवून परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर विशाल उर्फ गोलू भगत यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. यावेळी बंडू खारोडे, प्रदीप टेकाडे, आकाश निंबोळकर, महेश टेकाम, प्रकाश दिवनाले, गजानन डामरे, विजय लिल्हारे, शारुकभाई, प्रशांत सागळे यांच्यासह अनेक रहिवासी उपस्थित होते. महावितरण प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन बंद वीजतारा हटविण्याची कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.



## तेल्हारा येथे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली झाडाझडती

तेल्हारा / प्रतिनिधी

अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गुरुवारी तेल्हारा तहसीलला अचानक भेट देत विविध शासकीय कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. या अचानक दौऱ्यामुळे तहसील कार्यालयासह संबंधित विभागांमध्ये एकच खळबळ उडाली.

भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी तहसीलदार महेश राम गुंडे उपस्थित होते. नागरिकांनी उपाधीक्षक कार्यालयाकडे जाणाऱ्या चितळवाडी रस्त्याची दुरवस्था, नगरपरिषदेच्या रखडलेल्या कामांचा प्रश्न, क्रीडा संकुलाची झालेली दयनीय अवस्था तसेच ग्रामीण रुग्णालयातील विविध गैरसोयींबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. नागरिकांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता थेट ग्रामीण रुग्णालय तेल्हारा आणि क्रीडा संकुल तेल्हारा येथे भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयातील स्वच्छता, औषधांचा साठा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा याची तपासणी करण्यात आली. तर क्रीडा संकुलात खेळाडूंना उपलब्ध असलेल्या सुविधांची अवस्था, देखभाल व दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेण्यात आला. पाहणीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभाग प्रमुखांना स्पष्ट शब्दांत सुनावत नागरिकांच्या तक्रारी तात्काळ निकाली काढण्याचे आदेश दिले. रुग्णालयातील गैरसोयी दूर करून आरोग्य सेवा सक्षम करण्यासह क्रीडा संकुलाची दुरुस्ती तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



#### विभागांच्या कामकाजावर नजर

■ अचानक झालेल्या या धडक दौऱ्यामुळे अनेक विभागांच्या कामकाजावर प्रशासनाची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले असून, आगामी काळात संबंधित विभागांकडून प्रत्यक्ष कामगिरी दिसून येते की नाही, याकडे आता तेल्हारा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## माय-लेकाचा नदीत बुडून मृत्यू

मूर्तिजापूर / प्रतिनिधी

तालुक्यातील समशेरपूर येथे अधिक मासानिमित्त नदीवर स्नानासाठी गेलेल्या माय-लेकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी पहाटे घडली. वृषाली हरिदास खोत (वय ३५) आणि स्वराज हरिदास खोत (वय १०) अशी मृतांची नावे असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अधिक मासानिमित्त धार्मिक स्नानासाठी गावातील काही महिला आणि एक दहा वर्षीय मुलगा नदीवर गेले होते. स्नान सुरू असताना स्वराज खोत याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात गेला आणि बुडू लागला. आपल्या मुलाचा जीव वाचवण्यासाठी आई वृषाली खोत यांनी क्षणाचाही विलंब न करता नदीत उडी घेतली. मात्र दोघांनाही पोहता येत नसल्याने ते पाण्याच्या प्रवाहात अडकले.

ही घटना पाहून त्यांच्यासोबत असलेल्या माधुरी खोत आणि मीरा चौधरी यांनीही मदतीसाठी नदीत उडी घेतली. मात्र त्या दोघीही पाण्यात अडकल्या. आरडाओरडा ऐकून नदीकाठी उपस्थित असलेल्या काही युवकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाण्यात उडी मारली आणि मोठ्या शर्थीने माधुरी खोत व मीरा चौधरी यांना सुखरूप बाहेर काढले. दरम्यान, वृषाली खोत आणि स्वराज खोत यांचा शोध सुरू करण्यात आला. काही वेळाच्या शोधमोहीमेनंतर दोघांचेही मृतदेह नदीत आढळून आले.

या घटनेत बचावलेल्या महिलांना पुढील उपचारासाठी अकोला येथे रवाना करण्यात आले आहे. अधिक मासातील धार्मिक स्नानासाठी गेलेल्या कुटुंबावर काळाने घाला घातल्याने समशेरपूर गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. माय-लेकाच्या अकाली निधनाने गावकऱ्यांनी तीव्र दुःख व्यक्त केले असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.





## 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' मेळावा आज

अकोला / प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाचा जिल्हास्तरीय मेळावा १२ जून रोजी सकाळी ११ वाजता संविधानभवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर उपस्थित राहणार आहेत. या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन जि.प. सीईओ अनिता मेश्राम यांनी केले आहे.

## पीक विमा प्रश्नावर मंत्रालयात बैठक

मूर्तिजापूर / प्रतिनिधी

२०२३-२४ खरीप व रब्बी तसेच २०२४-२५ रब्बी हंगामातील पिक विमा प्रकरणी उद्भवलेल्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आज मंत्रालय, मुंबई येथे कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांच्या दालनातउच्चस्तरीय बैठक १० जून रोजी पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रलंबित विमा दाव्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून संबंधित अधिकारी व विमा कंपनीच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले.

बैठकीत राज्याचे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर आणि आमदार हरिष पिंपळे प्रमुख उपस्थित होते. १५ मे २०२६ रोजी मूर्तिजापूर उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयावर हजारो शेतकऱ्यांच्या सहभागातून भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांनी पिक विमा प्रश्नावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. या आंदोलनाची गंभीर दखल घेत आमदार हरिष पिंपळे आणि पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या पुढाकारातून मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीला भारतीय किसान संघ विदर्भ प्रांताचे उपाध्यक्ष राहुल राठी, संघाचे सभासद प्रशांत मोंढे, प्रगती शेतकरी संघटनेचे राजू वानखडे व अभिजित पोळकट, प्रहार संघटनेचे मयूर साबळे तसेच भाजप पदाधिकारी भूषण कोकाटे, गोपाल दायमा, निलेश हांडे आणि विविध शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## महाडीबीटीवर कृषी यंत्रांसाठी अर्ज सुरु

अकोला / प्रतिनिधी

कृषी यांत्रिकीकरणाशी संबंधित विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. ट्रॅक्टरचलित अवजारे, पॉवर टिलर, पीक संरक्षण साधने, प्रक्रिया युनिट, औजार बँक व कस्टम हायरिंग सेंटर आदी बाबींवर ५० टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे. लाभार्थी निवडीसाठी लॉटरीऐवजी 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' हे धोरण लागू राहणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी दिली.

### पशु संवर्धन आयुक्तांच्या जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणेला सूचना

# गोटपॉक्स लसीकरण पूर्ण करण्याचे निर्देश

अकोला / प्रतिनिधी

पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागाने जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणेला दिले आहेत.

लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी. गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा; अशा सूचना पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना केल्या आहेत.




#### हॉटस्पॉट तालुक्यांवर विशेष लक्ष

■ गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला होता, त्या भागात प्राधान्य क्रमाने लसीकरण मोहीम राबवावी. या व्यापक मोहिमेसाठी जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था तसेच खाजगी पशुवैद्यक व सेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय यंत्रणेला करण्यात आले आहे.

> लंपी चर्मरोगासारख्या संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्षा करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. सद्यस्थितीत हा उपाय क्षेत्रीय स्तरावर आम्ही मोहिम स्वरुपात योजत आहोत. पशुपालकांनीही विभागास सहकार्य करावे.
>
> – **डॉ. किरण पाटील**, आयुक्त, पशुसंवर्धन

## अंतिम मुदतीपूर्वीच अकोला मनपाची बाजी

अकोला / प्रतिनिधी

जनगणना संचालनालय भारत सरकार यांच्या निर्धारित कार्यक्रमानुसार जनगणना संचालनालय महाराष्ट्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात अकोला महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यातील महानगरपालिकांमध्ये दुसरा क्रमांक पटकावला आहे.

निर्धारित अंतिम मुदतीपूर्वीच पहिल्या टप्प्यातील संपूर्ण काम पूर्ण करणारी महानगरपालिका म्हणून अकोला मनपाची जनगणना संचालनालयाकडे नोंद झाली आहे. मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील भागात प्रत्यक्ष घरभेटी देऊन जनगणना संचालनालय महाराष्ट्र राज्याकडून प्राप्त निर्देशांनुसार माहिती संकलित करून घरगणना पूर्ण केली. अकोला महानगरपालिकेने पहिल्या टप्प्याचे काम निर्धारित कालावधीच्या अंतिम तारखेपूर्वी पूर्ण केल्यामुळे महाराष्ट्रातील महानगरपालिकांमधून दुसऱ्या क्रमांकाने काम पूर्ण करणारी महानगरपालिका म्हणून तिची नोंद झाली आहे. या यशामध्ये मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सुनिल लहाने आणि विभागीय समन्वयक प्रवीण भगत यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हा समन्वयक कार्तिक गडलिंग यांच्यासह सर्व क्षेत्रीय प्रशिक्षक आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभल्याचे सांगण्यात आले. या यशाबद्दल १० जून रोजी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांनी त्यांच्या दालनात शहर जनगणना अधिकारी आणि सर्व चार्ज अधिकाऱ्यांचा गौरव केला. यावेळी मनपा उपायुक्त दिलीप जाधव, जनगणना विभाग प्रमुख अनिल बिडवे, सहायक आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, गजानन घोंगे आदी उपस्थित होते.



दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

शुक्रवार । १२ जून २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचे उपोषण

**कारंजा :** शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, पीककर्जासाठी सिबिलची अट रद्द करावी तसेच शेतकरी व शेतमजुरांना २०० युनिटपर्यंत मोफत वीज द्यावी, या मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी ११ जूनपासून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. शेतकऱ्यांनी तहसील प्रशासनाला दिलेल्या निवेदनात कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करून सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी केली आहे. तसेच पेरणीपूर्वी एकरी ४० हजार रुपयांची मदत देण्याची मागणीही करण्यात आली. भारत भगत, परशुअण्णा सुरजुसे आदी शेतकरी उपोषणात सहभागी झाले.

### १३ वर्षीय मुलीची आत्महत्या

**कारंजा :** शहरातील द्वारका कॉलनी परिसरात १३ वर्षीय मुलीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवारी दुपारी घडली. ओजस्वी प्रदीप कडू (वय १३) असे मृत मुलीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे ४ वाजता तिने घरातील खोलीत पंख्याला ओढणी बांधून गळफास घेतला. कुटुंबीयांनी तिला तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

### मुनगंटीवार दाम्पत्याचे लोणी येथे दर्शन

**रिसोड:** महाराष्ट्राचे माजी अर्थ, वन व पर्यावरण मंत्री सुधीर मुनगंटीवार व त्यांच्या पत्नी साधना मुनगंटीवार यांनी लोणी येथील श्री सखाराम महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. अधिक मासानिमित्त त्यांनी श्री सखाराम महाराज संस्थानास भेट देऊन पूजा-अर्चा केली. यावेळी संस्थानतर्फे शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थानचे प्रतिनिधी डॉ. सखा महाराज व प्राचार्य कल्याण महाराज यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मुनगंटीवार यांनीही संस्थानच्या धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले.

### उगवणीची धास्ती; मृग नक्षत्र सुरू होऊनही पावसाची प्रतीक्षा

# पाऊस लांबणीवर, शेतकरी चिंतेत; कपाशी, हळद लागवड धोक्यात!

**वाशिम / प्रतिनिधी**



मृग नक्षत्र सुरू होऊनही अद्याप समाधानकारक पावसाचे आगमन झाले नसल्याने जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत आहेत. विशेषतः कपाशी आणि हळद लागवड केलेल्या शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले असून, सिंचनाचा आधार घेऊन पिके जगविण्याची कसरत करावी लागत आहे.

जिल्ह्यात यंदा कपाशी आणि हळदीच्या लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अनेक शेतकऱ्यांनी वेळेवर पाऊस पडेल, या अपेक्षेने लागवडीची कामे पूर्ण केली. मात्र मृग नक्षत्र सुरू होऊनही पावसाने हजेरी लावली नसल्याने शेतकऱ्यांची धाकधूक वाढली आहे. अलीकडच्या काळात हळद लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस हळद लागवडीला सुरुवात होते. यंदा अनेक शेतकऱ्यांनी जूनच्या पहिल्या आठवड्यात लागवड केली. लागवडीनंतर पावसाची अपेक्षा असताना पाऊसच गायब झाल्याने हळद उत्पादकांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. सध्या विहीर, बोअरवेल आणि उपलब्ध जलस्रोतांच्या मदतीने पिकांना पाणी दिले जात आहे. मात्र उन्हाची तीव्रता वाढल्याने जमिनीतील ओलावा टिकत नसून एक-दोन दिवसांतच जमीन कोरडी पडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार सिंचन करावे लागत असून उत्पादन खर्चात मोठी वाढ होत आहे. त्यातच अनेक भागांत वीजपुरवठा खंडित होत असल्याने सिंचनाचे नियोजनही विस्कळीत होत आहे. कपाशी लागवड केलेल्या शेतकऱ्यांनाही अशीच परिस्थिती भेडसावत आहे. पेरणीनंतर पाऊस न झाल्यास बियाण्यांची उगवण कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी पुन्हा पेरणीची वेळ येण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

हवामान विभागाने यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसात अनियमितता राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले आहे. आता सर्वांचे लक्ष मान्सूनच्या आगमनाकडे लागले आहे. दरम्यान, १५ जून नंतरच सार्वत्रिक पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

**सोशल मीडियावरील अंदाजाने घात**

खासगी स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांनी सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या लवकर व भरपूर पावसाच्या अंदाजावर विश्वास ठेवून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात हळद लागवड करण्यात आली. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने हळद उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. जिल्ह्यात यंदा सुमारे ६० टक्के हळद लागवड पूर्ण झाली असून त्यापैकी ४० ते ५० टक्के क्षेत्र धोक्यात आल्याची स्थिती आहे. मे आणि जून महिन्यात लागवड केलेल्या हळदीपैकी जवळपास ७० टक्के पीक पावसाअभावी प्रभावित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काल व आज ५/६एकर कपास लागवड झाली असुन आणखी ५/६एकर २दीवसात लागवड होईल.

> लवकर पाऊस पडेल या अपेक्षेने मी कपाशी लागवडीला सुरुवात केली आहे. बुधवारी व गुरुवारी मिळून सुमारे पाच ते सहा एकर क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली असून आणखी पाच ते सहा एकर क्षेत्रावर पुढील दोन दिवसांत लागवड होणार आहे. सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत मजुरांमार्फत लागवडीचे काम सुरू असते, तर दुपारनंतर लागवड केलेल्या क्षेत्रावर स्प्रिंकलरद्वारे पाणी द्यावे लागत आहे. पाऊस लांबल्याने सिंचनाचा खर्च वाढत असून पिकांच्या उगवणीची चिंता सतावत आहे.
>
> – **विठ्ठल राठोड**, शेतकरी, चेहल (ता. मंगरूळपीर)




## उंच खिडकी, खाली दगड; औषधांसाठी कसरत

### कामरगाव ग्रा. रुग्णालयाचा कारभार चर्चेत

**कारंजा / प्रतिनिधी**

तालुक्यातील सुमारे २० हजार लोकसंख्या आणि ४० गावांसाठी आरोग्यसेवा पुरविणाऱ्या कामरगाव ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना मूलभूत सुविधांच्या अभावाचा सामना करावा लागत आहे. रुग्णालयात ओपीडीची चिठ्ठी काढण्यासाठी, तपासणीसाठी किंवा औषधे घेण्यासाठी आलेल्या रुग्णांना दगडांवरून चालत जावे लागत आहे.

विशेष म्हणजे, रुग्णालयात सध्या बाहेरून खिडकीतून औषध वितरण केले जात आहे. मात्र औषध वितरणाची खिडकी उंच असल्याने अनेक रुग्णांना औषधे घेण्यासाठी दगडांवर उभे राहावे लागत आहे. कडक उन्हात रांगेत उभे राहून औषधांची प्रतीक्षा करावी लागत असल्याने रुग्णांची मोठी परवड होत आहे. वृद्ध, महिला आणि अशक्त रुग्णांना औषधे मिळवण्यासाठी अक्षरशः कसरत करावी लागत असून पडण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे. एकीकडे कर्मचारी सावलीत बसून कामकाज करत असताना दुसरीकडे रुग्ण मात्र उन्हात उभे राहून औषधे घेत असल्याचे चित्र मागील अनेक महिण्यांपासून येथे पाहायला मिळत आहे.

> ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आतून औषध वितरण करण्याचे निर्देश दिले आहेत. निर्देशांचे पालन न झाल्यास संबंधितांवर योग्य कारवाई केली जाईल.
>
> – **डॉ. अनिल कावरखे**, जिल्हा शल्यचिकित्सक, वाशिम

## काटा चौफुली मार्ग रखडला




**वाशिम :** अकोला नाका ते काटा चौफुली दरम्यान नाल्यांची कामे पूर्ण झाली असली तरी रस्त्याची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. संपूर्ण मार्गावर खड्डे आणि उखडलेल्या रस्त्यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला असून संबंधित विभागाच्या दुर्लक्षाबाबत नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. **(छाया : अक्षय काटे)**

## शिवाई बसची ट्रकला धडक; चौघे जखमी

**वाशिम / प्रतिनिधी**



वाशिम-हिंगोली राष्ट्रीय महामार्गावरील तोंडगाव फाट्याजवळ गुरुवारी सकाळी शिवाई बसने समोरील ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने चालकासह चौघेजण जखमी झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

माहितीनुसार, शिवाई बस (एमएच ४९ सीडब्ल्यू १४२६) चालक प्रशांत रंगनाथ चव्हाण व वाहक नामदेव गोविंदराव मानकर यांच्यासह १४ प्रवाशांना घेऊन वाशिमहून हिंगोलीकडे जात होती. सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास तोंडगाव फाट्याजवळ बसने समोरील ट्रक (एमएच ४० सीटी १८६०) ला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की ट्रक रस्त्यावर आडवा झाला. या अपघातात बस चालक प्रशांत चव्हाण, दोन प्रवासी तसेच ट्रक चालक जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. बस चालक व प्रवाशांवर वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असून ट्रक चालकावर हिंगोली येथे उपचार सुरू असल्याची माहिती आहे. अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. या प्रकरणी वाशिम ग्रामीण पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## एमपीएससी गट-ब पूर्व परीक्षा रविवारी

**वाशिम / प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित एमपीएससी गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा १४ जून रोजी जिल्ह्यातील १५ केंद्रांवर होणार आहे. परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. आदेशानुसार ओळखपत्राशिवाय प्रवेशास मनाई करण्यात आली असून अधिकृत अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी वगळता इतरांना प्रवेश दिला जाणार नाही.

## शॉर्ट सर्किटमुळे आग; २० लाखांचे नुकसान

**रिसोड / प्रतिनिधी**



तालुक्यातील नेतंसा येथे गुरुवारी पहाटे एका किराणा व जनरल स्टोअरला भीषण आग लागून सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाले. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

माहितीनुसार, विजय मिठूलाल ओसवाल यांच्या मालकीच्या किराणा व जनरल स्टोअरमध्ये मध्यरात्री सुमारे २ वाजण्याच्या सुमारास अचानक धूर व आगीच्या ज्वाला दिसू लागल्या. परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी तत्काळ दुकानमालक व संबंधित यंत्रणांना माहिती दिली. दुकानात मोठ्या प्रमाणात किराणा माल व विविध वस्तूंचा साठा असल्याने आगीने काही क्षणांतच विक्राळ रूप धारण केले. स्थानिक नागरिकांनी आग विझविण्याचे प्रयत्न केले. मात्र आगीची तीव्रता वाढल्याने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. घटनास्थळी दाखल झालेल्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. तोपर्यंत दुकानातील किराणा माल, फर्निचर व इतर साहित्य जळून खाक झाले होते. घटनेनंतर महसूल विभाग व ग्रामपंचायत प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी पटवारी मनोज केनवडकर, ग्रामपंचायत अधिकारी शिंदे तसेच पंचांच्या उपस्थितीत नुकसानीची नोंद करण्यात आली. लाईनमन कर्मचारीही उपस्थित होते.

## पोलीस भरतीत अपयश; तरुणीची आत्महत्या

**कारंजा / प्रतिनिधी**

पोलीस भरतीत निवड न झाल्याने नैराश्यात गेलेल्या २० वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कारंजा तालुक्यातील पोहा येथे बुधवारी घडली. शिवाणी राधेश्याम जाधव (वय २०, रा. पोहा) असे मृत तरुणीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाणी जाधव ही पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेत होती. तिने नागपूर व मुंबई येथे झालेल्या भरती प्रक्रियेत सहभाग घेतला होता. मात्र, भरतीत निवड न झाल्याने ती गेल्या काही महिन्यांपासून नैराश्यात होती. बुधवारी दुपारी कुटुंबातील सदस्य बाहेरगावी गेले असताना शिवाणीने घरातच नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर कारंजा ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला व शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी कारंजा ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## आरक्षणाचा आज फैसला; इच्छुकांची घालमेल

**रिसोड / प्रतिनिधी**

आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रिसोड तालुक्यातील ३४ ग्रामपंचायतींमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून, आज, १२ जून रोजी प्रभागनिहाय (वार्डनिहाय) आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. यासाठी संबंधित ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांसह ग्रामस्थांचे लक्ष या प्रक्रियेकडे लागले आहे.

तरतुदींनुसार अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.

आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही, याबाबत राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. फेब्रुवारी २०२६ मध्ये मुदत संपलेल्या चिंचांबा भर, देऊळगाव बंडा, एकलासपूर, गोभणी, कंकरवाडी, करडा, करंजी, कवठा, खडकी सदार, लोणी बु., मांगूळ झनक, मोप, मसलापेन, मोठेगाव, नंधाना, नेतांसा, पळसखेडा, सवड व शेलूखडसे, बिबखेडा, चिखली, गोंढाळा, गोवर्धन, हराळ, केनवड, केशननगर, रिठद, वनोजा, व्याड, वाकद, येवती, आगरवाडी, नावली आणि चिंचांबा पेन या ग्रामपंचायतींचा आरक्षण प्रक्रियेत समावेश आहे.

**कोणता वॉड राखीव, कोणता खुला?**

ग्रामपंचायत निवडणुकीत कोणत्या प्रभागात कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षण लागू होणार, याचा निर्णय आरक्षण सोडतीतून होणार आहे. त्यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांचे राजकीय भवितव्य या प्रक्रियेवर अवलंबून आहे. एखादा वॉर्ड राखीव झाल्यास काही इच्छुकांची संधी हुकणार, तर खुला राहिल्यास निवडणुकीचे चित्र बदलू शकते.

### बालमजुरीविरोधात सातत्याने मोहीम; २०१ धाडसत्रांत ७९ बालकामगारांची सुटका

# बालपण हिरावणाऱ्यांवर कारवाई; ४७ एफआयआर

**महाभूमि दिनविशेष**

**दिनेश पठाडे**



**वाशिम :** बालमजुरी ही मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासाला बाधा आणणारी गंभीर सामाजिक समस्या असून तिच्या निर्मूलनासाठी वाशिम जिल्ह्यात सातत्याने जनजागृती व अंमलबजावणीची मोहीम राबविण्यात येत आहे. १२ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनानिमित्त जिल्ह्यातील कामगार विभागाने केलेल्या कार्याचा आढावा समोर आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार वाशिम जिल्ह्यात १० जुलै २००६ पासून जिल्हास्तरीय कृतीदल कार्यरत असून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियमित सभा व धाडसत्रांचे आयोजन करण्यात येते. नोव्हेंबर २००६ ते मे २०२६ या कालावधीत जिल्हा कृतीदलामार्फत २०१ धाडसत्रे राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान ७४६ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून ७९ बालक व बाल-किशोरवयीन कामगारांची सुटका करण्यात आली आहे. यापैकी १८ बालकामगार हे १४ वर्षांखालील आढळून आले.

बालकामगार ठेवणाऱ्या आस्थापना मालकांविरुद्ध बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियमांतर्गत एकूण ४७ गुन्हे दाखल करण्यात आले असून काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच १४ वर्षांवरील २८ बालकांना कामातून मुक्त करून त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले व त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मुक्त करण्यात आलेल्या बालकामगारांच्या पुनर्वसनासाठी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद आणि नगरपालिकांच्या माध्यमातून विशेष उपाययोजना करण्यात येतात. तसेच बालकामगार ठेवणाऱ्या दोन मालकांकडून ४० हजार रुपयांची दंडात्मक वसुली करण्यात आली असून इतर प्रकरणांमध्येही वसुलीची प्रक्रिया सुरू आहे. कामगार विभागाचे अधिकारी व दुकाने निरीक्षक नियमित तपासणीदरम्यान आस्थापना मालकांकडून बालकामगार न ठेवण्याबाबत हमीपत्र भरून घेतात.

> बालमजुरी ही केवळ कायद्याचे उल्लंघन नसून बालकांच्या मूलभूत हक्कांवर होणारा आघात आहे. प्रत्येक बालकाला शिक्षण, संरक्षण आणि सुरक्षित बालपण मिळणे आवश्यक आहे. बालमजुरी निर्मूलनासाठी प्रशासनासोबतच पालक, नागरिक आणि समाजातील सर्व घटकांनी जागरूक राहून सहकार्य करणे गरजेचे आहे. बालकामगार आढळल्यास त्याची माहिती तातडीने संबंधित यंत्रणेला द्यावी.
>
> – **अस्मिता घाडगे**, जिल्हा सरकारी कामगार अधिकारी, वाशिम

**बालमजुरी थांबवा, बालपण वाचवा**

बालमजुरीविरोधात जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. नागरिकांनी बालकामगार आढळल्यास तात्काळ प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक बालकाला शिक्षण, संरक्षण व सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचा संदेश जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनानिमित्त देण्यात आला.

## मानोरा न.पं. पोटनिवडणुकीत रंगणार अटीतटीची लढत

**मानोरा / प्रतिनिधी**

नगर पंचायतच्या प्रभाग क्रमांक १४ मधील नगरसेवक निशार शहा यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी २० जून रोजी पोटनिवडणूक होत असून या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

या निवडणुकीसाठी तस्लिम शहा कय्युम शहा, हाफिज खान आणि नुरेद खान फराद खान यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अर्जांची छाननी व माघारीनंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार असले तरी सध्या या निवडणुकीत चुरशीची लढत होण्याची चर्चा सुरू आहे. या प्रभागात यापूर्वी नगराध्यक्ष हेमेंद्र ठाकरे आणि ज्येष्ठ नेते युसूफ पुंजानी यांनी एकत्रितपणे निवडणूक लढविली होती. मात्र यावेळी दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये अप्रत्यक्ष चुरस पाहायला मिळत असल्याने निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रभाग क्रमांक १४ मध्ये एकूण ४२८ मतदार असून समाजनिहाय मतदानाची समीकरणे, उमेदवारांची स्थानिक पातळीवरील पकड, वैयक्तिक संपर्क आणि विकासकामांचे मुद्दे निर्णायक ठरणार आहेत. दरम्यान, मानोरा नगर पंचायतचा कार्यकाळ येत्या डिसेंबरमध्ये संपुष्टात येणार असल्याने ही पोटनिवडणूक आगामी सार्वत्रिक निवडणुकांची रंगीत तालीम मानली जात आहे. त्यामुळे प्रत्येक मतासाठी उमेदवारांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. आवश्यक असल्यास २० जून रोजी मतदान होणार असून २१ जून रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे.

## डीएलएस पद्धतीमुळे भारताच्या पदरी पराभव

# ट्राय सीरिजच्या दुसऱ्या सामन्यात अफगणिस्तानचा चार धावांनी विजय



**श्रीलंका :** ट्राय सिरिजमध्ये भारताचा दूसरा सामना गुरुवारी पार पडला. भारत आणि अफगणिस्तान आमनेसामने आले होते. भारताने प्रथम फलंदाजी करताना अफगणिस्तानला ३५० रन्सचे टार्गेट दिले होते. वैभव सूर्यवंशी आणि प्रभसिमरन सिंहच्या खेळीने भारताने ३५० पर्यन्त मजल मारली होती. मात्र अखेर या सामन्यात पावसामुळे अफगणिस्तानचा विजय झाला. ४ रन्सचे अफगणिस्तानने भारतावर विजय मिळवला. भारताने अफगणिस्तानला ३५० रन्सचे टार्गेट दिले होते. मात्र अफगणिस्तान फलंदाजी करण्यासाठी आला तेव्हा काही कालावधीनंतर पाऊस सुरु झाला. त्यामुळे ओव्हर्सची संख्या कमी करण्यात आली. या सामन्यात डीएलएस मेथडमुळे अफगणिस्तानने भारतावर ४ रन्सने विजय प्राप्त केला. अफगणिस्तान कडून इम्रान मीरने सर्वाधिक ८४ रन्सची आक्रमक खेळी केली. तर बाहिर शाहने ५१ रन्सची अर्धशतकी खेळी केली. मात्र पावसामुळे ओव्हर्स कमी करण्यात आल्या आणि अफगणिस्तानचा विजय झाला आहे. भारताकडून अरशद खान आणि अनुकूल रॉयने प्रत्येकी एक एक विकेट घेतली. अफगणिस्तानविरुद्ध वैभव सूर्यवंशीने लहानशी पण आक्रमक खेळी केली. त्याने २२ बॉलमध्ये ४४ रन्सची तुफानी खेळी केली. त्याला प्रभसिमरन सिंहने ८४ रन्सची चांगली साथ दिली. मागील सामन्यात श्रीलंकेविरुद्ध वैभव सूर्यवंशी १४ रन्सवर आउट झाला होता. दुसऱ्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने अत्यंत संयमी आणि महत्वाची खेळी केली. वैभव सूर्यवंशी आउट झाला तेव्हा भारताचा स्कोअर ७४ रन्सवर होता. मागील सामन्यात चांगली खेळी करणाऱ्या ऋतुराज गायकवाडने या सामन्यात अर्धशतकी खेळी केली. त्याने ६६ रन्सची खेळी केली. सुयश शेडगेने ४० रन्सची खेळी केली.

### इम्रान – बहिर यांच्यात १०८ धावांची अभेद्य भागीदारी

■ कठीण प्रसंगी कर्णधार इम्रान मीर आणि बहिर शाह यांनी संघाची धुरा सांभाळली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १०८ धावांची अभेद्य भागीदारी केली. इम्रान मीरने ७० चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ७५ धावांची खेळी केली, तर बाहिर शाह ५२ चेंडूत ५१ धावांवर नाबाद राहिला.

## फुटबॉलचा महाकुंभ; फिफा विश्वचषक २०२६ निमित्त बुलढाण्यात विशेष कार्यक्रम



**बुलढाणा :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा आणि बुलढाणा जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २३ व्या फिफा विश्वचषक २०२६ निमित्त ''हार्दिक शुभेच्छा'' कार्यक्रमाचे आयोजन जिजामाता क्रीडा संकुलातील जिल्हा क्रीडा फुटबॉल प्रशिक्षण केंद्र येथे करण्यात आले होते.

''मैदान गाजणार, इतिहास रचला जाणार, गोल होणारच! खेळ भावना जिंकण्याचाउत्सव फुटबॉलचा!'' या घोषवाक्याने खेळाडूंनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे होत्या. यावेळी बुलढाणा जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष एस. एस. ठाकरे, सचिव एन. आर. वानखेडे, तालुका क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर तसेच सहकार विद्या मंदिरचे क्रीडा विभाग प्रमुख सय्यद आबीद यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा 'फिफा विश्वचषक २०२६' ची विशेष फ्रेम देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी फिफा विश्वचषक स्पर्धेत सहभागी सर्व संघाचे कौतुक केले व बुलढाणा जिल्ह्यातील फुटबॉल खेळाडूंनाही प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात क्रीडा शिक्षक व एनआयएस हँडबॉल प्रशिक्षक मनोज श्रीवास यांनी फिफा विश्वचषक २०२६ विषयी सविस्तर माहिती दिली. यंदाचा विश्वचषक ११ जूनपासून अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांत होत असून, प्रथमच ४८ संघ या स्पर्धेत सहभागी होत असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच भारतीय वंशाचे चार खेळाडू या स्पर्धेत सहभागी होत असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

कार्यक्रमाला बुलढाणा जिल्ह्यातील १३ व १५ वर्षे वयोगटातील फुटबॉल खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुकेश बाफना, मनोज श्रीवास, रमिज चौधरी, राहुल ओशालकर, उज्ज्वला लांडगे आणि डॉ. जीवन मोहोड यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. जीवन मोहोड यांनी तर आभार प्रदर्शन मनोज श्रीवास यांनी केले.

## एकदिवसीय सांघिक क्रमवारीत भारताचे अव्वल स्थान कायम



**लंडन :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पुरुष एकदिवसीय क्रमवारी जारी केली आहे. भारतीय क्रिकेट संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व कायम ठेवत आयसीसी पुरुष वनडे संघ क्रमवारीत अव्वल स्थान कायम राखले आहे. आयसीसी क्रमवारीत भारतीय संघाचे ११८ रेटिंग गुण आहेत. तर, न्यूझीलंड ११३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयसीसीच्या वार्षिक अपडेटनंतरही टीम इंडियाने वनडे क्रिकेटमधील आपली बादशाही कायम राखली आहे.

न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया सारखे बलाढ्य संघ पाठलाग करत असले तरी भारत अजूनही शिखरावर विराजमान आहे. त्यामुळे आगामी मालिकांमध्ये हे स्थान टिकवून ठेवण्यासाठी भारतीय संघासमोर मोठे आव्हान असणार आहे. वार्षिक अपडेटनंतर भारताच्या रेटिंगमध्ये एका गुणाची घट झाली असली तरी त्यांचे अव्वल स्थान कायम आहे. दुसरीकडे न्यूझीलंडने दोन गुणांची वाढ नोंदवत ११३ गुणांसह दुसरे स्थान मजबूत केले आहे. गतविजेता ऑस्ट्रेलिया १०९ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. अव्वल १० संघांमध्ये झालेल्या एकमेव बदलात, दक्षिण आफ्रिकेने १०२ गुणांसह पाकिस्तानला मागे टाकून चौथे स्थान पटकावले आहे.

## ऑस्ट्रेलिया संघात निखिल चौधरीची निवड



**कॅनबेरा :** भारतात जन्मलेला अष्टपैलू निखिल चौधरीची पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघात निवड झाली आहे. तो बांगलादेशविरुद्धच्या ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेत सहभागी होईल. ३० वर्षीय निखिलला ट्रॅव्हिस हेडच्या जागी संघात समाविष्ट करण्यात आले आहे. हेडला विश्रांती देण्यात आली आहे. पंजाबसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळलेला निखिल २०२० मध्ये कोविड-१९ महामारीदरम्यान ऑस्ट्रेलियात पोहोचला होता. तेथे त्याने ग्रेड क्रिकेट, टास्मानिया आणि होबार्ट हरिकेन्ससाठी उत्कृष्ट कामगिरी करून आपली ओळख निर्माण केली. बांगलादेश दौऱ्यावर त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी आहे. टी-२० मालिका १७ जूनपासून सुरू होईल. ऑस्ट्रेलियाचे निवडकर्ते टोनी डोडेमाइड म्हणाले की, निखिल बऱ्याच काळापासून राष्ट्रीय संघाच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत होता. निवडकर्ते त्याच्या बिग बॅश आणि देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीने प्रभावित झाले आहेत. निखिलकडे सध्या ऑस्ट्रेलियन नागरिकत्व नाही, परंतु आयसीसीच्या निवासविषयक नियमांची पूर्तता केल्यामुळे तो ऑस्ट्रेलियासाठी खेळण्यास पात्र आहे.




### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**पेद्दी :** दुपारी १:४५, रात्री ४:४५,
**है जवानी तो इश्क होना है :** दु.२:००,
**तुंबाडची मंजूळा :** सायंकाळी ५.३०

### खामगाव

**श्री गजानन टॉकिज**

**है जवानी तो इश्क होना है :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**है जवानी तो इश्क होना है :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### वाशिम

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**पेद्दी :** दुपारी १२:१०, सायंकाळी ६:१५,
**तुंबाडची मंजूळा :** दुपारी १२:१५
**देऊळ बंद-२ :** दुपारी ०३:०५, सायंकाळी ०६:२०, रा.०९:३५
**है जवानी तो इश्क होना है :** दुपारी ०३:३०, रा.०९:४०

### अकोला

**मिराज**

**ही मॅन अॅन्ड दी मास्टर्स ऑफ दी युनिवर्स (हिंदी) :** स. ९.००, दु. २.२०
**ही मॅन अॅन्ड दी मास्टर्स ऑफ दी युनिवर्स (हिंदी) :** सायं. ७.५५
**देऊळ बंद :** स. ९.३०, दु. १.००, दु. ४.३०, सायं. ७.३०, रात्री १०.४५
**है जवानी तो इश्क होना है :** स. ९.३०, दु. १२.१५, दु. ३.००, दु. ५.४५, रात्री ८.३०, रात्री ११.१५
**पेड्डी (हिंदी) :** स. ९.४५, स. ११.००
**पेड्डी (तेलगु) :** दु. ३.३०
**बंदर :** स. ११.४० , रात्री ८.००
**मिराज :** ऑब्सेशन (इंग्रजी) : दु. १.१५
**तुंबाडची मंजुळा (मराठी) :** दु. ५.००, रात्री १०.३५

### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**है जवानी तो इश्क होना है :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**हि मॅन अॅण्ड द मास्टर्स ऑफ द युनिव्हर्स :** दुपारी दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०,
**देऊळ बंद-२ :** दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०,
**बंदर :** दुपारी १२:१५, २:३०,
**पेद्दी :** दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०,
**तुंबाडची मंजूळा :** दुपारी १२:१५,

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**है जवानी तो इश्क होना है :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**देऊळ बंद-२ :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**बंदर :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**पेद्दी :** सायंकाळी ५:३०, ६:३०
**तुंबाडची मंजूळा :** दुपारी १२:१५,

**अंजली रत्नदिप सिनेमागृह**

**है जवानी तो इश्क होना है :** सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**बंदर :** सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००,
**तुंबाडची मंजूळा :** दुपारी २:३०, रात्री १०:२५




## 'मर्दिनी'मधून अहमद खान यांचे मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल

आगामी मराठी चित्रपट मर्दिनी सध्या विविध कारणांमुळे चर्चेत आहे. आता चित्रपटातील एका खास गीतामुळे प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. या गीताच्या निमित्ताने बॉलिवूडचे प्रसिद्ध कोरिओग्राफर अहमद खान यांनी पहिल्यांदाच मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले आहे. विशेष म्हणजे या गीताला गायक आदर्श शिंदे यांच्या दमदार आवाजाची साथ लाभली आहे. अहमद खान यांनी या अनुभवाबद्दल बोलताना सांगितले की, 'मर्दिनी' हे केवळ एक गाणे किंवा चित्रपट नसून भावनांचा, श्रद्धेचा आणि स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याचा प्रवास आहे. चित्रपटाच्या कथेशी आणि त्यातील भावविश्वाशी ते सहज जोडले गेले. मराठी चित्रपटासाठी प्रथमच काम करण्याचा अनुभव अत्यंत आनंददायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

हा चित्रपट समाजाने घालून दिलेल्या चौकटी मोडून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या स्त्रीचा प्रेरणादायी प्रवास उलगडणार आहे. चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले आणि बालकलाकार मायरा वैकुळ यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. त्यांच्या दमदार अभिनयामुळे कथेला अधिक प्रभावी परिमाण लाभले आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन अजय मयेकर यांनी केले असून, निर्मिती दिप्ती तळपदे यांची आहे. सहनिर्माती टिना राकेश कोठारी आहेत. छायांकन शब्बीर नाईक, संकलन अभिषेक शेठ, संगीत हितेश मोडक तसेच पटकथा आणि संवाद महाबळेश्वर नार्वेकर यांनी चित्रपटाच्या तांत्रिक बाजूला सक्षम आधार दिला आहे. पोस्टर लॉन्चपासूनच चर्चेचा विषय ठरलेल्या 'मर्दिनी'ने प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. नारीशक्तीचा जयघोष, मातृत्वाच्या सामर्थ्याला सलाम आणि संकटांशी दोन हात करणाऱ्या स्त्रीच्या अदम्य जिद्दीची कहाणी घेऊन येणारा हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा अनुभव ठरणार आहे. येत्या ३ जुलै २०२६ रोजी ही प्रेरणादायी कथा रुपेरी पडद्यावर येणार आहे.



## जॅकलिनच्या २०० कोटी मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाची सुनावणी आता दुसऱ्या खंडपीठासमोर...



**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांनी बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसच्या त्या याचिकेच्या सुनावणीतून स्वतःला बाजूला केले आहे, ज्यात तिने २०० कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात आरोप निश्चित करण्याच्या दिल्ली न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले आहे. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने सुनावणीच्या सुरुवातीला जॅकलिनच्या वकिलांना आणि अंमलबजावणी संचालनालयाला सांगितले की, हे प्रकरण दुसऱ्या खंडपीठासमोर सूचीबद्ध केले जाईल.**



न्यायमूर्ती मिश्रा यांनी सांगितले की, एका संबंधित प्रकरणात त्यांचा मुलगा सरकारच्या वतीने हजर झाला होता. त्यांनी हे प्रकरण २५ जून रोजी अशा खंडपीठासमोर सूचीबद्ध करण्याचे निर्देश दिले, ज्यात या दोघांपैकी कोणताही एक सदस्य नसेल. दिल्लीतील एका न्यायालयाने ३० मे रोजी जॅकलिन फर्नांडिस, कथित ठक सुकेश चंद्रशेखर आणि इतर १५ जणांविरुद्ध २०० कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले होते. जॅकलिन ३ जून रोजी दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टात हजर झाली होती. कोर्टात सुनावणीदरम्यान, अभिनेत्रीने तिच्यावरील सर्व आरोप पूर्णपणे चुकीचे असल्याचे सांगितले होते. अंमलबजावणी संचालनालयाने या प्रकरणाच्या तपासानंतर दाखल केलेल्या आपल्या पुरवणी आरोपपत्रात जॅकलिन फर्नांडिसलाही आरोपी बनवले होते. ईडीचे म्हणणे आहे की जॅकलिनला सुकेशच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची आणि खंडणीच्या पैशांची आधीच माहिती होती, तरीही तिने त्याच्याकडून महागड्या भेटवस्तू घेणे सुरूच ठेवले. या भेटवस्तूंमध्ये लक्झरी गाड्या, महागड्या ब्रँडेड बॅग, कपडे, दागिने आणि अनेक मौल्यवान पाळीव प्राणी यांचा समावेश होता.

## संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

### अशोक पत्की, आनंद भाटे यांच्यासह दिग्गजांचा राष्ट्रीय गौरव

भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार', तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे. यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे. वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे.

अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे. वर्ष २०२५ साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की तसेच कथक नृत्य क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मनीषा साठे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हार्मोनियम वादनातील प्रभुत्वासाठी तन्मय देवचके आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जागर या लोकसंगीत प्रकारासाठी प्रवीण प्रताप जाधव यांची निवड करण्यात आली आहे.